# अहिंसा दर्शन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८४०



REFBK-0006265

गांधी साहि… २

मराठी ग्रंथ संग्रहालय,
दाखल
सं.
ता.
ठाणे.

गांधी साहित्य पुष्प २ रें.

# अहिंसा दर्शन

( महात्माजींचे अहिंसेवरील काहीं निवडक लेख )

REFBK-0006265

: प्रकाशक :

महाराष्ट्र ग्रंथ भांडार

गिरगांव, मुंबई.

प्रकाशक :
शंकर वामन कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
मुंबई ४.

किंमत १॥ रुपया.

गांधी जयंती १९४२

मुद्रक :
दत्तात्रेय पुरुषोत्तम भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
मुंबई ४.

# निवेदन

मी वारंवार सांगितलेली गोष्टच पुन्हां सांगतो; ती हीं कीं, विधायक कार्यक्रमाची नेटानें व चिकाटीनें अंमलबजावणी करणे, हीच अहिंसेची खरी तयारी, किंबहुना हीच अहिंसेची खरी अभिव्यक्ति होय. विधायक कार्यक्रमाच्या बळाशिवाय ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं आपण अहिंसेची शक्ति दाखवूं शकूं असें ज्यांना वाटते त्यांची फटफजिती झाल्याशिवाय रहाणार नाहीं. हें असें करणें म्हणजे धष्टपुष्ट व चिलखत घातलेल्या शिपायाबरोबर एखाद्या उपाशी मरणाऱ्या निःशस्त्र इसमानें दोन हात करण्यासारखेंच हास्यास्पद ठरेल. त्यांत अपयश हें ठरलेलेंच. ज्याचा विधायक कार्यक्रमावर विश्वास नाहीं, त्याला माझ्या मतें उपाशी मरणाऱ्या जनतेबद्दल प्रत्यक्ष जिव्हाळाच नाहीं. ज्याला अशा प्रकारचा जिव्हाळा वाटत असेल त्याला अहिंसक रीतीनें लढतांच येणार नाहीं. माझ्या प्रत्यक्ष आचरणांत ज्या प्रमाणांत माझें भुकेलेल्या जनतेशीं तादात्म्य होत गेलें, नेमकी त्याच प्रमाणांत माझ्या अहिंसेची व्यापकता वाढत गेली. मी आपल्या कल्पिलेल्या अहिंसेपासून बराच दूर आहे, तेथें पोंहचण्यासाठीं माझें मुक्या जनतेशी जेवढें तादात्म्य व्हायला पाहिजे, त्यापासून देखील मी दूरच नाहीं कां ?

— वर्ध्याच्या वाटेवर, ५-४-४२

सुलभ मराठी भाषेंत गांधींच्या
तत्त्वज्ञानाचा प्रसार करणारी
नवीन संस्था

# गांधी साहित्य प्रकाशन

पहिलें पुष्प ' अखंड भारत '
गांधी जयंतीस प्रसिद्ध
झालें.

★

दर महिन्याला एक पुष्प तयार
होणार असून प्रत्येक पुष्पाची
किंमत दीड रुपया राहील.
वार्षिक आगाऊ पैसे भरणाऱ्यांना
विशेष सवलत मिळेल. सविस्तर
माहिती मागवा.

★

महाराष्ट्र ग्रंथ भांडार,

मुंबई ४.

# लेखांचा अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | तरवारीचें तत्त्वज्ञान ... ... | ९ |
| २ | रशिया व मी ... ... | १३ |
| ३ | एक प्रश्न ... ... | १५ |
| ४ | माझें युद्धसहकार्य ... ... | १७ |
| ५ | महान शक्ति ... ... | १९ |
| ६ | दिव्य संदेश ... ... | २३ |
| ७ | आमचें अपयश ... ... | २४ |
| ८ | ध्येयाकडे ... ... | २७ |
| ९ | खुदाई खिदमतगाराची प्रतिज्ञा ... | ३१ |
| १० | शांततेचा मार्ग ... ... | ३२ |
| ११ | सूड आणि क्षमा ... ... | ३४ |
| १२ | माझी श्रद्धा ... ... | ३५ |
| १३ | सिमल्याची वारी ... ... | ३६ |
| १४ | माझ्या सहानुभूतीचा उगम ... ... | ३९ |
| १५ | मैत्रीचा हात ... ... | ४२ |
| १६ | भगिनीची व्यथा ... ... | ४३ |
| १७ | कोड्यांचा उलगडा ... ... | ४५ |
| १८ | कमलादेवींचे पत्र ... ... | ४९ |
| १९ | कसोटीची वेळ ... ... | ५३ |
| २० | हिंदूंची हिजरत ... ... | ५६ |
| २१ | एका शंकेचें उत्तर ... ... | ६० |
| २२ | संरक्षणाची बाब ... ... | ६१ |

२३ एकच मार्ग ... ... ६२
२४ झिडकारलेली मदत ... ... ६४
२५ भीतीचें वातावरण ... ... ६८
२६ एक जिव्हाळ्याचा प्रश्न ... ... ७०
२७ प्रत्येक ब्रिटनला उद्देशून ... ... ७१
२८ अरण्यरुदन ... ... ७४
२९ माझें नेतृत्व ... ... ७८
३० खानसाहेबांची अहिंसा ... ... ८१
३१ नैतिक पाठिंबा ... ... ८४
३२ अहिंसक पोलिस ... ... ८७
३३ अहिंसेची व्याप्ति ... ... ८८
३४ कॉंग्रेसची अहिंसा ... ... ८९
३५ बलात्काराच्या वेळीं ? ... ... ९०
३६ शांततावादाची अग्निपरीक्षा ... ... ९४
३७ आत्मसंरक्षणाचा हक्क ... ... ९९
३८ खरें असल्यास अमानुष ... ... १०१
३९ आत्महत्त्येविषयीं ... ... १०५
४० अहिंसक प्रतिकार व उपवास ... ... १०६

अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानि देव वयुयानि विद्वान्।

युयोध्यस्मज्जुहुराणमेनो
भूयिष्ठां ते नम उक्तिं विधेम॥

★

सर्व मार्गांचें ज्ञान देणाऱ्या हे अग्निदेवा, आमच्या ध्येयप्राप्तीसाठीं आम्हांला सुंदर मार्गानें घेऊन जा. आमच्या कुटिल पापांशीं झुंजून त्यांचें शमन कर, तुला पुनः पुनः नमस्कार असोत.

— ईशोपनिषत्

६२८५

# गांधींची अहिंसा

## : १ :

## तरवारीचें तत्त्वज्ञान

मला असें वाटतें कीं, जर मला भेकडपणा आणि अत्त्याचार या दोहों-तूनच निवड करावयाची झाली तर मी अत्त्याचाराचाच आदेश देईन. माझ्या मुलानें मला प्रश्न विचारला, " १९०८ मध्यें तुमच्यावर प्राणघातक हल्ला झाला त्यावेळीं जर मी हजर असतों, तर मी काय करायला हवं होतं असं तुम्हांला वाटतं ? मी नामर्दासारखं पळून तुम्हांला तसंच ठार मरूं द्यायचं होतं, कीं माझ्या शरीरसामर्थ्याचा उपयोग करून तुमचं संरक्षण करायला हवं होतं. " मीं त्याला सांगितलं कीं, त्यानें प्रसंगीं शारिरीक बळाचा उपयोग करून देखील माझें संरक्षण करण्याचें आपलें कर्तव्य करायला हरकत नव्हती. याच तत्त्वाला अनुसरून मी बोअरयुद्धांत, झुलू बंडांत, व गेल्या युद्धांत भाग घेतलेला होता. म्हणूनच ज्यांचा शस्त्रांस्त्रांवर विश्वास आहे अशांना शस्त्रविद्या शिकवावी असेंहि मी आग्रहपूर्वक सांगत असतों. स्वतःच्या अपमानाचा अगतिक साक्षीदार होणें. किंवा तो भेकड-पणानें गिळून घेणें, यापेक्षां हिंदुस्थाननें हातीं तरवार घेऊन आपल्या स्वाभिमानाचें संरक्षण केलें तरी चालेल.

पण अहिंसा ही हिंसेपेक्षां अगणितपणें श्रेष्ठ आहे, शिक्षेपेक्षां क्षमा करण्यांत अधिक मर्दुमकी असते. क्षमा ही लढवय्याला भूषणकारक असते.

शासन करण्याचें सामर्थ्य आंगीं असलें तरच सहनशीलपणाला क्षमेचें मोल येईल, पण एकाद्या असहाय्य प्राण्यानें क्षमादानाचा आव आणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. उंदीर स्वतःच्या चिंधड्या मांजराला करूं देतो, तो मांजराला क्षमा करतो म्हणून नव्हे. जनरल डायर व त्याच्या लायकीचे अवांतर-लोक यांना कडक शासन करण्यांत यावें, असें म्हणणारांची भावना म्हणूनच मला आवडते. शक्य असतें तर अशांनीं त्याचे राईगणिक तुकडे उडवले असते. पण मला हिंदुस्थान असहाय्य वाटत नाहीं. मीं स्वतःदेखील असहाय्य जीव नाहीं असें मला वाटतें. मात्र मला माझें आणि हिंदुस्थानचें सामर्थ्य सत्कर्मी लावावयाचें आहे.

माझ्याबद्दल विपर्यास होतां कामा नये. केवळ शरीरबळानेंच सामर्थ्य येत नसतें. त्याचा जन्म दुर्दम इच्छाशक्तीतून होतो. तुलनाच करूं गेल्यास सामान्यतः झुलू हा इंग्रजापेक्षां शरीरबळांत श्रेष्ठ ठरेल. पण तो इंग्रजाच्या पोराजवळून देखील पळत सुटतो, याचें कारण त्याला त्या पोराच्या हातांतल्या पिस्तुलाची किंवा तें आपल्यावर झाडणाराची भीति वाटते. स्वतः अंगानें धडधाकट असून देखील तो मरणाला भितो. एक लक्ष इंग्रजांचें तीस कोटी मानवांना भय वाटण्याचें कांहींहि कारण नाहीं, हें आम्हां हिंदुस्थानांतील लोकांना एक क्षण विचार केला तरी कळून येईल. म्हणूनच आत्मबलाची निश्चित जाणीव म्हणजेच निश्चित क्षमादान होय. विवेकी क्षमादानानें आमच्यांत सामर्थ्याची प्रचंड लाट हेलावेल आणि मग एखाद्या डायरला किंवा फ्रँक जान्सनला हिंदुस्थानचें पवित्र मस्तक लाथांखालीं तुडवणें अशक्यप्राय होईल. आमच्यांत त्वेष किंवा सूडभावना उत्पन्न न होण्याइतके आम्ही पददलित झालों आहोंत असें आपल्याला वाटतें. तरीदेखील आपला शिक्षा करण्याचा हक्क दूर सारूनच हिंदुस्थान आपला अधिक फायदा करून घेईल, असें मला निःसंकोचपणानें म्हटलेंच पाहिजे. आपल्याला याहीपेक्षां चांगलें कार्य करावयाचें आहे, जगाला याच्यापेक्षांहि श्रेष्ठ मार्ग दाखवायचा आहे.

मी स्वप्नाळू नाहीं, व्यवहारी आदर्शवादी आहे. अहिंसाधर्म हा केवळ ऋषिमुनी आणि संतमहात्म्यांसाठीं नाहीं, सामान्य जनतेसाठीं देखील तो

योग्य ठरतो. अहिंसा हा जसा मानवांचा विहितधर्म, तसाच पशूंचा हिंसा. पशूचा आत्मा सुप्तावस्थेंत असून, तो केवळ आपल्या शरीरबळावरच विसंबून असतो. आत्मबळाच्या श्रेष्ठत्वाला मान देण्यांतच मानवाचें मोठेंपण आहे.

यामुळेंच मी हिंदुस्थानपुढें आत्मत्यागाचें प्राचीन तत्त्व मांडण्याचें धाडस केलेलें आहे. कारण आत्मक्लेशांचीं नवीं नांवें म्हणजेच सत्याग्रह असहकार व सविनय प्रतिकार होत. हिंसेच्या मध्यांतूनच अहिंसेचें तत्त्व शोधून काढणारे ऋषि हे न्युटनपेक्षांदेखील बुद्धीनें थोर होते; वेलिंग्टनपेक्षां श्रेष्ठयोद्धे होते. शस्त्रांचा उपयोग कसा करावा याची माहिती असल्यामुळेंच त्यांना शस्त्राचें वैय्यर्थ पटलें आणि म्हणूनच शीणलेल्या जगाला त्यांनीं हें शिकवलें कीं, त्याचा उद्धार हिंसेनें होणारा नसून अहिंसेनें होईल.

अहिंसेचें लढाऊ आचरण म्हणजेच स्वेच्छापूर्वक कष्ट झेलणें होय; छळ करणाऱ्याच्या इच्छेला निमूटपणें मान तुकावणें म्हणजे अहिंसा नव्हे, उलट त्याच्या इच्छेच्या प्रतिकारासाठीं आपलें आत्मबळ पणास लावणें म्हणजेच अहिंसा होय. मानवाच्या या आत्मशक्तीच्या प्रभावानें केवळ एका व्यक्तीला देखील एखाद्या अन्यायी साम्राज्याचें एकवटलेलें सर्व बळ प्रतिकारून स्वाभिमान, स्वधर्म आणि स्वत्व यांचें संरक्षण करतां येईल; त्या साम्राज्याचा पाया डळमळीत करतां येईल किंवा त्याच्या उद्धाराचा पाया घालतां येईल.

आणि म्हणूनच हिंदुस्थानला मी अहिंसेचा स्वीकार करायला सांगतों तो, तो दुबळा आहे म्हणून नव्हे. तर आपल्या सामर्थ्याची आणि बळाची योग्य जाणीव ठेवूनच त्यानें अहिंसेचा स्वीकार करावा, अशी माझी इच्छा आहे. आपल्या सामर्थ्याची जाणीव होण्यासाठीं त्याला शस्त्रास्त्राचें शिक्षण नको. आज तें आपल्याला हवेसें वाटतें याचें मूळ आम्ही केवळ लिबलिबीत मांसाचे पुतळे आहोंत असें वाटण्यांत आहे. जगांतलें सर्व शारिरीक बळ एकवटून आलें तरी त्याला तोंड देणारा आणि प्रत्येक शारिरीक दुबळेपणावर मात करणारा अविनाशी आत्मा आपल्याजवळ आहे याची जाणीव हिंदुस्थानला व्हावी अशी माझी इच्छा आहे.

चहुंबाजूंनीं खवळलेला दर्या असलेल्या सुरक्षित लंकेंत रहाणाऱ्या दशमुखी रावणाच्या उद्दामशक्तीविरुद्ध केवळ वानरसेनेच्या जोरावर लढायला रामासारखा सामान्य मानव तयार होतो, याचा अर्थ काय ? आत्मबलानें शरीरबळावर विजय मिळवला असाच नव्हे कां त्याचा अर्थ ? तेंहि जाऊं द्या, पण मी व्यवहाराच्या दृष्टीनें या तत्त्वाकडे पहात आल्यामुळें मला हिंदुस्थानला राजकीय बाबतींत आध्यात्मिक जीवनाची उपयुक्तता पटेपटेपर्यंत वाट बघायची नाहीं. इंग्रजाच्या तोफा, रणगाडे व विमानें यांच्यापुढें आपण दुबळे आणि अगतिक आहोंत असें आज हिंदुस्थानला वाटतें. आणि म्हणूनच आपल्या दुबळेपणामुळें तो अहिंसेचा अंगीकार करतो. तरीदेखील त्याचा उद्दिष्ट परिणाम व्हावयाचा तोच होईल; ब्रिटिशांच्या अन्यायाचें असह्य दडपण त्यामुळें दूर होऊं शकेल. मात्र पुरेशा जनतेनें अहिंसेचा अंगिकार केला पाहिजे.

अत्याचारी चळवळीपेक्षां ही चळवळ मी वेगळीच समजतों; दोहोंची भेसळ करून चालणार नाहीं. स्वभावतः ही चळवळ दुबळी नाहीं म्हणूनच ती फसली, तर लोकांनीं तिचा अंगीकार करण्यांत कुचराई केल्यामुळेंच फसेल; पण ती फसली तर मात्र मग खरा धोका निर्माण होईल. हा राष्ट्राचा अपमान सहन न झाल्यामुळें कांहीं थोर पुरुष क्रोधाविष्ट होऊन हिंसेचा अंगिकार करतील. हिंदुस्थाननें तरवारीचें तत्त्वज्ञान अंगिकारलें तर त्याला क्षणिक विजय मिळतील देखील, पण तेव्हां मला हिंदुस्थानचा अभिमान वाटणार नाहीं. त्यानें आंधळेपणानें युरोपची नक्कल करून चालणार नाहीं. हिंदुस्थाननें तरवारीचें तत्त्वज्ञान अंगिकारलें तर ती माझी अग्निपरीक्षेची वेळ असेल, पण मी माझें कर्तव्य करायला चुकणार नाहीं. या अग्निदिव्यांतून मी पार पडेनच अशी मला आशा वाटते. माझ्या धर्माला भौगोलिक मर्यादा नाहींत. जर माझ्यांतला विश्वास अढळ असेल तर माझ्या हिंदुस्थानवरल्या प्रेमाची भीड न पडता देखील तो टिकाव धरील. हिंदुस्थानच्या सेवेसाठींच मीं माझें जीवित सर्वस्व वाहिलेलें आहे, पण ती सेवा मला माझ्या अहिंसा धर्मानेंच करायची आहे.

यंग इंडिया—११–८–१९२०.

: २ :

# रशिया आणि मी

आजच्या घडीला माझ्या शब्दांकडे अमेरिका व इंग्लंड यांचें लक्ष वेधलेलें असतें, हें मी माझें सुदैव समजतों आणि दुर्दैव देखील. सुदैव अशासाठीं कीं, पाश्चात्य देशांत माझ्या संदेशाचें मनन होतें, अभ्यास होतो. दुर्दैव अशासाठीं कीं, त्याच देशांतून तो संदेश एकतर अजाणता फुगवून टाकतात, नाहींतर मुद्दाम विकृत तरी करतात. प्रत्येक सत्य हें स्वयंभू आणि स्वाभाविक सामर्थ्यानें परिपूर्ण असें असतें. म्हणूनच जेव्हां माझ्या म्हणण्याचा ढोबळ ढोबळ देखील विपर्यास केलेला मला आढळून येतो, तेव्हां मी माझी शांतता ढळूं देत नाहीं. एका मायाळू युरोपियन मित्रानें मला पत्रानें एक इशारा दिलेला आहे. त्यांत असलेली माहिती जर खरी असेल तर असें म्हणावें लागतें कीं, रशियांत माझ्याबद्दल जाणून बुजून किंवा आपाततः गैरसमज पसरवण्यांत येतो. त्याचें पत्र हें असें आहे—

"बर्लिनमधला रशियन प्रतिनिधी क्रेस्टिन्स्की याला गांधींचें अधिकृत स्वागत करण्याबद्दल परराष्ट्रीय मंत्री सांगतील आणि सद्यः परिस्थितीचा फायदा घेण्यासाठीं गांधीच्या अनुयायांमध्यें बोल्शेविक प्रचाराचा प्रसार करण्याचेंहि योजण्यांत येईल. याशिवाय गांधीला रशियांत येण्याबद्दल निमंत्रण करण्याचें काम देखील क्रेस्टिन्स्कीवर सोंपवण्यांत येईल. याशिवाय आशियांतल्या पददलित जनतेमध्यें प्रचारकीवाङ्मयाचा प्रसार करण्यासाठीं पैका खर्च करण्याचा अधिकार देखील त्याला देण्यांत आलेला आहे. ओरिएंटल क्लब व त्याची कचेरी चालवण्यासाठीं एक निधी त्यानें उभारावा व त्या निधीला गांधीचें नांव देऊन त्याच्या मताचे ( कीं मास्कोच्या ? )

असतील त्यांना मदत द्यावी. अखेरीस तीन हिंदूंची या कामीं योजना करण्यांत आली. हें सारें १८ आक्टोबरच्या रुलमध्यें छापण्यांत आलेलें आहे."

या पत्रावरून एक असा पुरावा मिळतो कीं, मला जर्मनी आणि रशिया या देशांना भेट देण्यासाठीं बोलावणार असल्याचा प्रवाद पसरलेला आहे. अर्थात् अशा तऱ्हेचें निमंत्रण मला मुळींच मिळालेलें नाहीं, हें मी सांगायला नकोच. किंबहुना या थोर देशांना भेट देण्याची मला यत्किंचित देखील इच्छा नाहीं. ज्या सत्याचा मीं पुरस्कार केला, त्याचा अजून हिंदुस्थाननेंच पूर्णपणें स्वीकार केलेला नाहीं, याची मला जाणीव आहे. हिंदुस्थानांत अजून माझें कार्य प्रयोगावस्थेंत आहे. अशा वेळीं परदेशांत जाण्याचें धाडस करणें मला सर्वस्वीं अपरिपक्वपणाचें वाटतें. हिंदुस्थानांतच माझा प्रयोग यशस्वी झाला तर मला खूप खूप संतोष वाटेल.

माझा मार्ग स्पष्ट आहे. एखाद्या हिंसक कार्यासाठीं माझा उपयोग करण्याचा कोणताहि प्रयत्न फसणार हें निश्चित. माझ्या पद्धतींत गुप्तपणा नाहीं, सत्यापरता दुसरा मुत्सद्दीपणा माझ्यांत नाहीं. अहिंसेपरतें दुसरें हत्यार मी बाळगीत नाहीं. नेणीवेनें नकळत मी माझ्या मार्गापासून कांहीं काळ दूर सरेन, पण कायमचा मात्र नव्हे. म्हणूनच माझा उपयोग कशा रीतीनें व्हावा, यासाठीं मीं कांहीं मर्यादा घालून दिलेल्या आहेत. आजवर अनेकवार माझा बेकायदेशीरपणें उपयोग करण्याचे प्रयत्न झालेले आहेत; पण माझ्या माहितीप्रमाणें ते सारेच फसले.

प्रत्यक्ष बोल्शेविज्म म्हणजे काय याविषयीं अजून देखील मी अज्ञानांतच आहें. मला त्याचा अभ्यास करणें अजून शक्य झालें नाहीं. कांहीं झालें तरी पुढें मागें रशियाला तो कल्याणकारक ठरेल किंवा नाहीं हेंहि मला सांगतां येत नाहीं. पण ज्या अर्थी त्याचें अधिष्ठान हिंसा आणि नास्तिकपणा आहे, त्या अर्थी तो मला आपल्यापासून दूर लोटतो हें मात्र मला पक्कें माहीत आहे. यशाच्या हिंसक अशा आडरस्त्यावर माझा विश्वास नाहीं. माझ्यावर कृपादृष्टि ठेवणाऱ्या माझ्या बोल्शेविक

मित्रांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, जरी मला उच्च ध्येयें आवडतात आणि त्यांना पाठिंबा द्यावासा वाटतो, तरी पण हिंसक मार्गाबद्दल मात्र आत्यंतिक तिटकारा वाटतो, मग तो कितीहि उदात्त ध्येयपूर्तीसाठीं आचरणांत आणलेला असो. म्हणूनच हिंसेचे पूजारी आणि मी यांना एकत्र येतां येईल असें एकहि समानस्थळ आढळायचें नाहीं. तरी पण माझें अहिंसेचें ध्येय मला अराजक आणि हिंसक लोकांशीं संबंध ठेवायला भाग पाडतें, पण त्यासंबंधाचा एकमेव हेतु त्यांना त्यांच्या चुकलेल्या मार्गापासून परावृत्त करण्याचा असतो. कारण अनुभवानें मला असें शिकविलें कीं, असत्य आणि हिंसा यांपासून कोणाचेंहि चिरंतन कल्याण होणें शक्य नाहीं. ही माझी श्रद्धा एक लाडकें स्वप्न असलें, तरी तें तितकेंच मनोज्ञ आणि आकर्षक आहे, हेंहि कबूल करावें लागेल.

—यंग इंडिया–११–१२–१९२४

: ३ :

# एक प्रश्न

दक्षिण आफ्रिका व इंग्लंड येथें शुश्रूषापथकासाठीं माणसें जमविण्याचें काम केलें आणि हिंदुस्थानांतल्या लष्करभरतीला माणसें मिळवून दिलीं याचें कारण मीं युद्धाला पाठिंबा दिला हें नव्हतें. मी ब्रिटिश साम्राज्याला पाठिंबा देण्यासाठीं हें सारें केलें. कारण तेव्हां माझा त्यांच्या उपयुक्तपणावर अढळ विश्वास होता. आजच्याप्रमाणेंच तेव्हांदेखील मला युद्धाचा तिटकारा वाटत होता, आणि मी आजच्यासारखीच तेव्हां देखील खांद्यावर बंदुक उचलली नसती. परंतु एखाद्याचें आयुष्य म्हणजे एकच सरळ रेषा नसते, तें अनेक परस्पर विरोधी कर्तव्यांचा भारा असतें; आणि या आणि त्या कर्तव्यामधून निवड करण्याची जबाबदारी सतत

एकाद्यावर घालण्यांत येते. नागरिक या नात्यानें नव्हे तर युद्ध संस्थे-विरुद्ध चळवळ करणारा एक सुधारक या नात्यानें मला अशा लोकांचें नेतृत्व स्वीकारावें लागलें, कीं ज्यांचा युद्धावर विश्वास असून देखील भेंकडपणा किंवा ब्रिटिशाबद्दल वाटणारी अढी यांच्यामुळेंच ते लष्करांत भरती व्हायला तयार नव्हते. त्यांना उपदेश करण्याचें कार्य मला करावें लागलें. तसें करतांना मला जरा-देखील खंत वाटली नाहीं. कारण ज्या अर्थीं त्यांचा युद्धावर विश्वास होता व ते ब्रिटिशनिष्ठ होते त्याअर्थीं लष्करांत नांव नोंदवणें हें त्यांचें कर्तव्यच होतें. जरी माझा स्वतःचा शस्त्रांचा उपयोग व्हावा यावर विश्वास नसला आणि मी जरी अहिंसा धर्माचा पुरस्कर्ता असलों, तरी पण शस्त्र बंदीचा कायदा रद्द करण्यासाठीं चळवळ झाली तर मी तींत बेधडक उडी घालीन. कारण हत्यारांचा कायदा म्हणजे ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानविरुद्ध केलेलें एक काळेकुट्ट अपराधाचें कृत्य, असें मी मानीत आलों आहें. ' ठोशाला ठोसा ' या तत्त्वावर माझा विश्वास नाहीं, पण चार वर्षांपूर्वीं बेत्तियाजवळच्या खेडूतांना मीं न कचरतां सांगितलें होतें कीं, " तुम्हांला अहिंसेची जाणीव देखील नसतांना तुम्हीं केवळ भेंकडपणामुळें शस्त्रांचा उपयोग केला नाहीं व स्वतःच्या बायकांची अब्रू व मालमत्ता यांचें संरक्षण न करण्याचा अपराध केला ! " नुकताच मीं हिंदूंना देखील उपदेश दिला-कीं, जर तुमची अहिंसेवर अढळ श्रद्धा नसेल आणि ती तुम्हांला आचर-णांत आणतां येणें शक्य नसेल तर खुशाल शस्त्रांचा उपयोग करा आणि तुमच्या बायका पळवून नेणाऱ्यांपासून त्यांचें संरक्षण करा. हा सगळा उप-देश आणि माझा मागला अनुभव याची माझ्या अहिंसेवरील अढळ श्रद्धेशीं जरा देखील विसंगति नाहीं, उलट तिचा हा प्रत्यक्ष परिणामच्च आहे. अहिंसेचें उच्च तत्त्व नुसतें सांगणें अत्यंत सोपें आहे, पण तें सम-जावून घेणें व त्याप्रमाणें आचरण ठेवणें, हें या विकारी, झगडेखोर जगांत किती कठीण आहे, हें मी दररोज पहात आलोंच. एक अग्निपरीक्षा आहे ती. पण येवढें मात्र खरें कीं, अहिंसेवांचून जीवनाला मोल येत नाहीं, याची मात्र मला दररोज अधिकाधिक खात्री वाटूं लागलेली आहे.

—यंग इंडिया ५-११-१९२५

: ४ :

# माझें युद्धसहकार्य

व्यक्तिशः जरी मी युद्धविरोधी होतों तरी देखील युद्धाचा परिणामकारक असा अहिंसात्मक विरोध करण्याइतक्या दर्जाचें व्यक्तिमत्त्व माझ्या आंगीं तेव्हां आलेलें नव्हतें. अहिंसात्मक प्रतिकार करण्याच्या आधीं कांहींतरी निरपेक्ष सेवा त्या व्यक्तीकडून घडावी लागते, त्याच्या हृदयांतला कांहींतरी स्नेहभाव व्यक्त व्हावा लागतो. उदाहरणादाखल सांगायचें म्हणजे पशुबळी देणाऱ्या एखाद्या रानटी इसमाला तसें करूं नकोस म्हणून सांगण्यापूर्वीं त्यानें माझ्या चांगुलपणामुळें आणि इतर गुणांमुळें आपला मित्र म्हणून मला मानायला हवें. जगानें केलेल्या अनेक दुष्कृत्यांचा न्याय करण्याचें काम मी करीत नाहीं. मी स्वतःच अजून अपूर्ण असल्यामुळें, सहिष्णुता आणि सहानुभूति मिळावी म्हणून मी जगाचे दोष संहन करतों. हे दोष नष्ट करण्याचा मार्ग सांपडेपर्यंत मी ते सहन करीन. मीं पाहिलें कीं, पुरेशी सेवा करून जर मला साम्राज्याचीं युद्धें व त्यांच्या तयारी यांना विरोध करण्याचें सामर्थ्य माझ्या आंगीं आलें तर बरें. मी माझ्या जीवनांत अहिंसेचें बळ सामावत आलोंच होतों, तेंच बळ जनतेंत कितपत पसरूं शकतें याची मला कसोटी बघायची होती.

दुसरा असाहि एक हेतु होता कीं,साम्राज्यांतल्या मुत्सद्यांचा चांगुलपणाचा फायदा घेऊन या मार्गानें आपली स्वराज्याची लायकी सिद्ध करावी. ही लायकी पटवण्यासाठीं मला साम्राज्यांच्या जीवनमरणाच्या लढायांत भाग घेण्याखेरीज अन्यमार्ग नव्हता. मात्र हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, मी हें सारें १९१४ च्या वेळीं माझी जी मनःस्थिति होती त्याला अनुसरून लिहीत आहे. तेव्हां माझा साम्राज्यावर विश्वास होता. हिंदुस्थानला त्याच्या

स्वातंत्र्याच्या लढ्यांत तें स्वेच्छेनें सहाय्य करील असें मला वाटत असे. आज जसा मी अहिंसक बंडखोर बनलेलों आहें, तसाच त्यावेळीं असतो तर मीं मदत तर केलीच नसती, उलट अहिंसेला संमत असलेल्या हर प्रयत्नानें तसले मदतीचे प्रयत्न उधळून लावले असते.

माझा युद्धाला असलेला विरोध आणि युद्धावर असलेला अविश्वास आजच्याप्रमाणेंच तेव्हांदेखील तितकाच तीव्र होता. पण या जगांत अशा अनेक गोष्टी आहेत कीं, त्या आपल्याला मनापासून आवडत नसल्या तरी त्या आपण करतोंच. जितका माझा युद्धाला विरोध आहे, तितकाच एखाद्या क्षुद्र जंतूचा देखील जीव घेण्याला आहे. पण कधीं काळीं अशा हत्त्या कराव्या लागणार नाहीं, अशा आशेनें माझ्या हातून त्या घडत असतीलच. तरीपण अहिंसेचा अभिमानी म्हणून घेण्यासाठीं मला माझे प्रयत्न प्रामाणिकपणें, चिकाटीनें आणि सतत चालवलेच पाहिजेत. अंगीं-पूर्णपणें अहिंसा बाणली कीं, मग त्या स्त्रीला किंवा पुरुषाला मोक्ष प्राप्ती झाली असें म्हणतां येईल. इतर वस्तूप्रमाणेंच स्वतःच्या देहावर देखील मालकी असल्याची भावना म्हणजे थोडी फार हिंसाच म्हटली पाहिजे.

परस्परांना विरोधी अशा घटनाक्रमांतून स्वतः आपला कर्तव्यपथ शोधून काढणें इतकें सहज नसतें हेंहि तितकेंच खरं.

कर्मण्येवाधिकारस्ते, माफलेषुकदाचन ! हें गीतेंतलें सूत्र दुहेरी अर्थानें खरें आहे. पहिला अर्थ असा कीं, आपल्या कृतींमागें कोणताहि स्वार्थ दडलेला असूं नये. स्वराज्य मिळविणें हें कांहीं आपमतलबाचें नाहीं. दुसरा अर्थ म्हणजे असा कीं, कर्माची फलाशा न बाळगणें म्हणजे कांहीं कर्मा-पासून परावृत्त होणें नव्हे. किंवा त्याच्याबद्दल अज्ञानी असणेंहि नव्हे. निष्काम असणें याचा अर्थ निष्क्रीय होणें नव्हे, कर्माचें फळ मिळेलही, किंवा मिळणारहि नाहीं. पण निष्काम कर्म करीत राहणें याचाच अर्थ कधींना कधीं तरी त्याचा गोड शेवट होईल याची खात्री बाळगणें होय.

—यंग इंडिया, १५-३-१९२८

: ५ :

# महान् शक्ति

माझ्या प्रत्येक चळवळीचें मूळ अहिंसेंत असतें, आणि म्हणूनच सध्यां मी ज्या तीन सार्वजनिक चळवळींसाठीं आपलें शक्तिसर्वस्व वेंचीत आहे त्यांचें देखील मूळ अहिंसेंतच आहे. या तीन चळवळी म्हणजे खादी, अस्पृश्यतानिवारण आणि खेड्यांचा पुनरुद्धार या होत. माझी चवथी आवडती चळवळ म्हणजे हिंदुमुस्लीम ऐक्याची होय. पण त्या बाबतींत मात्र मी वरवर पाहिलें, तर पराभव खाल्लेला आहें. पण याचा अर्थ जनतेनें असा करूं नये कीं मी त्याबाबतींतले आपले प्रयत्न सोडून दिलेले आहेत. माझ्या हयातींत कदाचित् नसेल, पण माझ्या मृत्यूनंतर तरी हिंदु आणि मुसलमान या दोघांनाही असें कळून येईल कीं, मीं माझे जातीय ऐक्याचे प्रयत्न केव्हांहि सोडून दिलेले नव्हते.

अहिंसेचे ब्रीद हें सर्व व्यापी असलें पाहिजे. एका चळवळींत अहिंसावादी असायचें आणि दुसरींत हिंसावादी असें वरून चालणार नाहीं. तसें करणें हें एक धोरण ठरेल; जीवनशक्ति नव्हे. यामुळेंच मी इटालीनें अबिसीनियाविरुद्ध पुकारलेल्या युद्धाविषयीं उदासीन वृत्ति ठेवूं शकत नाहीं. पण या बाबतींत मला माझें मत व्यक्त करण्याबद्दल आणि देशाला मार्गदर्शन करण्याबद्दल जो आग्रह करण्यांत आला तो मी अमान्य केला. मात्र सत्य आणि अहिंसा यांच्यासाठीं कधीं कधीं आत्मनिवेदन आवश्यक असतें. हिंदुस्थाननें जर राष्ट्र या नात्यानें पूर्णपणें अहिंसा स्वीकारली असती, तर मीं त्याचें मार्गदर्शन करण्यास आगेमागें पाहिलें नसतें. पण या देशांतल्या लक्षावधि जनतेवर माझा बराचसा प्रभाव असला तरी मला त्या प्रभावाच्या सीमा माहीत आहेत. अनादिकालापासून हिंदुस्थाननें

अहिंसेची अखंड परंपरा कायम राखलेली आहे, पण माझ्या माहितीप्रमाणें त्याच्या प्राचीन इतिहासांत देखील कोणत्याहि कालखंडांत त्यानें सर्व भूमीला व्यापून टाकणारे अहिंसेचें अग्निदिव्य केलेलें नाहीं. तें कसेंहि असलें, तरी मानवतेला अहिंसेचा दिव्यसंदेश देण्याचें भाग्य हिंदुस्थानच्या वाट्यास येणार असा मला अढळ विश्वास वाटतो. या माझ्या कल्पनेला प्रत्यक्षांचें गोड फळ यायला कदाचित् युगें लागतील. पण माझ्या निष्कर्षांवरून मी असेंच म्हणेन कीं, हा दिव्य संदेश देण्यांत हिंदुस्थानच इतर देशाच्या पुढें सरसावणार.

उद्यां या अद्वितीय महाशक्तीमुळें एवढें हें होणारच, पण सहजगत्या परवां एका मित्रानें विचारलेले प्रश्न असे होतेः—

( १ ) तुटपुंजी शस्त्रें धारण करणारे ॲबिसिनियन, शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असलेल्या इटालियनांविरुद्ध काय करूं शकतील ? समजा, ते अहिंसापालन करणारे असते तर काय करूं शकले असते ?

( २ ) राष्ट्रसंघाचा सर्वश्रेष्ठ आणि शक्तिमान् सभासद असलेल्या इंग्लंडनें, समजा तुमच्या निकषावर घासून पुसून निर्दोष ठरलेली अहिंसा स्वीकारली, तर तिनें इरेस पेटलेल्या इटलीविरुद्ध कोणती उपाययोजना अंमलांत आणावी ?

( ३ ) समजा, एकाएकीं हिंदुस्थाननें तुमच्या अहिंसेच्या अटी पाळून अहिंसावाद स्वीकारला, तर त्यानें पुढें काय करावें ?

या सगळ्या प्रश्नाचीं उत्तरें देण्यापूर्वी मला माझ्या अहिंसेचीं पांच प्रमेयें सांगितलीं पाहिजेत.

( अ ) मानवी प्रयत्नाच्या आटोक्यांत असलेली आत्मशुद्धि अहिंसेत अंतर्भूत होते.

( ई ) माणसामाणसांच्या दृष्टीनें विचार केला तर अहिंसेचें सामर्थ्य, त्या अहिंसावादी व्यक्तीच्या आंगीं जें हिंसा करण्याचें शरीरबळ ( इच्छा नव्हे ) असतें, त्याच्या बरोबरीचें असतें.

( ऊ ) अहिंसा ही हिंसेपेक्षां निरपवाद श्रेष्ठ आहे. याचा अर्थ असा कीं, हिंसेचा अवलंब करून एखादी व्यक्ति जितकी सामर्थ्यशाली ठरली असती, त्यापेक्षां अधिक सामर्थ्यवान् ती अहिंसेचा स्वीकार करून बनते.

( ऐ ) अहिंसेंत पराभवाला स्थान नाहीं. खात्रीपूर्वक पराभवानेंच हिंसेचा शेवट होतो.

( ओ ) अहिंसेसंबंधीं बोलायचेंच झालें तर असें म्हणतां येईल कीं, अहिंसेचा गोड शेवट विजयानें होतो. पण वास्तविक पहातां अहिंसेंत विजय आणि पराभव यांना मुळीं स्थानच नसतें.

आतां या प्रमेयाच्या आधारानें वरच्या प्रश्नाचीं उत्तरें सांगतां येतील.

( १ ) ॲबिसिनिया अहिंसावादी राष्ट्र असतें तर त्याच्याजवळ शस्त्रें मुळींच नसतीं. राष्ट्रसंघ किंवा इतर बलवान देश यांच्याकडे दाद मागून त्यानें त्यांच्या सशस्त्र सहाय्याची याचना केली नसती. त्यानें मुळीं आगळी-कीला कांहीं कारण देखील दिलें नसतें. जर ॲबिसिनियनांनीं स्वखुषीनें किंवा जबरीनें इटालीशीं सहकार्य करण्याचें नाकारून सशस्त्र प्रतिकार केला नाहीं तर मग इटाली जिंकणार तरी काय ? या अशा परिस्थितींत इटालीच्या ताब्यांत प्रदेश येईल, पण जनता येणार नाहीं. इटालीचा केवळ तोच उद्देश नाहीं. त्याला त्या सुंदर देशातल्या जनतेला देखील नमवायचें आहे.

( २ ) इंग्रजांनीं राष्ट्र या नात्यानें मनापासून अहिंसा स्वीकारायची म्हटली तर ते आपला साम्राज्यवाद सोडून देतील, आणि मग ते शस्त्रास्त्रांचा उपयोगहि करणार नाहींत. या त्यागाच्या कृत्यामुळें निर्माण झालेल्या नैतिक सामर्थ्यामुळें प्रभावित झालेला इटाली आपले हेतु सोडून देईल. मग इंग्लंड हें माझ्या सिद्धांताचें जीवंत उदाहरण म्हणून दाखवितां येईल. युगयुगांतरीचा महान् चमत्कार म्हणून या मतपरिवर्तनाबद्दल म्हणतां येईल. आणि अजूनहि जर अहिंसा म्हणजे एक शेखमहंमदाचें स्वप्न नसेल तर कधीं ना कधीं तरी अशा प्रकारची घटना जगांत घडून येईल. मी त्याच श्रद्धेवर जगतों आहें.

( ३ ) शेवटच्या प्रश्नाचें उत्तर हें असें देतां देईल. मी सांगितलेंच आहे कीं, हिंदुस्थान राष्ट्र या नात्यानें अजून पूर्णपणें अहिंसक झालेलें नाहीं. मात्र त्याला हिंसात्मक मार्गानें जाण्याची देखील ताकद कमी नाहीं, पण याचें कारण मात्र तो निःशस्त्र आहे हें नव्हे. शूरांच्या प्रत्यक्ष ताब्यांत शस्त्रें असावींच लागत नाहींत. त्याची अहिंसा ही दुबळ्यांची आहे. नित्याच्या आचरणांत देखील तो दुबळेपणा त्याला दगा देत असतो. आज जगांत त्याचें स्थान एका मोडकळीस आलेल्या राष्ट्राचें आहे. मी हें केवळ राजकीय दृष्टीनें बोलत नाहीं तर अहिंसक नैतिक दृष्टीकोनांतून देखील सांगत आहे. शारीरिक प्रतिकार करण्याची कुवत त्याच्या अंगीं नाहीं. आपल्या सामर्थ्याची त्याला जाणीव नाहीं. जाणीव आहे ती केवळ आपल्या दुबळेपणाची. जर त्याला आत्मसामर्थ्याची जाणीव असती तर मग जातीय किंवा राजकीय प्रश्न उपस्थित झालेच नसते. इंग्रजांनीं आपली विश्वासघातकी विजेत्याची भूमिका सोडून दिली असती. आपण राजकारणाबद्दल मनःपूत बोललों आणि इंग्रजांना सकारण दोष दिला तरी हिंदी या नात्यानें आपण एक क्षणभर जरी स्वतःला बलाढ्य कल्पून त्यांच्यावर आघात करण्याचें धिःकारलें तर मग मात्र आपल्याला इंग्रज शिपाई, व्यापारी किंवा राज्यकर्ते यांचें भय वाटणार नाहीं व ते देखील मग आमच्याबद्दल साशंक रहाणार नाहींत. म्हणूनच आपल्याला जर खरोखरच अहिंसक व्हावयाचें असेल तर आपल्या प्रत्येक कृत्यांत आपण इंग्रजांना बरोबरीनें घेऊं. दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे आपण संख्येनें कोट्यावधि असल्यामुळें आमचें नैतिक सामर्थ्य जगांत वाढेल आणि इटाली आमच्या मित्रत्वाच्या शब्दाला मान दिल्याशिवाय रहाणार नाहीं.

स्वयंसिद्ध असें प्रमेय कशाबशा गडबडगुंड्यानें मी सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहें असें आतां वाचकांना वाटत असेल. जोंपर्यंत मला भूमीतीचें पूर्ण ज्ञान नव्हतें, तोंपर्यंत युक्लीडचे बारा सिद्धांत वाचतांना माझें डोकें भणाणून जात असे. पण माझें लक्ष जडल्यावर मात्र मग मला भूमिती म्हणजे शिकण्यायोग्य एक सोपें शास्त्र वाटूं लागलें. अहिंसेच्या शास्त्रा

बाबतींत देखील असेंच म्हणावें लागेल. अनुभव आणि श्रद्धा यांच्यावरच तें उभारलेलें आहे. आणि ठराविक मर्यादेनंतर तेथें युक्तिवाद लंगडा पडूं शकेल. जोंपर्यंत जग अहिंसेवर विश्वास ठेवण्यास तयार नाहीं तोंपर्यंत त्यानें चमत्कारासाठीं तिष्ठत बसावें, म्हणजे त्याला सामुदायिक रित्या अहिंसेचें प्रचंड प्रदर्शन बघायला मिळूं शकेल. हें सारें मानवी स्वभावाला सोडून आहे असें लोकांचें म्हणणें आहे. त्यांच्यामतें अहिंसा ही केवळ व्यक्तीलाच योग्य असते. असें जर आहे, तर मग पशु आणि माणूस यांत कसल्या तऱ्हेचा फरक आहे बरें ?

हरिजन, १२–१०–१९३६

: ६ :

# दिव्य संदेश

चिरंतन शांततेच्या संभाव्यतेवर विश्वास ठेवण्याचें नाकारणें म्हणजेच मानवी स्वभावांत दैवीपणा असूं शकतो हें नाकारणें होय. आजपर्यंत अंमलांत आणलेले उपाय फसले याचें कारण, अंमलांत आणणाऱ्यांच्या मनांतच त्यांच्याविषयीं अढळ श्रद्धेचा अभाव होता. हा अभाव त्यांना जाणवला मात्र नाहीं. शांतता प्रस्थापित करायची झाली तर त्याच्यासाठीं जे उपाय योजावयाचे ते पूर्णपणें योजले पाहिजेत. रासायनिक द्रव्यें तयार करतांना सर्वच कृती जशी यथासांग न चुकतां व्हायला हवी, तसेंच या उपायांचे आहे. विनाशांच्या यंत्रसाधनांवर ताबा असलेले मानवांचे मान्य पुढारी जर त्या साधनांचा उपयोग करण्याचें सर्वस्वीं सोडून देतील तरें शांतता चिरकाळ टिकूं शकेल. जगांतल्या बलाढ्य राष्ट्रांनीं आपलें साम्राज्यवादी धोरण आणि हेतु सोडून दिल्याशिवाय असें घडणें सुतराम् शक्य नाहीं. हेंहि

आणखी अशक्यच दिसतें. कारण त्यासाठीं या बलाढय राष्ट्रांनीं आत्म्यांचा नाश करणाऱ्या चढाओढी आणि गरजांची गणित श्रेढीनें वाढ करण्याचें सोडून दिलें पाहिजे म्हणजे मग त्यांना आपल्या भौतिक अधिकारविस्ताराची गरज उरणार नाहीं. साकार ईश्वराबद्दल अश्रद्धा बाळगण्याची प्रवृत्ति या दुष्ट घटनेच्या मागें आहे असा मला ठाम विश्वास वाटतो. येशू खिस्त हा शांततेचा सम्राट मानून त्याच्या संदेशावर विश्वास ठेवण्याचा डौल मिरवणाऱ्या या पृथ्वीतलावरील मानवांनींच प्रत्यक्ष आचरणांत मात्र त्याच्या विरुद्ध जावें ही एक केवढी शोककारक घटना म्हटली पाहिजे. प्रामाणिक खिस्ती देखील येशूचा संदेश कांहीं निवडक व्यक्तीपुरताच मर्यादित ठेवूं इच्छितात हें देखील अत्यंत दुःखदायक वाटतें.

एका तरी मोठया राष्ट्रानें जर लोकोत्तरत्यागाचें अग्निदिव्य करून दाखवलें तर जगांत चिरंतन शांतता नांदल्याचें दृश्य आपणांपैकीं बऱ्याच जणांना पहायचें भाग्य लाभेल.

—हरिजन १६–५–१९३६.

: ७ :

# आमचें अपयश

कॉंग्रेसचें मुख्य स्थान असलेल्या अलाहाबादला जातीय दंग्याचा डोंब उफाळून यावा आणि तो आटोक्यांत आणण्यासाठीं पोलीस आणि लष्कर यास सहाय्य मागण्याची पाळी यावी, यांचा निष्कर्ष असा कीं, ब्रिटिश सत्तेची जागा भरून काढण्याची लायकी अजून कॉंग्रेसला प्राप्त झालेली नाहीं. हें नागडें सत्य दुःखद असलें तरी तें आपण मान्य करणेंच बरें. आपण अखिल भारताची प्रतिनिधी असल्याचा दावा कॉंग्रेस करीत असते, तिच्या

पटावर नोंदलेल्या थोड्याशा सभासदांची नव्हे. जे तिच्याविरुद्ध आहेत आणि तिचा नाश करायला देखील टपलेले आहेत, त्यांचेंदेखील प्रतिनिधीत्व तिनें केलें पाहिजे. जोंपर्यंत आम्हीं हा आपला प्रतिनिधीत्वाचा हक्क शाबीत करूं शकत नाहीं तोंपर्यंत ब्रिटिश सरकारला स्थानभ्रष्ट करून स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें आम्हीं जगूं शकणार नाहीं. ब्रिटिश सरकारला स्थानभ्रष्ट करतांना आपण अहिंसक उपाय योजले काय, किंवा हिंसक योजले काय आतांचें हें विधान मात्र तसेंच कायम राहील.

हे दंगे आणि अशा कांहीं इतर घटना लक्षांत घेतां जर आपल्याशींच आपण विचार केला तर कॉंग्रेसचें बळ वाढत आहे असें आपल्याला आढळून येईल अशा तऱ्हेची खात्री पटल्याचा गुन्हा माझ्या हातून घडला हें मला कबूल केलेंच पाहिजे, पण तसें करण्यांत मी खरेंच घाई केली होती कां ?

कॉंग्रेसचें बळ वाढलें याचें कारण तिनें अधुरें कां होईना पण अहिंसेचें धोरण स्वीकारलें, असा मला अढळ विश्वास आहे. पण आतां कॉंग्रेसनें अंगिकारलेल्या अहिंसेचें परीक्षण करण्याची वेळ आलेली आहे. ही अहिंसा असहाय्य दुबळ्या अशांची आहे कीं, बलवान् शूरांची आहे ? ती जर दुबळयांची असेल तर ती आम्हांला आमच्या ध्येयाकडे नेऊं शकत नाहीं. मग आम्ही कितीहि दीर्घ काळ ती आचरणांत आणली तरी देखील आम्ही स्वराज्याचा कारभार चालवायला नालायक ठरूं. दुबळे आणि अगतिक हे अहिंसेला कवटाळतात. कारण त्यांना अन्य मार्गच नसतो; त्यांच्या अंतःकरणांत त्यावेळीं हिंसेचें थैमान चाललेलें असते, ते केवळ आघात करण्यासाठीं संधि मिळण्याची वाट बघतात. म्हणूनच कॉंग्रेसजनांना व्यक्तिशः आणि संघशः आपली अहिंसा पारखून पाहणें आतां आवश्यक आहे. जर आपल्या अहिंसेचा उगम खऱ्या बळामधून झालेला नाहीं असें त्यांना वाटत असेल, तर प्रामाणिकपणानें त्यांनीं तसें जाहीर करून आपल्या वागणुकींत बदल करणें हेंच युक्त होईल.

गेल्या सतरा वर्षांच्या अहिंसेच्या संवयीनंतर कॉंग्रेसला वास्तविक पहातां पोलीस आणि लष्कर यांची गरज ज्या ज्या वेळीं लागते त्या त्या

वेळीं कामीं पडणाऱ्या अहिंसक स्वयंसेवक पथकांची उभारणी करायला हवी होती. या अहिंसादलांत एकदोन हजारच नव्हे तर लक्षावधि सैनिक असायला हवे होते. म्हणजे शांतता प्रस्थापित करण्यासाठीं आपले प्राण धोक्यांत घालणारा एक पशुपतिनाथगुप्ता न दिसतां शेकडोंजण पुढें आले असते.

अहिंसा दलाचें कार्य सशस्त्र लष्कराच्या कार्यासारखें नाहीं, मग तें शांततेच्या वेळीं असो कीं दंग्याधोप्याच्या वेळीं. त्यांना सतत विधायक चळवळींत गुंतून रहावें लागेल आणि त्यामुळें दंग्याची शक्यताच मुळीं रहाणार नाहीं. परस्परांवर गुरगुरणाऱ्या जमातींना एके जागीं आणून त्यांच्यांत सख्य निर्माण करण्याचें प्रसंग साधणें, आपला अहिंसेचा व शांततेचा प्रचार करणें, आपापल्या विभागांतील प्रत्येक स्त्री-पुरुष-आबाल-वृद्धांशीं स्नेह जोडणें हीं सगळीं कर्तव्यें त्यांना पार पाडावीं लागतील. कोणत्याहि आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड देतांना प्रसंगीं खवळलेल्या जमावाच्या रागाला आपल्या प्राणाचे बळी समर्पण करणारे स्वयंसेवक ज्यांत असतील असें एक अहिंसादल तयार केलें पाहिजे. बळी जाणारे शंभर असतील, नाहींतर हजार असतील पण असे निष्कलंक जीव बळी गेले, कीं मग दंग्याचें नांव देखील उरणार नाहीं. जमावाच्या क्षोभाला आपल्या प्राणाचे स्वेच्छेनें बळी देणारे शेंदोनशें तरुण स्त्री-पुरुष पुढें आले तर त्यांचें कृत्य अधिक सुलभ आणि शौर्याचें ठरेल आणि अशा वेडाचारांचा बंदोबस्त लष्कर व पोलीस यांच्यापेक्षां अधिक चांगल्या मार्गानें होईल.

आपल्याला स्वातंत्र्य मिळालें, कीं मग दंगेधोपे व्हायचे थांबतील असें कित्येकांना वाटतें. पण मला तरी ती एक फोल आशा वाटते. कारण आतांच स्वातंत्र्याच्या लढ्यांत आम्ही प्रत्येक प्रसंगीं समजून उमजून देखील अहिंसेचें तंत्र वापरीत नाहीं किंवा तें समजून घेण्याची खबरदारी घेत नाहीं. ज्या अर्थी काँग्रेसमंत्र्यांना देखील पोलीस आणि लष्कर यांची मदत घेणें भाग पडलें त्या अर्थी आपण आपल्या पराभवाची कबूली ही दिलीच पाहिजे. पण त्या मंत्र्यांना याशिवाय अन्य तरणोपाय नव्हता हेंहि दुर्दैवानें

कबूल करणें भाग आहे. आपल्याला हें अपयश कां पत्करावें लागलें याचा प्रत्येक काँग्रेसजनानें विचार केला पाहिजे. त्यांना माझ्याप्रमाणेंच वाटत असेल तर मग खात्रीनें आपण अपयशी ठरलों.

हरिजन–२६–३–१९३८

: ८ :

# ध्येयाकडे

सत्य आणि अहिंसेच्या मार्गाला वस्तऱ्यासारखी तीक्ष्ण धार असते. दैनंदिन आहारापेक्षां देखील तिचें रोजचें आचरण अधिक महत्त्वाचें असतें. योग्य आहारानें शरीराचें पोषण होतें, अहिंसा योग्य रीतीनें आचरली तर आत्म्याचें सामर्थ्य वाढतें. शारीरिक अन्न हें मोजक्या परिमाणांत ठराविक वेळीं घेणें शक्य असतें, अहिंसा हें आत्म्याचें अन्न असल्यामुळें तें सतत घेणेंच योग्य असतें. त्या बाबतींत तृप्ती ही होऊंच शकत नाहीं. मी माझ्या ध्येयाकडे चाललों आहें याची जाणीव प्रत्येक क्षणाला ठेवून मला त्या ध्येयदृष्टीमधून आत्मपरीक्षण करायला हवें.

अहिंसेचें पहिलें पाऊल घालणें म्हणजेच आपल्या दैनंदिन जीवनांत परस्परांच्याबद्दल सत्यवादीत्व, नम्रपणा, सहिष्णुता आणि प्रेमळ दयाभाव यांची जोपासना करणें होय. प्रामाणिकपणा हें सर्वोत्कृष्ट धोरण ठरतें अशी एक म्हण इंग्रजींत आहे. पण अहिंसेच्या परिभाषेंत सांगायचें म्हणजे प्रामाणिपणा हें नुसतें धोरणच नसतें. राजकारण हें वेळोवेळीं बदलूं शकतें, पण हें कधींहि न बदलूं शकणारें ब्रीद आहे. तुमच्याभोंवतीं हिंसेच्या भडकत्या ज्वाला पसरलेल्या असतांना देखील तुम्हीं अहिंसेची कांस सोडतां कामा नये. अहिंसावादी माणसाविरुद्ध अहिंसेचें आचरण केलें म्हणजे कांहीं

विशेष घडलें असें मी मानीत नाहीं. अशा वेळीं त्याचें तें कृत्य अहिंसेला धरून होतें किंवा काय याचाहि निवाडा करणें कठीण होतें. परंतु जेव्हां अहिंसा हिंसेचा प्रतिकार करण्यासाठीं, उपयोगांत आणली जाते, तेव्हां मात्र दोहोंतला विरोध आपल्या ध्यानांत येऊं शकतो. संयुक्तप्रांतांत झालेल्या दंग्यांचा माझ्यावर खूपच परिणाम झाला आणि मी त्यासंबंधीं मौलाना आझाद आणि बोस बंधू यांच्याशीं अहिंसेच्या दृष्टिकोनामधून चर्चा देखील केली. आम्हीं आमच्या ध्येयाकडे जात नसून ध्येयापासून दूर सरत आहोंत असें मला वाटलें. हरिपुरा येथें मला सकारण आशा वाटली कीं आपलें बळ वाढत असून, आपल्या उणीवा लक्षांत घेतल्या तरी मला 'याच देहीं याची डोळां' स्वराज्य बघायला मिळेल. एका वर्षांत आपण आपलें बळ वाढवूं असें मला वाटलें होतें. पण अलाहाबाद आणि इतर ठिकाणीं जे दंगे झाले त्यामुळें मला मोठा धक्का बसला. लाजिरवाणी गोष्ट अशी कीं लष्कर आणि पोलिस यांची मदत घेणें आम्हांला भाग पडलें.

समजा उद्यां व्हाइसराय यानीं कॉंग्रेसच्या अध्यक्षांना भेटीला बोलावलें आणि कॉंग्रेसच्या अटी विचारल्या, तर अध्यक्षांना खात्रीपूर्वक असें म्हणतां येईल का, कीं कॉंग्रेस राज्यकारभार चालवण्यास समर्थ आहे, आतां ब्रिटिशांनीं खुशाल जावें; म्हणूं शकतील ते असें ? आम्हीं लष्कर आणि पोलिस यांच्या मदतीवाचून राज्यकारभार खरेंच चालवूं शकूं ? आपण जमीनदार, संस्थानिक आणि मुसलमान यांच्याशीं तडजोड करूं शकूं ? शंका वाटते मला. प्रामाणिकपणानें बोलायचें झालें तर सहजासहजीं त्यांची आपली तडजोड होणार नाहीं. तरीपण आपल्यांत खरी अहिंसा बाणली असती तर आपण हें सारें कांहीं करूं शकलों असतों.

म्हणूनच मी तुम्हांला आणि स्वतःला असें सांगतों कीं आमची अहिंसा ही दुबळ्यांची आहे, बलवानाची जशी असते तशी नाहीं. दुबळ्यांच्या हातून एका विवक्षीत मर्यादेपर्यंत ती प्रभावी ठरते हें देखील खरें, आतां-पर्यंत ती आपल्या कामीं पडली पण जेव्हां ती आमच्या दुबळेपणावर आवरण घालूं लागते तेव्हां ती आम्हांला षंढ बनवते. अशा रितीनें षंढ बनण्यापेक्षां शारीरिक बळाचा उपयोग करणारांचें शौर्य अधिक चांगलें.

भेंकडपणा स्विकारण्यापेक्षां लढतांना मरणाला कवटाळणें पत्करेल. मूलतः आम्हीं बहुधा पशु होतों आणि हळू हळू उत्क्रांति होत होत आम्हीं पशूचे मानव झालों. अशा रितीनें पाशवी शक्तीसह आपण जन्मास आलों तरी माणसें आहोंत व आपल्याला आपल्या अंतरात्म्यांतल्या परमेश्वराचा शोध लावायचा आहे. मानवांना हें एक वरदान आहे व त्याच्यामध्यें आणि पशूकोटीमध्यें हाच एक महत्वाचा फरक आहे. पण ईश्वराचा साक्षात्कार व्हायला त्याचें सर्वांभूतीं असलेलें अस्तित्व अनुभवायला हवें, म्हणजेच आपण सर्वांभूतीं समरस व्हायला हवें. आपण आपल्या शारिरीक बळाचा उपयोग करण्याचें स्वच्छेनें सोडून दिल्याशिवाय, आणि आपल्या अंतःकरणांत सुप्तपणें वास करणारी अहिंसेची प्रवृत्ति जागृत झाल्याशिवाय हें होणें शक्य नाहीं. हें सारें आपल्या सामर्थ्यावर अवलंबून आहे. आपल्या जवळ बलवानाची अहिंसा आहे का ? वाटल्यास एक अशक्यप्राय आदर्श म्हणून अहिंसेचा त्याग करा आणि त्याचेंऐवजीं हिंसामार्गांचा अवलंब करा पण यापैकीं एकाची निवड ही करावी लागेलच.

पण अहिंसा हें जर बलाढ्याचें शस्त्र असेल तर मात्र कांहीं पळवाटा नसलेले निर्णय ठरवतां येतील. मग आपण दंग्याना आळा घालून हिंदु-मुसलमानांमधील वाढूं पहाणारी खाई बुजवून काढून टाकूं. आतां अहिंसेचे पुजारी या नात्यानें आम्हीं दंगे शमविण्यासाठीं काय केलें असें तुम्हीं विचाराल; मी उत्तर देईन कीं हें कर्तव्य कॉंग्रेस कमिटीचें होतें. पण अशा आणीबाणीच्या प्रसंगीं उपयोगी पडावेत म्हणून आपल्या जवळ मात्र हजारों स्वयंसेवक हवेत. १९२१ मध्यें आम्हीं स्वयंसेवकांसाठीं एक प्रतिज्ञा तयार केलेली होती. प्रत्येक प्रतिज्ञक हा विचार आणि आचार या बाबतींत अहिंसक असावा अशी मागणी होती त्यावेळीं. त्या वेळचें अध्यक्ष हकीम अजमल खां यांनीं देखील तशाच प्रकारची प्रतिज्ञा खिलाफत स्वयंसेवकांकडून घेतलेली होती. खिलाफत परिषदेंत ही प्रतिज्ञा सहजासहजीं मान्य झाली नाहीं. स्वयंसेवकानें उच्चार आणि आचार यांत पूर्ण अहिंसक होणें चालेल, असें कांहीं मौलानांचें म्हणणें होतें, पण विचारांतदेखील त्यांनीं अहिंसक असावें हा आग्रह म्हणजे एक

अग्निदिव्यच होतें. त्यांच्या मनाचा स्वामी होण्यासाठीं माझी ही सारी धडपड आहे असें त्यांना वाटत होतें. मी त्यांच्या विधानाचा निषेध केला. मी म्हणालों, " त्यांच्या मनांवर एका व्यक्तीचें प्रभुत्व असावें असें मला वाटत नाहीं. त्यांच्या मनाचा तांबा अहिंसेनें घ्यावा असें मात्र मला वाटतें. शेवटीं त्यांनीं प्रतिज्ञेला मान्यता दिली. पण १७ वर्षांपूर्वी जरी आम्हीं प्रतिज्ञा मान्य केली असलीं तरीदेखील आज अशा अहिंसेनें जें दुर्दम्य सामर्थ्य आमच्या आंगीं यायला हवें होतें, तें अजूनहि आम्हीं मिळवूं शकलों नाहीं. याचें कारण एवढेंच कीं, आम्हीं अशा तऱ्हेचें अहिंसा-दल स्थापन करण्याचे कष्ट उचलले नाहींत. प्रयत्नहि केले नाहींत. आपण हें असें जर करूं शकणार नसलों, आपण जर आपली प्रतिज्ञा पार पाडूं शकत नसलों, तर मग आपण आपल्या भूमिकेचा पुन्हां एक वार विचार करायला हवा. दुःख वाटतें तें याचें कीं ती प्रतिज्ञा अजूनहि केवळ कागदोपत्रींच अस्तित्वांत आहे. प्रतिज्ञेंतल्या आवश्यक अटी पाळणाऱ्यांचें जर आज स्वयंसेवक पथक अस्तित्वांत असतें तर मग असे दंगेधोपे घडूनच आले नसते. आणि आले असते तरी ते तावडतोब शमवण्यांत आले असते किंवा तसें करतांना त्यांनीं स्वतःची आहुति दिली असती. अशा रितीनें मृत्यूला आलिंगन देणाऱ्या एकाच व्यक्तीबद्दल आपण ऐकलेलें आहे. पण असे जर अनेक गुप्ता पुढें आले असते तर माझें अंतःकरण आनंदानें थयथय नाचूं लागलें असतें.

तुम्हांला हें निव्वळ स्वप्नच वाटतें का ? आपण अशा अहिंसक स्वयंसेवक पथकाच्या सहाय्यानें दंगे शमवूं शकणार नाहीं असें का तुम्हांला वाटतें ? अधिकारी गंभीरपणानें आणि शांतपणानें विचार केल्यानंतरदेखील जर तुम्हीं आपला कौल असाच देत असाल तर मग मात्र तुम्हीं खास असेंहि धरून चाला कीं अहिंसेनें स्वराज्य मिळणें सुतराम् शक्य नाहीं.

—हरिजन, २-४-१९३८.

: १ :

# खुदाई खिद्मतगाराची प्रतिज्ञा

प्रत्येक खुदाई खिदमतगाराला घ्याव्या लागणाऱ्या प्रतिज्ञेचें हें स्वैर रूपांतर आहे—

( १ ) खुदाच्या साक्षीनें मी अशी शपथ घेतों कीं मी प्रामाणिकपणानें आणि खऱ्या कळकळीनें खुदाई खिदमतगारांच्या दलांत नांव नोंदवीत आहें.

( २ ) माझ्या देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं आणि राष्ट्राची सेवा करण्यासाठीं मी माझें व्यक्तिगत सुखसर्वस्व, संपत्ति आणि प्रसंगीं प्राण-देखील अर्पण करायला तयार आहें.

( ३ ) कोणत्याहि भांडणांत मी भाग घेणार नाहीं, किंवा केव्हांहि कोणाचें वैर करणार नाहीं. एखाद्यावर जुलूम होत असेल तर त्या जुलमाचा विरोध करायला मी धांवून जाईन.

( ४ ) मी इतर कोणत्याहि संस्थेचा सभासद होणार नाहीं, आणि अहिंसा लढयांत जामीनकी भरून किंवा दंड देऊन आपली सुटका करून घेणार नाहीं.

( ५ ) माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा प्रत्येक रास्त हुकूम मी नेहमीं पाळीन.

( ६ ) अहिंसेचें तत्त्वज्ञान मी नेहमींच माझ्या जीवनांत आचरीन.

( ७ ) मानवतेची सेवा करतांना मी समतेचें पालन करीन. माझ्या आयुष्याचें मुख्य ध्येय पूर्ण स्वातंत्र्य आणि धार्मिक स्वातंत्र्य हें राहील.

( ८ ) माझ्या आचरणांत मी नेहमींच सच्छील आणि सत्य यांचें पालन करीन.

( ९ ) माझ्या सेवेबद्दल मला वेतन मिळावें अशी अपेक्षा मी केव्हांहि करणार नाहीं.

( १० ) माझी सर्व सेवा देवाचरणीं रुजू होईल. त्या सेवेचा हेतु अधिकाराची प्राप्ति किंवा वरचा देखावा हा रहाणार नाहीं.

—हरिजन, १५-१०-१९३८

: १० :

# शांततेचा मार्ग

युद्धाचें संकट तूर्त तरी टळलें म्हणून आतां समाधान वाटायला हवें. पण त्यासाठीं द्यावें लागलेलें मोल अधिक होतें का ? आत्मप्रतिष्ठेचा विक्रय करण्याची पाळी आली म्हणतात हेंहि खरें असेल का ? संघटित हिंसेचा विजय आहे का हा ? रक्तपाताशिवाय आपल्या उद्दिष्टांची प्रगति करून घेण्याचें हिटलरनें हें नवें संघटित हिंसायुक्त तंत्र शोधून काढलेलें आहे का ? युरोपियन राजकारणाचें ज्ञान असल्याचा डौल मी करीत नाहीं, पण येवढें मात्र खरें कीं युरोपांतलीं लहान लहान राष्ट्रें उन्नत शीर ठेवून आपलें अस्तित्व टिकवूं शकत नाहींत. त्यांना आपल्या बलिष्ठ शेजाऱ्यांत एकरूप व्हावेंच लागेल.

म्युनिख येथें युरोपनें शांतता कायम राखली असली तरी तो हिंसेचा विजय होय. एका परीनें तो अहिंसेचा देखील विजय म्हणतां येईल. इंग्लंड आणि फ्रान्स यांना जर आपल्या विजयाची खात्री असती तर त्यांनीं खात्रीनें झेकोस्लोव्हाकियाच्या संरक्षणाचें कर्तव्य पार पाडलें असतें. पण इटालीजर्मनीच्या संयुक्त हिंसेपुढें त्यांचे पाय लटपटले. बरें यामुळें

इटाली जर्मनी यांना कोणता लाभ झाला ? मानवतेच्या नैतिक भांडारांत त्यांनीं कोणती भर घातली ?

हें लिहितांना माझें लक्ष कोणत्याहि बलाढ्य राष्ट्रांवर खिळलेलें नाहीं. त्यांच्या भव्यपणामुळें माझे डोळे दिपून जातात. झेकोस्लोव्हाकियानें आम्हां हिंदी लोकांना एक धडा शिकवला. दोन बलाढ्य दोस्तांनीं अवसान. घात करून आपल्याला एकटें पाडलें याची जाणीव झाल्यावर बिचारे झेक आणखीं काय करूं शकत होते ? पण इतकें असलें तरी मी निष्ठुरपणानें येवढें मात्र म्हणतों कीं जर झेकोंनीं आपला राष्ट्रगौरव कायम राखण्यासाठीं अहिंसेचें शस्त्र वापरण्याचें शिकून घेतलें असतें तर इटालीचें बळ पासंगाला घालून अधिकच बळवान झालेल्या जर्मनांच्या संपूर्ण सामर्थ्याला ते शौर्यानें तोंड देऊं शकले असते. आणि इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यावर लाजिरवाणा तह करण्यासाठीं नाकदुऱ्या काढण्याची जी पाळी त्यांनीं आणली ती आणावी लागली नसती. व आत्मगौरवाचें संरक्षण करतांना आपल्या स्वातंत्र्यावर दरोडा घालणाऱ्यांच्या रक्ताचा एक थेंबहि न सांडतां त्यांनीं आपल्या प्राणांचे बळी दिले असते. हें असलें शौर्य किंवा संयम म्हणा वाटल्यास, मानवी स्वभावाला सोडून आहे असें मी केव्हांहि म्हणणार नाहीं. पशुत्वाचा त्याग केल्यावरच माणसाला खऱ्या माणुसकीचा साक्षात्कार होऊं शकेल. आपले देह मानवी असले तरी अहिंसेची साधना करण्याबाबत आपली मजल आपले प्राचीन सुप्रसिद्ध पूर्वज ओरँग उटँग यांच्या पुढें फारशी गेलेली नाहीं.

मी कांहीं हे रिकामटेकडे विचार लिहीत नाहीं. झेकांनीं याची खात्री असूं द्यावी कीं त्यांच्या हतभाग्यामुळें वर्किंग कमिटीच्या अंतःकरणाला अत्यंत वेदना झाल्या. एका अर्थी हें दुःख स्वार्थमूलक होतें. व म्हणूनच तें अधिक वास्तविकपण होतें. कारण आम्हीं जरी संख्याबलानें प्रचंड असलों तरी युरोपच्या परिभाषेंत—त्यांच्या संघटित हिंसकपणाच्या दृष्टीनें बोलायचें झालें तर—आम्हीं झेकोस्लोव्हाकियापेक्षां देखील दुबळे आहोंत. आमचें स्वातंत्र्य नुसतें धोक्यांत आलें नाहीं तर गमावलेलें असून पुन्हां तें परत मिळवण्या-

साठीं आम्हाला झटायचें आहे. झेक पूर्णपणें शस्त्रधारी आहेत, आम्हीं संपूर्णतया निःशस्त्र आहोंत. म्हणूनच कमिटीनें झेकांच्या संबंधीं आपलें काय कर्तव्य आहे याचा विचार करण्याच्या वेळींच आपल्यावर जर युद्धाची आपत्ति कोसळली तर त्यांत आपलें स्थान कोणतें असावें याचींहि चर्चा केली. आम्हीं इंग्लंडबरोबर आमच्या स्वातंत्र्याचा सौदा करावा आणि झेकांचें मित्र बनण्याचा आव आणावा, किंवा अहिंसेचें ब्रीद पत्क-रून अगदीं या अग्निपरीक्षेच्या प्रसंगीं देखील असें म्हणावें कीं कांहींहि आगळीक न करणाऱ्या निरपराध झेकोस्लोव्हाकियाचा बळी जातो याचें कारण तें चिमुकलें राष्ट्र एकट्यानें लढून आपलें स्वातंत्र्य संरक्षण करूं शकत नाहीं, हें खरें असलें तरी आम्हीं युद्धांत उडी घेऊन आपले मानवी कल्याणाचें अहिंसेचें तत्त्व सोडायला तयार नाहीं. काय करावें आम्हीं या दोहोंतून ? वर्किंग कमिटी जवळ जवळ अशा निर्णयावर आली कीं इंग्लंडबरोबर सौदा करण्याची संधि मिळावी म्हणून वर्किंग कमिटी केव्हांहि टपलेली नाहीं, परंतु ती झेकोस्लोव्हाकियाच्या संरक्षणासाठीं, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं आणि जागतिक शांततेसाठीं जगाला असें कृतीनें दाखवून देईल कीं सन्मानपूर्वक शांतता प्रस्थापित करण्याचा मार्ग निरपराध्यांच्या कत्तलीं मधून सांपडत नसतो, तर त्याची वाट प्रसंगीं मृत्यूला ताडें देणाऱ्या संघटित अहिंसेच्या आचरणांतून निघत असते.

—हरिजन ८-१०-१९३८

: ११ :

# सूड आणि क्षमा

युरोपांतून माझ्याकडे जीं वर्तमानपत्रें येतात त्यांत जर्मनांच्या छळांपासून लोकसत्ताक राष्ट्रांनीं ज्यूंची सुटका करण्याची मागणी क्वचितच नसते. मला

या धोरणांत गैर असें कांहींच दिसत नाहीं. ज्यू म्हणजे कांहीं देवदूत नव्हत. ते जरादेखील यशस्वी प्रतिकार करूं शकत नाहीं म्हणूनच त्यांनीं अहिंसेचा अंगिकार केला. त्यांच्या अहिंसेंत प्रेमाचा अभाव आहे. त्यांच्या जागीं मी असतों आणि माझ्यांत शुद्ध अहिंसेचा अभाव असता, तर मी माझा छळ करणावर देवाघरची कुऱ्हाड कोसळावी असें वरदान मागितलें असतें माझ्या सहवासांत एक माझे ज्यू स्नेही आहेत, त्यांचा अहिंसेवर बौद्धिक विश्वास असला तरी हिटलरच्या कल्याणाबद्दल ,देवाजवळ प्रार्थना करणें आपल्याला शक्य नाहीं असें ते म्हणतात. जर्मनांच्या अत्याचारामुळें त्यांचा क्रोध इतका भडकतो कीं मग ते बोलतांना संयम ठेऊं शकत नाहींत. ते स्वतः अहिंसक होऊं पहातात पण आपल्या बांधवांचा छळ त्यांना असह्य होतो. जसें त्यांना वाटतें तसेंच हजारों ज्यूंनादेखील वाटत असेल. त्यांच्या मनांत शत्रूवर प्रेम करण्याची कल्पनादेखील येत नसेल. त्या हजारों जणांच्या मतें सूड उगवणें मोठें गोड असतें, क्षमा करणें फक्त देवांनांच शक्य आहे.

५–२–३९

## : १२ :

# माझी श्रद्धा

“ युद्धाच्या आपत्तीपासून आम्हांला वाचवावें म्हणून मी एकांतांत देवाची प्रार्थना करीत असलों तरी माझी बुद्धिवादावरची निष्ठा फिरून जाहीर करतांना मला मुळींच संकोच वाटत नाहीं. कारण बुद्धिवाद हेंच अहिंसेचें दुसरें नांव होय. अपराधांचें परिमार्जन करण्यासाठीं किंवा कलागतींच्या निर्णयासाठीं युद्धाची मध्यस्ती पत्करण्यापेक्षां हें बरें. या

बाबतींतला माझा विश्वास किती अढळ आहे हें सांगायचें झालें तर मी फक्त एवढेंच म्हणेन कीं जरी हिंसेच्या सहाय्यानें मला माझ्या देशाचें स्वातंत्र्य मिळवतां आलें तरीदेखील तें मी मिळवायचें नाकारीन. जें तरवारीच्या योगानें कमावतां येतें, तें तरवारीनेंच गमावतां देखील येईल; या समंजस उक्तीवर असलेली माझी श्रद्धा अविनाशी आहे. "

सेवाग्राम–२८–८–३९

## : १३ :

# सिमल्याची वारी

मी काल्का येथें जाण्यासाठीं म्हणून दिल्लीला गाडी गांठली तेव्हां स्टेशनवर जमलेल्या प्रचंड जमावानें खेळकरपणानें " महात्मा गांधी की जय " अशा नेहमीच्या गर्जना ठोकल्याच पण त्याला जोडून " हम सम-जोता नहीं चाहते " अशाहि घोषणा केल्या. माझा मौनवार होता. त्यामुळें मी नुसता हांसलों. डब्याच्या पायदाणांवर उभ्या असलेल्या मंडळींनींदेखील उलट हास्य केलें. मी व्हाइसरॉय बरोबर कसलीहि तडजोड करूं नये असें त्यांचें सांगणें होतें. एका कॉंग्रेस कमिटीनें तशाच अर्थाची जाणीव करून दिलेलें पत्र मला होतें. माझ्या मर्यादा काय आहेत, याची जाणीव मला करून द्यायला नको. दिल्लीचे जनघोष आणि एका कॉंग्रेस कमिटीचें सूचना पत्र बाजूला ठेवलें तरीदेखील माझ्या व्हाइसरायांशी झालेल्या मुलाखतींत काय घडलें याची माहिती मी जनतेला निवेदन करणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

स्वतःव्यतिरिक्त इतर कोणाच्याहि वतीनें बोलण्याचा अधिकार आप-ल्याला नाहीं याची जाणीव मला होती. वर्किंग कमिटीकडून देखील मला

कसलाहि अधिकार देण्यांत आलेला नव्हता. तारेनें आलेलें निमंत्रण स्विकारून मी अगदीं पहिली गाडी पकडली. याशिवाय आणखीं हेंहि मला वाटत होतें कीं माझ्या अहिंसेवरल्या संपूर्ण आणि दुर्दम्य श्रद्धेमुळें मला राष्ट्रीच्या मनाचें प्रतिनिधीत्व करतां येणें शक्य नाहीं व तसें मी केल्यास माझेंच हंसें होईल. मी तेंस व्हाइसरायांना सांगून देखील टाकलें. त्यामुळें माझ्या बाबतींत वाटाघाटीचा किंवा तडजोडीचा प्रश्न नव्हता. तसेंच त्यांनीं देखील त्या दृष्टीनें मला निमंत्रण केलेलें नव्हतें याचें मला भान होतें. व्हाइसरायाच्या निवासस्थानांतून मी कसलीहि उघड किंवा गुप्त वाटाघाट केल्याशिवायच रिक्त हस्तानें परतलों; जर कांहीं वाटाघाट व्हायची असेलच तर ती कॉंग्रेस आणि सरकार यांच्यामध्यें होईल अशा तऱ्हेनें कॉंग्रेसचें माझें नातें व्हाइसरायाजवळ स्पष्ट सांगूनच, मी आपल्या सहानुभूतीचा ओघ केवळ भूतदयावादामुळें इंग्लंड व फ्रान्सच्या बाजूला आहे असें सांगितलें.

लंडनच्या संभाव्य नाशाचा विचार मनांत येतांच माझ्या मनावर शहारे येतात; असेंहि मी त्यांना सांगितलें. त्यांच्यापुढें पार्लमेंट व वेस्ट मिनिस्टर ॲब्रे यांच्या पडझडीचें शब्दचित्र उभें करतांना तर मला गहिवर आला. माझा उमाळा थांबेना.

माझ्या अंतर्मनांत माझें ईश्वराशीं तो या गोष्टी चालूं देतो म्हणून सतत द्वंद्व चाललेलें आहे. माझी अहिंसा निष्क्रिय वाटूं लागते. पण दररोज द्वंद्वाचा अंत होतो. अशा उत्तरानें कीं ईश्वर किंवा अहिंसा दुबळी नसून खरें दुबळेपण मानवांत आहे. तरी पण आपली श्रद्धा कायम ठेवून मला माझें कार्य चालू ठेवलेंच पाहिजे.

आणि म्हणूनच पुढें होणाऱ्या वेदनांची कल्पना आगाऊ करूनच अबोटाबाद येथून २३ जुलाईला मी एक पत्र आधींच हिटलरला पाठवलें होतें. "मानवतेच्या कल्याणासाठीं म्हणून मी तुम्हांला पत्र लिहावें असा मित्रांचा आग्रह चाललेला आहे. पण माझें कोणतेंहि पत्र तुम्हांला उद्धटपणाचें वाटेल असें वाटल्यावरुन मी त्यांचें सांगणें मनावर घेतलें नव्हतें. तरीदेखील सतत टोंचणी लागलेली आहे कीं स्वतःबद्दल कांहींहि न वाटूं देतां

तुम्हांला एक आवेदन पाठवावेंच. मग त्याची किंमत कितीहि कमी लेखण्यांत आली तरी हरकत नाहीं.

हें अगदीं सुस्पष्ट आहे कीं, मानवांचें पतन रानवटाइतकें होऊं शकेल असा युद्धाचा डोंब फक्त तुम्हीं एकटेच या जगांत पेटवूं शकतां. तुम्हांला कितीहि योग्य वाटलें तरी तुम्हीं तें मोल चुकतें करून घेणारच का ? ज्यानें बऱ्याचशा यशस्वीपणानें युद्धाच्या मार्गापासून परावृत्त होण्याचा प्रयत्न स्वेच्छापूर्वक केलेला आहे अशांचें तुम्हीं ऐकणार नाहीं काय ?

कसेंहि कां असेना, तुम्हांला लिहिण्यांत कांहीं चूक झाली असल्यास आपण क्षमा करालच याची मला जाणीव आहे. "

अजूनदेखील हिटलरनें बुद्धिवादाची कांस धरावी आणि साऱ्या जगाचें–जर्मन जनतेचेंदेखील म्हणणें मनावर घ्यावें असें मला वाटत आहे. माणसाच्या अमानुष्य कृत्यानें लंडन सारख्या मोठाल्या शहरांच्या नाश होईल या भीतिनें लोकांची पळापळ व्हावी असें जर्मन लोकांना देखील वाटत असेल, याच्यावर माझा विश्वासच बसूं शकत नाहीं. ते स्वतःचा व स्वतःच्या इमारतींचा असाच नाश होईल, याचीहि कल्पना निर्दयपणानें कशी करूं शकतील ! मी आतां हिंदुस्थानच्या बंधविमोचनाबद्दल विचार करीत नाहीं, तें होईलच. पण इंग्लंड आणि फ्रान्सचा पाडाव झाला तर किंवा जर्मनीला नेस्तनाबूद करून ते यशस्वी झाले तर काय होईल ?

एवढें मात्र दिसतें कीं हिटलर देवाला दाद देत नसून त्याचा भर पाशवी शक्तीवर आहे आणि चेंबर्लेन म्हणतात त्याप्रमाणें तो फक्त त्यालाच धार्जिणा आहे. या अशा एकमेवाद्वितीय आणिबाणीच्या प्रसंगी कॉंग्रेस-जन आणि अन्य जबाबदार हिंदी जन यांनीं व्यक्तिशः व सामुदायिकपणें या घोर नाट्य प्रसंगांत हिंदुस्थानची भूमिका कोणती असावी याचा निर्णय दिला पाहिजे.

सिमला ५–९–१९३९

: १४ :

# माझ्या सहानुभूतीचा उगम

व्हाइसरायाबरोबर झालेल्या माझ्या मुलाखतीच्या हकीगतीची संभावना जनतेनें जरा मिश्र स्वरुपांत केली. एका टीकाकाराला ती भावनामय रडकथा वाटली तर दुसऱ्याच्या मतें तींत मुत्सद्दीपणा ओतप्रोत भरलेला होता. या दोन टोंकांच्यामध्यें देखील वेगवेगळाले अभिप्राय होतेच. मला वाटतें प्रत्येक टीकाकाराचा अभिप्राय त्याच्या त्याच्या दृष्टिकोनांतून बरोबरच असेल पण माझ्या दृष्टिकोनांतून विचार केल्यास ते सगळेच चुकले आहेत. इतरांच्या समाधानासाठीं कांहीं मी ती हकीगत सांगितली नव्हती. त्यांतल्या शब्दांशब्दांवर मी भर देत आहे. भूतदयावाद्याच्या शब्दाला जेवढें राजकीय महत्व असूं शकतें तेवढेंच त्याला महत्व आहे. कल्पनांच्या अंतर्गत गुंतागुंती अपरिहार्य असतात.

एका पत्रलेखकानें माझा मोठ्या आवेशानें निषेध केला. त्याला उत्तर दिलें पाहिजे. मी सगळेंच पत्र येथें देत नाहीं. कारण त्यांतला बराचसा मजकूर मलादेखील कळत नाहीं. पण त्याचा मथितार्थ मात्र कळायला मुळींच अडचण जात नाहीं. त्याचें म्हणणें हें असें आहे–

> "इंग्लिश पार्लमेंटाच्या इमारती आणि वेस्ट मिनिस्टर ॲबे याच्या संभाव्य पडझडीनें तुमच्या डोळ्यांत अश्रू उभे रहातात, तर मग जर्मनींतली तसलींच स्मारक मंदिरें नष्ट झालीं तर त्यांच्यासाठीं गाळायला मात्र तुमच्या जवळ अश्रू नाहींत ? तुम्हीं इंग्लंड फ्रान्सबरोबर सहानुभूति दाखवतां ती कां ? जर्मनीवरोबर कां नाहीं ? गेल्या युद्धांत दोस्तांनीं जर्मनीवरून जो

नांगर फिरविला त्याचेंच उत्तर म्हणजे हिटलर नव्हे का ? तुम्हीं स्वतःच जर्मन असतां, आणि तुमच्या जवळ हिटलरची साधनसामुग्री असती तर तुम्हीं खात्रीने हिटलरसारखेंच केलें असतें. नाझीवाद वाईट असेल, तो कसा काय आहे याची माहितीहि नाहीं. आम्हांला एकांगी साहित्य वाचायला मिळतें. पण मी आपल्याला सुचवितों कीं चेंबरलेन व हिटलर यांच्यांत कोणता फरक आहे ? हिटलरच्या जागीं चेंबरलेन असता तर त्यानेंहि असेंच केलें असतें. त्या दोघांची तुलना करून तुम्हीं हिटलरला उणें ठरवण्याचा अन्याय त्याच्यावर केलात, हिटलरनें जें कांहीं केलें त्याच्यापेक्षां इंग्लंडनें हिंदुस्थानांत काय कमी केलें बरें ? इंग्लंड आणि फ्रान्सच्या जुनाट साम्राज्यशाहींचा हिटलर हा एक बच्चा चेला आहे. व्हाइसरायांच्या निवासगृहीं तुम्हांला आलेला उमाळा अधिक न्याय्य निष्ठूर असता तर बरें झालें असतें. ”

इंग्रजांच्या दुष्कृत्यांचें मी जितकें निष्ठुरपणानें वर्णन केलें तेवढें कोणीहि केलें नसेल. इंग्लंडचा परिणामकारक प्रतिकारदेखील माझ्याशिवाय अन्य कोणी केला नसेल. प्रतिकाराची माझी इच्छा आणि शक्ति परावलंबी नाहीं. पण बोलण्याची आणि कृतीची एक ठरलेली वेळ असते. त्याचप्रमाणें मौनाचा आणि न कर्त्याचा वार देखील ठरलेलाच असतो.

सत्याग्रहाच्या शब्दकोशांत शत्रूला जागा नाहीं. पण मला कांहीं सत्याग्रह्यांसाठीं नवा शब्दकोश रचायचा नाहीं. नव्या अर्थानें मी जुनेच शब्द वापरीत आहें. तो आपल्या मित्राप्रमाणेंच तथाकथित शत्रूवर देखील प्रेम करीत असतो. अहिंसेचा पुजारी आणि सत्याग्रही या नात्यानें मला इंग्लंडच्या कलायणाची कामना केलीच पाहिजे. जर्मनीच्या ढासळलेल्या अवशेषांवर मला माझ्या राष्ट्राचें स्वातंत्र्य मंदिर उभारायचें नाहीं असें मी मोजक्या शब्दांत सांगितलें होतें माझ्या निवेदनांत. जर्मनींतलीं स्मारक मंदिरें ढासळून पडलीं तर मला तितकेंच दु;ख होईल. पण हिटलरला माझ्या सहानुभूतीची गरज नाहीं. इंग्लंडचीं मागील व जर्मनीचीं आजचीं दुष्कृत्यें यांचा विचार करून आज एखादा

निर्णय घेणें विसंगत होईल. इतर सत्तांनीं कांहींहि पापें केलेलीं असोत वा नसोत, आज मी एवढें मात्र निश्चित सांगूं शकतों कीं आजच्या युद्धाची जबाबदारी हिटलरवरच आहे. त्याच्या मागणीचें स्वरूप मला न्याय्य वाटत नाहीं. निःपक्षपाती लवाद मंडळानें हिटलरच्या मागण्यांचें स्वरूप पारखून घ्यावें असें साऱ्या जगाचें म्हणणें होतें, तें हिटलरनें मान्य करायला हवें होतें. तो आपल्या मोहीमेंत यशस्वी झाला तरी त्यानें त्याच्या मागणीचें न्याय्य स्वरूप सिद्ध होणार नाहीं. मानवांच्या कारभारांत जंगली कायदा अजूनहि मोठा प्रभावी ठरूं शकतो. याचें प्रमाण फार तर त्यानें मिळूं शकेल. आम्हीं मानवांनीं फक्त आपलें रूप पालटलें असलें तरी आमच्या स्वभावांत अजूनहि पशुत्व आहे याचेंहि प्रमाण त्यामुळें मिळूं शकेल.

यावरून आतां माझ्या टीकाकारांना सहज कळून येईल कीं माझी इंग्लंड, फ्रान्सबद्दल वाटणारी सहानुभूति कोणत्याहि क्षणिक भावनेवर, स्पष्टच बोलायचें म्हणजे भावनेच्या झटक्यावर आधारलेली नाहीं. आज पन्नास वर्षांपासून माझ्या अंतःकरणांत मी अहिंसेचें संगोपन केलेलें आहे. त्या अहिंसेच्या जिवंत कारंज्यांतून हे सहानुभूतीचे तुषार उसळून वर आले. माझ्या निर्णयबुद्धींत उणेपणा नाहीं, असा माझा दावा आहे. फ्रान्स आणि इंग्लंड बद्दलची माझी सहानुभूति विचार शक्तीवर आधारलेली आहे. माझ्यासारखी ज्यांची विचारसरणी असेल त्यांनीं मला पाठिंबा द्यावा. या सहानुभूतीचें स्वरूप काय असावें ही वेगळी बाब आहे. माझ्याबद्दल म्हणाल तर मी केवळ प्रार्थनाच करूं शकतों. माझ्या सहानुभूतीचें प्रत्यक्ष स्वरूप सध्याच्या प्रत्यक्ष विनाशाशीं ताडून पाहिलें तर युद्धांत भाग घेणाऱ्यांना त्याचें कांहींहि मोल वाटायचें नाहीं, असेंहि मी व्हाइसरॉयाना सांगितलें होतेंच.

सेवाग्राम—११-९-३९

: १५ :

# मैत्रीचा हात

( वर्किंग कमिटीच्या युद्धविषयक पत्रकांवरील भाष्य )

या जागतिक पेंचप्रसंगासंबंधीं वर्किंग कमिटीनें जें पत्रक काढलें त्याला आजचें निर्णायक स्वरूप यायला चार दिवस चर्चा करावी लागली. कमिटीच्या सांगण्यावरून पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं मसुदा तयार केलेला होता तरी प्रत्येक सभासदानें निर्भीडपणानें त्यासंबंधीं आपलें मत पुढें मांडलें. ब्रिटिशांना जो कांहीं पाठिंबा द्यावयाचा तो बिनशर्त देण्यांत यावा अशा मताचा फक्त मी एकटाच होतों असें सांगावयाला मला वाईट वाटतें. पाठिंबा द्यावयाचा तो केवळ अहिंसेच्या पायावर द्यावयाचा होता. पण कमिटीला फारच मोठी जबाबदारी पार पाडावयाची आहे. त्यामुळें तिला केवळ अहिंसात्मक धोरण स्वीकारतां आलें नाहीं. विरोधकांच्या अडचणींचा फायदा घेण्याचा तिटकारा करण्याजोगें अहिंसेचें प्रभावी बळ अजून राष्ट्रांत पूर्णपणें आलेलें नाहीं असें कमिटीला वाटलें. तरी पण कमिटीनें आपल्या निर्णयाचीं कारणें सांगतांना इतरांबद्दल अतिशयच कळवळा दाखवला.

त्या पत्रकाचा लेखक हा कलावंत आहे. साम्राज्यशाहीचा विरोध करण्यांत जरी कोणी त्याच्यापुढें जाऊं शकलें नाहीं तरी पण तो स्वतः इंग्रज जनतेचा मित्र आहे. त्याच्या विचारांत आणि बनावटीत तो इंग्रजाळलेला आहे. आपल्या देशबांधवापेक्षां देखील अधिक घरगुतीपणा त्याला इंग्रजां-बद्दल वाटतो. प्रत्येक अन्यायावर तो तुटून पडतो यामुळें त्याला भूतदया-वादी देखील म्हणतां येईल, तो जरी कट्टा राष्ट्रवादी असला तरी आंत-राष्ट्रीयत्वाच्या तजेल्यानें त्याचें तेज आणखींच वाढतें. म्हणूनच हें पत्रक म्हणजे केवळ आपल्या देशबांधवांना केलेलें एक निवेदन नसून तें ब्रिटिश

सरकार व ब्रिटिश जनता यांना देखील उद्देशून केलेलें आहे. तें पत्रक जगांतील साऱ्याच राष्ट्रांना उद्देशून आहे, हिंदुस्थानासारख्याच इतर पददलित राष्ट्रांना देखील. त्यानें वर्किंग कमिटीच्या मध्यस्तीनें हिंदुस्थानाला केवळ स्वतःच्याच नव्हे तर जगांतल्या शोषित राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा देखील विचार करायला भाग पाडलें.

काँग्रेस जनांतले सारेच पक्ष एकमतानें या पत्रकाला पाठिंबा देतील अशी मला आशा आहे. त्याच्यातल्या चालश्रेष्ठींना यांत सामर्थ्याचा अभाव आढळून येणार नाहीं. राष्ट्राच्या या आणीबाणीच्या घडीला काँग्रेसला स्वतःमध्यें कर्तृत्वशक्तीचा अभाव नाहीं. याची पूर्ण श्रद्धा पाहिजे. यावेळीं काँग्रेसजन क्षुल्लक भांडणें आणि पक्षभेद यांच्यात गुंतलेले असतील तर ती लाजिरवाणी गोष्ट होय.

ब्रिटिश मुत्सद्यांच्या मनांत आतां क्रांति व्हायला हवी. युद्धाच्या प्रारंभीं लोकसत्तांत विश्वास असल्याची घोषणा स्वतः कृतींत उतरवून त्यांनीं आपल्या प्रामाणिकपणाची ग्वाही पटवली पाहिजे. हिंदुस्थानला बळजबरीनें युद्धांत ओढणें ब्रिटनला योग्य वाटतें कां ? युद्धकार्यांत एक बरोबरीचा मित्र म्हणून हिंदुस्थानचें खुषीचें सहकार्य मिळविणें ब्रिटनला शक्य नाहीं का ? इंग्लंड आणि फ्रान्स यांना मोठा नैतिक पाठिंबा काँग्रेसच्या पाठिंब्या-मुळेंच मिळेल. काँग्रेस लढते ती अहिंसक साधनानीं, मग ती अहिंसा किती का अधुरी असेना ?

सेवाग्राम—१५-९-३९.

## : १६ :

# भगिनीची व्यथा

" माझ्या मतें राष्ट्राचे आत्मे हे एक प्रत्यक्ष अस्तित्व असून ती केवळ सिद्धांताची बाब नव्हे. मी पोलंडच्या भूमीवर पाय ठेवला म्हणजे माझें मन

शांत होईल, मग मला माझीं आवडतीं माणसें न कां भेटेनात ? या वेळीं राष्ट्राच्या आत्म्याच्या अग्निपरिक्षेचा दिव्य क्षण आहे. आज पोलंड लढत आहे, तें केवळ स्वतःच्या स्वातंत्र्यासाठींच नव्हे तर जगामधल्या प्रत्येक राष्ट्राच्या न्याय्य हक्कासाठीं, स्वातंत्र्यासाठीं लढत आहे. तें हिंदुस्थानसाठीं लढत आहे. मी स्वतः हिंदू आहें असें मला हृदयापासून वाटतें. मी जितकी पोलिश आहें तितकीच हिंदी देखील आहें. या दोन्हींहि मातृभूमींबद्दल माझ्या अंतरात्म्यांत आमरण प्रेम वाटतें. पण आज एक माता रक्तानें नाहलेली असतांना मला तिच्याकडे गेल्याशिवाय जगणेंच अशक्य होईल. मी वाटेतून तुम्हांला पत्रें पाठवीन पण एकदां युद्धवर्तुळांत शिरलें कीं मग मात्र केवळ मनानेंच तुमच्याकडे संदेश पाठवण्याचा प्रयत्न करीन. बापूजी पोलंडमध्यें असह्य दुःख भार झेलणाऱ्या हजारो निरपराध लोकांसाठीं तुमच्या प्रेमळ अंतःकरणांतून नेहमीं प्रार्थना बाहेर पडावी. करालना प्रार्थना ? त्यांनाच आज अतिशय सहानुभूति, आशीर्वाद आणि कोमल भावना यांची गरज आहे."

हें पत्र एका पोलिश भगिनीनें मुंबई बंदरांतून लिहिलेलें आहे. तिची माझी बऱ्याच वर्षांपासून ओळख आहे. ती जसी पोलिश आहे तशीच हिंदुस्थानी देखील बनलेली होती. ती मगन वाडीतल्या मगन संग्रहालयांत काम करीत होती. पण युद्धांच्या भूमकांमुळें तिची चलबिचल झाली. पोलंड मध्यें तिला एक म्हातारी आई आहे, पासपोर्टांच्या अडचणींमुळें ती इकडे येऊं शकली नव्हती. जेव्हां युद्धाला प्रत्यक्ष सुरुवात झाली तेव्हां मात्र आईच्या पुरतें तरी तिचें मन शांत झालें परंतु स्वतःचा कांहींहि अपराध नसतांना ज्यांचे प्राण धोक्यांत आले असे आप्तइष्ट व सगेसोयरे यांच्या काळजीनें तिच्या अंतःकरणाची तार छेडलेली होती. ती स्वतः पूर्णपणें अहिंसेंत विश्वास ठेवणारी आहे. पण तिच्या त्या अहिंसेनेंच तिला बेचैन केलें. तिच्या मातृभूमीवर होणाऱ्या अन्यायानें तिचें मन बंडखोर बनलें. म्हणून केवळ स्वतःच्याच नव्हे तर जगाच्या आपलें स्वातंत्र्य गमावणाऱ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठीं शेवटच्या घडीपर्यंत लढणाऱ्या तिच्या कल्पनेंतल्या पोलंडचें दर्शन घेण्यासाठीं गेलेली आहे. अर्थातच तिच्या प्रीतीचा दुसरा

वारा हिंदुस्थानला मिळणारंच. तिचें स्वप्न खरें ठरो. पोलंडजवळ जर अतिशय शौर्याइतकीच निःस्वार्थी वृत्ति असेल तर त्यानें हिंसावृत्तीनें आत्म-संरक्षण केलें याचें विस्मरण इतिहासाला होईलच. त्याची हिंसा ही अहिंसाच मानण्यांत येईल.

सेवाग्राम—१८-९-३९

## : १७ :

# कोड्यांचा उलगडा.

एका सुप्रसिद्ध काँगेसजनानें पुढील प्रश्न विचारले आहेत:—

( १ ) या युद्धा संबंधीं तुमची स्वतःची अहिंसेशीं सुसंगत असणारी भूमिका कोणती ?

( २ ) गेल्या युद्धांत जशी होती तशीच कीं आणखी कांहीं निराळी ?

( ३ ) काँग्रेसनें आजच्या पेंचप्रसंगीं आपली भूमिका हिंसात्मक ठेवलेली असतांना तुम्हीं तिच्याशीं सक्रीय सहकार्य करून तिला मदत कशी देऊं शकतां ?

( ४ ) हें युद्ध थांबवण्यासंबंधीं किंवा त्याला विरोध करण्यासाठीं तुमची अहिंसात्मक प्रत्यक्ष योजना काय ?

या प्रश्नाच्या शेवटीं माझ्या सकृदर्शनी विसंगत वाटणाऱ्या वृत्तीबद्दल व त्रुटित विचाराबद्दल लांबच्या लांब स्नेहभावाची कुरकुर देखील आहे. या टीकाकाराच्या दृष्टीनें तो बरोबर असला तरी माझ्या दृष्टीकोनांतून ती कुरकुर गैर लागू व अन्याय मूलक आहे. तेव्हां माझा टीकाकार आणि मी यांचा मतभेद हा होणारच, येवढेंच मी म्हणतों. मी लिहावयाला बसतो तेव्हां मागें काय लिहिलें होतें याचा विचार करीत नाहीं आधीं केलेल्या विधानांबरोबर सुसंगति राखणें हाच कांहीं माझा हेतू नाहीं. मला सत्याशीं सुसंगत

रहावयाला पाहिजे. प्रसंगानुसार सत्य ज्या स्वरूपांत दिसतें त्याच्याशीं इमान राखलें पाहिजे. फलतः माझ्या सत्याचा विकास होत गेला आणि उगाच माझ्या स्मरणशक्तीला ताण देण्याची पाळी माझ्यावर आलेली नाहीं. इतकेंच नव्हे तर पन्नास वर्षांपूर्वी मी जें लिहिलें तें आजच्या लेखाशीं ताडून पाहिलें तरी त्या दोहोंत मला विसंगति आढळून आलेली नाहीं. माझ्यात विसंगति म्हणणाऱ्यांनीं माझ्या सध्यांच्या लेखांचा ग्राह्यांश मान्य करून घ्यावा. मात्र ज्यांना माझ्या लेखांमधलाच अर्थ मान्य असेल त्यांच्याबद्दल मला कांहींहि म्हणायचें नाहीं. पण ही निवड करण्यापूर्वी सकृद्दर्शनी विसंगत भासणाऱ्या त्या दोहोंमध्यें सुसंगति व सूत्र बद्धता असलेली त्यांना आढळून येईल.

त्रुटितपणा बद्दल बोलायचें झालें तर गैर लागू नसलेला कोणताहि विचार मी आजवर मनांत दडपून ठेवलेला नाहीं; तरी पण कधीं कधीं माझ्या संक्षेपीपणाच्या आवडीमुळें व कधीं कधीं ज्या विषयावर मत द्यायचें असतें त्या बद्दलच्या अज्ञानामुळें तसें होतहि असेल. उदाहरणार्थ ज्याच्या माझ्यांत मुळीं देखील दुजाभाव नाहीं असा एक माझा मित्र उद्वेगानें लिहितो—" हिंदुस्थानच्या भूमीवर युद्ध पेटणें असंभाव्य नाहीं. त्यावेळीं त्यांच्या देशबांधवांनीं शत्रूंच्या तरवारी पुढें आपली छाती उघडी करून सामना द्यावा असाच उपदेश गांधींजी करतील का ? कांहीं काळा आधीं मला त्यांच्या बद्दल तशी खात्री वाटत होती पण आज मात्र मी साशंक आहे. '

माझे आजकालचे लेख लक्षांत घेतले नाहींतरी चालतील, पण मी त्याला असें आश्वासनपूर्वक सांगतों कीं त्यानें मी तसाच उपदेश देईन यावर खुशाल विश्वास ठेवावा. जो उपदेश मी झेक किंवा हबशी यांना केला होता तोच मी हिंदी लोकांना करीन. माझी अहिंसा लेची पेची नाहीं. तिचें पोलाद शास्त्रज्ञांना ठाऊक असलेल्या कोणत्याहि सर्वोत्कृष्ट धातू पेक्षां मजबूत आहे. पण तिचें जातिवंत बाळ अजून कमावून झालें नाहीं हें मला दुःखानें सांगावें लागत आहे तसें जर घडलें असतें तर मात्र देवानें मला देशांत घडणारे हिंसेचे प्रकार कसे थांबवितां येईल याचें मार्ग

दर्शन केलें असतें. आज मी असहाय्यपणानें ते प्रकार मूग गिळून बघत असतों. हें मी सांगतो तें मोठ्या दिमाखानें नव्हें, पूर्णत्वाला गेलेल्या अहिंसेच्या शक्तीचें थोडें फार ज्ञान मला मिळालें म्हणून मी हें लिहीत आहे. माझा दुबळेपणा किंवा माझे दोष झांकण्यासाठीं मी अहिंसेच्या सामर्थ्याचें मापन कमी प्रतीनें कसें करीन ?

आतां प्रश्नाच्या उत्तरादाखल चार शब्द लिहीन म्हणतो. ( १ ) अभूतपूर्व भीषणता अशी या युद्धासंबंधींची माझी भावना आहे. आज जेवढा मी बेचैन आहे तसा पूर्वी कधींहि झालों नसतो. पण मागच्या युद्धांत जसा स्वेच्छेनें रिक्रूट भरती करणारा माझा मीच सार्जंट बनलों होतों तसें करायला मात्र आज ही भीषणता माझ्या आड येईल. इतके असूनहि दिसायला चमत्कारिक भासेल तरी पण माझ्या सहानुभूतीचा ओघ दोस्त राष्ट्रांच्या बाजूलाच आहे. हें युद्ध आतां पाश्चिमात्त्य लोकसत्तांचे पाठीराखे आणि हिटलरसारखे हुकूमशहा यांच्यांत हळू हळू परिणत होत जाणार. या युद्धांत आज रशियाचें कृत्य जरी मनाला वेदना देणारे असलें तरी पण या अनैसर्गिक दोस्तीचा परिणाम चांगला होवो. दोस्तांचे मानसिक बळ खचलें नाहीं तर या युद्धानें जगांतल्या सर्व युद्धांचा शेवट होईल, निदान त्यांचें आजचें उग्र स्वरूप तरी नष्ट होईल. लोकसत्तेचा प्रसार करण्यांत हिंदुस्थान देखील परिणामकारक तऱ्हेनें भाग घेईल अशी मला आशा वाटते. जगाच्या रंगभूमीवर चाललेल्या या शोककारक नाटकांत वर्किंग कमिटी कोणता भाग घेणार याच्यावर तें सारें अवलंबून आहे. आपण या नाटकांतले प्रेक्षकहि आहोंत आणि नटहि पण आहोंत. माझें धोरण ठरलेलें आहे. मी वर्किंग कमिटीचा मार्गदर्शक व्हावें कीं, सरकारचें हें ठरलें तर त्या एकाला किंवा दोघांनाहि मी अहिंसेच्या मार्गावरून नेणार त्यांच्यावर मी बळजबरी मात्र करूं शकत नाहीं. परमेश्वर ऐन वेळीं माझ्या अंतःकरणांत किंवा डोक्यांत जशी प्रेरणा करील तसा मी वागेन.

( २ ) पहिल्याच्या उत्तरांतच मी दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर देऊन टाकलें असें मला वाटतें.

( ३ ) अहिंसेप्रमाणेंच हिंसेच्या देखील तऱ्हा आहेत. वर्किंग कमिटीनें राजीखुषीनें कांहीं अहिंसेचा त्याग केलेला नाहीं. अहिंसेचें धोरण स्वीकारणें तिला प्रामाणिकपणें शक्य झालें नाहीं. संकटकाळीं अहिंसक मार्गानें देशाचें संरक्षण कसें करावें याचें काँग्रेसजनांच्या विशाल समूहाला नीट आकलन झालें नाहीं असें कमिटीला वाटलें. ब्रिटिश सरकारविरुद्ध अहिंसेच्या बळावर कसें यश मिळवतां येतें याचें शिक्षण तिनें लोकांना दिलें होतें. काँग्रेसजनांना इतर बाबतींत अहिंसेचा उपयोग करण्याचें शिक्षण मिळालें नव्हतें. उदारणार्थ जातीय दंग्यांत किंवा गुंडगिरींत अहिंसेचा यशस्वी उपयोग कसा होऊं शकतो याचें ज्ञान त्यांना झालेलें नव्हतें. हें सांगणें अनुभवसिद्ध असल्यामुळें तेवढ्यापुरतें शेवटचेंच म्हणून समजलें पाहिजे. अहिंसेच्या अतिव्याप्तीच्या वेळीं माझ्या मागोमाग येऊं शकत नाहींत म्हणून मी माझ्या सहकाऱ्यांना सोडून जातो म्हटलें तर मी अहिंसेच्या कार्याची हानि केली असें होईल. त्यांचा अहिंसात्याग हा तात्पुरता आणि संकुचित क्षेत्रापुरता आहे असा विश्वास बाळगून मी त्यांच्या बरोबर राहीन.

( ४ ) माझ्याजवळ कोणतीहि आंखून ठेवलेली प्रत्यक्ष योजना अशी नाहीं. माझ्यासाठीं हें एक नवेंच कार्यक्षेत्र आहे. मात्र मार्गाबद्दल मला कसलीच निवड करतां येत नाहीं. मी वर्किंग कमिटीबरोबर चर्चा करीत असो की व्हाइसरॉयांबरोबर गुपित करीत असो, माझा मार्ग नेहमींच अहिंसक असेल. यामुळेंच सध्यां जें कांहीं मी करीत आहें तें माझ्या योजनेचें एक आंगच आहे. दर दिवशीं मला अधिकाधिक कळून येईल.

माझ्या योजना नेहमींच अशा रितीनें ठरतात. १९२० ला कलकत्ता काँग्रेसमध्यें मांडलेला सुप्रसिद्ध असहकारितेचा ठराव मला ऑल् इंडिया काँग्रेस कमिटीच्या बैठकीपूर्वी चोवीस तास आधीं सुचला. दांडी प्रयाणाचें देखील तसेंच झालें. आशियावासी लोकांच्या विरोधी केलेल्या नियमाविरुद्ध काय उपाय योजना करावी या साठीं जोहान्सबर्गला १९०६ मध्यें भरलेल्या एका सभेंत मला सविनय प्रतिकाराचा मार्ग अचानक सुचला. सभेला गेलों तेव्हां मनांत कोणताहि उपाय आगाऊ ठरवून ठेवलेला नव्हता. तसेंच अजूनहि चाललेलें आहे. समजा देवानें आपलें सर्व सामर्थ्य एकवटून मला

बहाल केलें. ( पण देव तसें कधींच करीत नसतो. ) तर मी इंग्रजांना शस्त्रें खाली ठेवण्याला सांगेन आणि शत्रूंचा प्रतिकार करायला सांगेन. त्यामुळें इतिहासांत इंग्रजांची कीर्ति अहिंसेचे वीर पुरुष म्हणून गाजेल. मग हिंदुस्थानला देखील या दैवी यज्ञांत इंग्रजांची बरोबरी करावयाला सांगेन. ती त्या दोघांची अभंग भागीदारी स्वतःच्याच रक्तानें स्वशरीरावर लिहिली जाईल, त्यांच्या तथाकथित शत्रूंच्या देहांवर नव्हे. पण मला अशी सर्वव्यापी शक्ति नाहीं. अहिंसेचें रोपटें हळूहळू वाढीला लागतें. त्याची वाढ दिसत नाहीं तरी खात्रीपूर्वक होत असते. माझ्याबद्दल गैरसमज झाला तरी हरकत नाहीं पण मला माझ्या अंतर्मनांतल्या चिमुकल्या आवाजाचा आदेश ऐकलाच पाहिजे.

सिमल्याच्या वाटेवर—२५-९-३९

: १८ :

# कमलादेवींचे पत्र

हें निरर्थक युद्ध सुरू व्हायच्या अगदीं आधींच २७ ऑगष्टला श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी मला असें पत्र पाठवलें होतें—

" हिंदुस्थान आणि पूर्वेकडील शोषित जनता यांचे धोरण सध्या कसें असावें याचा उद्घोष तुम्हीं करावा असें मी क्रानिकलमधून तुम्हांला सुचवलें होतें. आम्हांला या साम्राज्यशाही युद्धाशीं कांहींहि कर्तव्य नाहीं हें आमचें जुनेच धोरण पुन्हां जाहीर करावें असें माझें म्हणणें नाहीं. त्यापेक्षां कांहीं तरी अधिक आपल्याला करावें लागेलच. अंकित प्रदेशांच्या मालकीसाठीं होणाऱ्या कुतरओढीच आजच्या संभाव्य युद्धाचा संबंध आहे. यासंबंधी देखील दोन तट आहेत. एकाचें म्हणणें आज जसें आहे तसेंच पुढेंहि चालू ठेवावें. दुसऱ्याचें म्हणणें त्यांत फेरफार करावा, म्हणजेच

जुन्या पद्धतीवर पण पुन्हां लुटीचे नवे वाटे करून शोषणाचे हक्क त्यांनाहि देण्यात यावेत. हें करायचें म्हणजे तरवारींचा खणखणाट आलाच. त्यामुळें उपभोग्य असें कांहीं उरेल किंवा भोगेच्छु देखील जगतील कीं नाहीं, हा प्रश्न उरतोच. पण आज जगांत असे हे दोन तट पडलेले आहेत. जर एकाचा सिद्धांत मान्य केला तर दुसऱ्याचाहि करावा लागेलच, इंग्लंड आणि फ्रान्स सारख्या राष्ट्रांना मोठालीं राष्ट्रें व प्रदेश यांच्यावर सत्ता गाजवण्याचा हक्क असेल तर जर्मनी इटालीला देखील तो आहेच. हिटलरची "हक्काच्या मागणी" जशी नैतिक व न्यायाची नाहीं तशीच इंग्लंड फ्रान्सची हिटलरला तसें न करण्याबद्दल दिलेली गुरकावणी देखील न्याय्याची नाहीं.

पण या शिवाय एक तिसरी विचारसरणी आहे. तिचा विचार क्वचितच करण्यांत येतो. ती क्वचितच कानीं येते. म्हणूनच तिचा उच्चार आतां होण्याची वेळ आलेली आहे. ही विचार सरणी म्हणजे या खेळांतल्या आमिषांची वाणी होय. पोलिश कॉरिडर किंवा डान्झिग हा कांहीं महत्त्वाचा प्रश्न नव्हे, प्रश्न आहे एका तत्त्वाचा. याच तत्त्वावर सारी पाश्चि-मात्य संस्कृति आधारलेली आहे. बलवानांनीं सत्ता गाजवावी आणि दुबळ्यांचें शोषण करावें, असा हक्क मानणें हेंच तें तत्त्व होय. यामुळेंच तें तत्त्व अंकित प्रदेशाच्या प्रश्नाभोंवती घुटमळत असतें आणि हिटलर मुसलोनी यांना त्या प्रश्नाची जाणीव जगाला करून देण्याचा कंटाळाहि येत नाहीं. याच कारणामुळें इंग्लंडनें साम्राज्य धोक्यांत असल्याचा टाहो फोडलेला आहे. आपणां सर्वांनाच मूलतः हा प्रश्न लागू पडतो.

पूर्ववत् कायमस्थिति ठेवण्याला आपला विरोध आहे. आपल्याला त्यांत बदल करायचा आहे म्हणूनच आपण त्याच्याविरुद्ध झगडत असतों. पण त्यासाठीं आम्हांला युद्ध नको. युद्धानें या प्रश्नाची खरी सोडवणूक होणार नाहीं. जगाच्या भावी शांततेची गुरुकिल्ली आणि या भेसूर गडबडगुंड्यांतून सोडवणूक करण्यासाठीं उपाययोजना म्हणून आमचाहि एक मार्ग आहे. हा मार्ग जगापुढें ठेवायचा आहे, आज जगाला तें अरण्य रुदन वाटेल पण आमची ही हांक शेवटीं त्याच्या कानीं जाईल व प्रभावी ठरेल अशी

मला आशा वाटते. आणि आज दुबळीं भासणारीं मनगटेंच उद्यां नवें जग घडवतील.

तुम्हीं या विचारसरणीचा घोष करायला सर्वथैव योग्य आहांत जगांतल्या अंकित प्रदेशांत हिंदुस्थानला एक विवक्षित स्थान आहे. फारच थोड्या अंकित मुलखांना त्याच्या इतकें सामर्थ्यसंघटित होण्याचें आणि तशी नैतिक इभ्रत मिळविण्याचें भाग्य लागलेलें आहे. बऱ्याचशा प्रकरणीं इतर अंकित देश हिंदुस्थान जवळून नेतृत्वाची अपेक्षा करतात. कधींकाळीं जगाला ज्या तंत्राचें नैतिक मोल मान्य होईल असें एक लढ्याचे श्रेष्ठतंत्र आम्हीं जगापुढें मांडलें. हिंस्थानला या पिसाळून गेलेल्या जगाला असें दाखवून द्यायचें आहे कीं या जगांतले हे वेळोवेळीं होणारे प्रळय थांबवून रक्तबंबाळ जगाला शांतता प्रस्थापित करायची असेल तर मानवतेनें एक नवाच मार्ग चोखाळला पाहिजे, ज्यांनीं ज्यांनीं आजच्या या साम्राज्यवादी पद्धतीचे भयंकर घाव सहन केलेले आहेत व जे जे त्या पद्धतीविरुद्ध ती बदलण्यासाठीं शौर्यानें लढत आलेले आहेत त्यांनांच आवश्यक अशा नैतिक बळानें व जाणीवेनें स्वतःसाठीं व जगांतल्या शोषित जनतेबद्दल अधिकारानें सांगतां येणें शक्य आहे ”

श्रीमती कमलादेवींचें क्रानिकल मधलें हें पत्र मी वाचलें नव्हतें. वर्तमान पत्रें सगळींच नजरे खालून घालणें मला शक्य होत नाहीं. हें आलेलें पत्र वेळेच्या अभावीं माझ्या फायलींत तसेंच उत्तर न देतां पडून राहिलें पण उशिर झाला तरी पत्राचा भावार्थ तितकाच आज देखील लागू पडणारा आहे. हिंदुस्थानचें धोरण कोणतें असावें हें जाहीर करण्याची मला वाटतें हीच वेळ आहे. युद्धांतल्या उभय पक्षांचें कमलादेवींनें केलेलें मनोविश्लेषण मला मान्य आहे. दोघेहि स्वतःच्या अस्तित्वासाठीं आणि धोरण पुढें दामटण्यासाठीं लढत आहेत. पण त्या दोघांत मात्र एक मोठा फरक आहे. दोस्तांची युद्ध विषयक घोषणा कितीहि अपुरी व असमाधानकारक असली तरी ते लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या संरक्षणासाठीं लढत आहेत अशी जगाची समजूत पटली. हिटलरला आपल्या मागण्या निःपक्षपाती लवादापुढें ठेवायला सांगण्यांत आलें तरी त्यानें जर्मनीच्या सीमारेषा वाढवण्या-

साठीं युद्ध पुकारलेंच. त्यानें शांततेचा आणि मनधरणीचा मार्ग धिःकारला व तरवारीचा मार्ग पत्करला. त्यामुळेंच माझी सहानुभूति दोस्तराष्ट्राच्या बाजूला आहे. पण माझी ही सहानुभूति म्हणजे तरवारीच्या तत्त्वज्ञानाला कसल्याहि स्वरूपांत दिलेला पाठिंबा नव्हे, मग तें बचावाच्या दृष्टीनें खरें सिद्ध झालें तरी हरकत नाहीं; खरें ठरणें याचा अर्थ खरें असणें व दांडगाईला खऱ्यामार्गानें आळा घालणें, होय. आपल्या मानीव हक्कासाठीं प्रत्येक माणसाला स्वतःचें रक्त सांडण्याचा हक्क आहे व त्यानें तें सांडावें देखील. पण आपल्या हक्काला विरोध करणाराचें रक्त सांडण्याचा मात्र त्याला अधिकार नाहीं. हिंदुस्थान आपल्या हक्काच्या संरक्षणासाठीं कॉंग्रेसला प्रतिनिधित्व देऊन झगडत आहे. आपलें खरेंपण त्याला सिद्ध करायचें आहे. पण त्यानें तरवारीचा मार्ग न स्वीकारतां अहिंसेची कांस धरली. अजून जरी त्याचें स्वातंत्र्याचे स्वप्न प्रत्यक्ष सृष्टींत अवतरलें नाहीं तरी देखील त्यानें जगांत प्रतिष्ठेचें विशिष्ट स्थान स्वतःसाठीं मिळवून ठेवलें. त्याच्या अभिनव मार्गानें जगाला खात्रीनें मोहित केलेलें आहे. हिंदुस्थाननें चालू युद्धांत निर्णायक भाग घ्यावा अशी अपेक्षा करण्याचा जगाला हक्क आहे. जगांतल्या जनतेला हें युद्ध नकोसें वाटतें. या वेळीं होणाऱ्या तहाचें स्वरुप म्हणजे विजयी पक्षानें केलेली हिस्से वाटणी व पराभूतांचा अपमान असें थट्टेचे नसावें हें हिंदुस्थानला सांगावें लागेल. कॉंग्रेसतर्फे बोलण्याचा अधिकार जवाहरलाल नेहरूंना आहे. त्यांनीं आपल्या गंभीर शब्दांत अशी घोषणा केली आहे कीं साम्राज्यशाहीच्या जोखडापासून जगांतली गुलाम जनता मुक्त झाली तरच खरी शांतता स्थापन होऊं शकेल. शस्त्रास्त्रानें सुसज्ज झाल्यामुळें आपल्या हक्कांचें जेवढ्या ताकदीनें संरक्षण होऊं शकतें त्याच्या तुलनेनें अधिक सामर्थ्य अहिंसेच्या मार्गानें प्राप्त होऊं शकतें, हें आतां कॉंग्रेसला दाखवून द्यावयाचें आहे. अहिंसेच्या सामर्थ्यांत या शिवाय तर्कशुद्धता असते ती वेगळीच. शस्त्रास्त्रें तर्कशुद्धतेचा नुसता आव आणतात, खरी तर्कशुद्धता त्यांच्यात असूं शकतच नाहीं.

—सेवाग्राम ९-१०-३९

: १९ :

# कसोटीची वेळ

कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांबरोबर चर्चा करतांना मला असें आढळून आलें कीं त्यांच्या अहिंसेची मर्यादा ब्रिटिश सरकारबरोबर त्या साधनासह झगड्यापलीकडे गेलेली नाहीं. जगांतल्या श्रेष्ठतर साम्राज्यशाही सत्तेबरोबर गेलीं वीस वर्षें लढा देऊन कॉंग्रेसनें अहिंसेच्या आचरणाचें तत्त्व नीट समजावून घेतलें असा विश्वास मी हृदयाशीं बाळगून होतों. पण, अहिंसेसारख्या महान प्रयोगांत तात्त्विक प्रश्नांना क्वचितच वाव मिळतो. मीं स्वत: देखील प्रश्नाचें उत्तर देतांना सांगत असें कीं अहिंसेच्या जोरावर आत्मसंरक्षण होऊं शकतें वा नाहीं हें खरोखरचें स्वातंत्र्य मिळाल्यावरच सांगता येईल. पण आतां तो प्रश्न नुसता तात्त्विक उरलेला नसून वास्तविक स्वरूपांत आपल्यापुढें उभा आहे. ब्रिटिश सरकार आमच्या मागण्या पुऱ्या करण्याची घोषणा करो अगर न करो, हिंदुस्थानावर स्वारी झाली तर कोणता मार्ग स्विकारावयाचा याचा निर्णय कॉंग्रेसला करावा लागेल. कारण सरकारबरोबर तडजोड झाली नाहीं तरी स्वारीवाल्यांचा प्रतिकार अहिंसक मार्गानें करायचा कीं हिंसेच्या बळावर, याचें धोरण कॉंग्रेसला ठरवावें लागेलच. आतांपर्यंत मीं जी कांहीं वर्किंग कमिटीच्या सभासदांत झालेली चर्चा ऐकिली त्यावरून मला त्यांचें मन ओळखतां आलें. सशस्त्र स्वारीवाल्यांचा प्रतिकार अहिंसात्मक मार्गानें करण्याबाबत कॉंग्रेसजनांची तयारी झालेली नाहीं असें कमिटीला वाटतें.

खेद वाटण्याजोगें आहे हें. घरांतला चोर घालवून लावण्यासाठीं जे उपाय योजण्यांत आले तेच उपाय बाहेरचा घरांत शिरूं न देण्याबद्दल उपयोगीं पडावेत. त्यांतल्या त्यांत दुसऱ्या बाबतींत तर ते उपाय सहजीं

उपयोगी ठरावेत. खरी गोष्ट अशी आहे कीं आमचा अहिंसात्मक प्रतिकार हा कांहीं सामर्थ्यवानांचा नव्हता; तो दुबळ्यांनीं केलेला सविनय निषेध होता. म्हणूनच आज आमच्या हृदयांतून अशा गंभीर क्षणीं अहिंसेवरील अमर विश्वास उफाळून बाहेर पडत नाहीं. म्हणूनच वर्किंग कमिटीनें शहाणपणानें सांगून टाकलें कीं ते या तर्कसिद्ध मार्गानें जाण्यास तयार नाहींत. शिवाय शोककारक परिस्थिति अशी कीं ज्यांचा विश्वास हिंदुस्थानचें संरक्षण शस्त्रास्त्रांनींच होऊं शकतें असा आहे त्यांच्याशीं कॉंग्रेसला आपली पदरगांठ बांधावी लागत आहे. म्हणजे गेलीं वीस वर्षें कॉंग्रेसजनांनीं सशस्त्र युद्धाचें शास्त्र शिकण्याचें आद्यकर्तव्य केलें नाहीं असें होतें. भावी इतिहासकार असेंहि म्हणतील कीं राष्ट्राला बलशाली अहिंसेचे धडे देण्यांत येत नव्हते; राष्ट्र केवळ दुबळ्यांचा सविनय निषेध शिकत होतें आणि म्हणून मी कॉंग्रेसजनांना लष्करी शिक्षण द्यायला हवें होतें.

कशानें कां होईना पण मी या कल्पनेनें वेडावून गेलों होतों कीं हिंदुस्थानाला खऱ्या अहिंसेला आत्मसात् करून घेतां येईल आणि म्हणूनच आपल्या सहकाऱ्यांना लष्करी शिक्षण घेण्याबद्दल सुचवण्याचें मला सुचलेंच नाहीं. उलट मी लाठीकाठीचे व तरवारबहादरीचें खेळ थांबवण्याचे प्रयत्न केले. पण मला अजूनदेखील केल्या गोष्टीचा पश्चात्ताप होत नाहीं. मला अजूनहि असा अढळ विश्वास वाटतो कीं जगांतल्या सगळयाच देशांपैकीं हिंदुस्थान हा असा एक देश आहे कीं तो अजूनहि अहिंसा आत्मसात् करून घेईल. आज देखील कसोटी घेतोंच म्हटलें तर हजारों स्त्रीपुरुष आपल्याला सतावणाऱ्यांच्या विरुद्ध कसलाहि द्वेष न ठेवतां मरणाला सिद्ध होतील. मी गोळा झालेल्या जमावांना वारंवार बजावीत आलों कीं तुम्हांला वाटेल ते कष्ट सहन करावे लागतील, गोळीबार देखील सहन करावा लागेल, मरावे लागेल. मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळीं हजारों स्त्रीपुरुषांनीं सैनिकांना भोगावे लागणारे कष्ट नाहीं कां सहन केले ? आतांपर्यंत जेवढी सहनशक्तीची लायकी आपण मिळवली त्यापेक्षां अधिक लायकी हिंदुस्थानाला स्वारीवाल्यानां तोंड देतांना दाखवावी लागणार नाहीं. फक्त त्या लायकीचें प्रमाण अफाट असेल एवढेंच.

अणिक एक गोष्ट आपल्याला विसरून चालतां येणार नाहीं. हिंदुस्थान निःशस्त्र असल्यामुळें विषारी वायु किंवा बॉंब मारा यांच्या योगानें त्याचा विध्वंस करावा लागणार नाहीं. मॅजिनो तटबंदीमुळें सिजफ्रीड तटबंदी आवश्यक ठरली, किंवा त्याच्या उलटहि असेल. हिंदुस्थानचें संरक्षण करण्याची आजची पद्धति आवश्यक आहे याचें कारण त्याचें नशीब ब्रिटनच्या मुठींत आहे हें होय. स्वतंत्र हिंदुस्थानाला कोणी शत्रूच उरणार नाहीं. आणि हिंदुस्थानमधल्या जनतेमध्यें निर्धारपूर्वक नाहीं म्हणण्याचें सामर्थ्य मिळवण्याची कला जर मुरली आणि त्याप्रमाणें वागण्याचें मनांत आणलें तर मग हिंदुस्थानावर स्वारी करण्याची हिंमत कुणालाहि व्हावयाची नाहीं. आमची आर्थिक व्यवस्थेची पुनर्घटना अशी होईल कीं कोणालाहि आमच्यावर स्वारी करण्याचा मोह व्हावयाचा नाहीं.

पण कांहीं कॉंग्रेसजन असें म्हणूं शकतील कीं, " ब्रिटिशांचें जाऊं दे, पण आमच्याच अशा कांहीं लष्करी जमाती आहेत, ते देशाच्या मालकीसाठीं भांडत सुटतील, कारण आमच्याचप्रमाणें त्यांचा देखील या देशावर हक्क आहे " हें अगदीं खरें आहे, म्हणूनच मी सध्यां कॉंग्रेसजनांपुरतेंच बोलत आहें. हल्ला झाला तर ते काय करतील ? आपण स्वतः मरायला तयार झाल्याविना सबंध देशाचें मतपरिवर्तन आपल्या बाजूनें व्हावयाचें नाहीं.

उत्तरेकडले मुसलमान, शीख, आणि गुरखे यांनींच सैन्याचा बराच हिस्सा व्यापून टाकलेला आहे. जर मध्य हिंदुस्थानांतले व दक्षिणेतले लोक लष्करांत शिरण्याची इच्छा करूं लागले तर त्यांचे प्रतिनिधी म्हणविणाऱ्या कॉंग्रेसला उत्तरेकडील लोकांशीं चढाओढ करावी लागेल. मग कॉंग्रेसला अवाढव्य लष्करी खर्चाला मंजूरी द्यावी लागेल. आतां हें सारें कॉंग्रेसच्या मंजूरीशिवाय होत असेलहि, पण जगाच्या दृष्टीनें मात्र कॉंग्रेसची मंजूरी असणें किंवा नसणें यालाच महत्त्व आहे. जगाला हिंदुस्थानपासून कांहीं तरी अभिनव असें हवें आहे. जगाच्या अंगावर आज असणारा जुना लष्करी डगलाच जर कॉंग्रेस घालणार असेल तर मग तिची ओळखदेखील पटायची नाहीं कोणाला. कॉंग्रेसचा गाजावाजा झाला याचें कारण तिनें

राजकीय साधन म्हणून अहिंसेचा स्विकार केलेला आहे. कॉंग्रेस जर दोस्तांना अहिंसेची प्रतिनिधी म्हणून मदत करील तर त्यामुळें उलट दोस्तांचा गौरवच वाढेल व त्यांना युद्धाचें भवितव्य बदलवून टाकणारी अमोघ शक्ति प्राप्त होईल. पण वर्किंग कमिटीच्या सभासदांनीं अशा अहिंसेचा मार्ग आचरण्याचें प्रामाणिकपणानें नाकारले.

म्हणून माझा मीच एकटा उरलों. ओसाड वाटेनें जाणारा कोणी सौंगडी सांपडतो का हेंच मला आतां पाहायचें आहे. माझ्या अल्प मताला फक्त माझ्या एकट्याचाच पाठिंबा असेल तर मला इतरांचें मत परिवर्तन केलें हें पाहिजेच. मग तें परिवर्तन एकाचें होवो कीं अनेकाचें, पण मला माझा विश्वास जाहीर केलाच पाहिजे. हिंदुस्थाननें आपल्या सीमांचे संरक्षण करण्यासाटींदेखील हिंसेचा अंगिकार करूं नये. हिंदुस्थाननें लष्करी-करणाच्या मागें धांवणें आत्मघाताचें होईल. हिंदुस्थान अहिंसा गमावून बसला कीं मग जगाला कसलीच आशा करायला नको. गेलें अर्धं शतक मी जें तत्त्व प्रतिपादन करीत आलों त्यालाच मी चिकटून जिवंत रहाणार. अगदीं शेवटच्या क्षणीं देखील मला अढळ आशा वाटेल कीं हिंदुस्थान अहिंसेचें तत्त्व स्विकारल्याशिवाय रहाणार नाहीं; हिंदुस्थान माणुसकीची प्रतिष्ठा सांभाळील !

—सेवाग्राम १०–१०–३९

## : २० :

# हिंदूंची हिजरत

सक्कर आणि शिकारपूर या ठिकाणीं भडकलेल्या जातीय दंग्याच्या आगी संबंधीं माझ्याकडे डॉ. चोइथराम यांनीं काळजी वाटण्याजोगी समग्र माहिती पाठविली, याशिवाय अनेकांचीं पत्रें आलीं ती निराळीच. सिंधमध्यें

राष्ट्रीय सरकार अस्तित्वांत आहे हें सिंधी हिंदूनीं लक्षांत घ्यावें. मी संक्षेपानें कॉंग्रेस सरकार हा पर्याय वापरीत आलो तरीं पण योग्य पर्याय म्हणाल तर "**राष्ट्रीय लोकसत्ताक सरकार**" हा आहे. "**परकीय नोकरशाही सरकार**" आणि त्याच्या ऐवजीं आलेलें हें सरकार या दोहोंत फरक आहे. घरगुती मतभेद आणि पक्षाचें राजकारण यांची चर्चा करतांना आपण कॉंग्रेस सरकार व मुस्लीम लीग सरकार असे पर्याय वापरूं पण इतर सर्व बाबींत आपण राष्ट्रीय सरकार या दृष्टीनेंच विचार केला पाहिजे. ज्यांनां ज्यांनां आपल्यावर अन्याय होतो असें वाटतें त्यांनीं त्यांनीं आपल्या प्रांतिक राष्ट्रीय सरकारकडे दाद मागितली पाहिजे. न्याय्य गोष्टीकडे झुकणारें लोकमत बनविलें पाहिजे. नेहमींच जातीयतेच्या दृष्टीनें विचार करीत राहणें चुकीचें होईल. कटु सत्याकडे कानाडोळा करून चालतां येणार नाहीं हें जरी खरें असलें तरी प्रत्येक बाबतींत जातीयतेचा वास येणें हें दुर्बळपणाचें लक्षण आहे. राष्ट्रीय जीवनांत आजची तात्पुरती बाचाबाची चालली तीच कायमची होऊन बसावयाची अशानें.

बेजबाबदार नोकरशाहीपेक्षां राष्ट्रीय सरकार अशा प्रसंगीं तोंड द्यायला दुबळें ठरतें हें मी आधींच सुचवलें आहे. कारण राष्ट्रीय सरकार हें जनतेच्या सदिच्छेवर तिचेच प्रतिनिधी म्हणून राज्य करीत असल्यामुळें त्याच्यावर जनतेसंबंधींच्या जबाबदारीचें ओझें असतें. त्यामुळेंच त्यांना यशस्वीपणानें आळा घालतां येईल परंतु जातीय दंग्यासारख्या सार्वजनिक उत्पाताचा बंदोबस्त करतांना त्याच्यांत तेवढे बळ असूं शकणार नाहीं. ब्रिटिशांची लष्करी कुमक कांहीं नेहमींच त्यांना मिळणार नाहीं. या शिवाय राष्ट्रीय सरकारांना जर ब्रिटिशांच्या लष्कराची मदत घेण्याची पाळी आली तर मग त्यांचें "राष्ट्रीय" स्वरूप नाहींसें होईल. याशिवाय आणिक जर कॉंग्रेसचें अहिंसेचें धोरण सर्वच पक्षांनीं स्वीकारलें तर लष्करीच काय पण पोलिसांची मदत देखील अनावश्यक ठरेल. इतर जनता अहिंसक होण्याची वाट न पहातां कॉंग्रेस जनानीं त्यांच्या दैनंदिन आयुष्यांत बऱ्याचशा प्रमाणांत अहिंसेचें आचरण करून दाखविलें पाहिजे.

सिंध मधला आजचा प्रश्न हा हिंदू मुसलमानां मधला नाहीं. प्रश्न आहे दुबळे आणि बलवान् यांच्या मधला. हिंदूबरोबर जशा वाईट तऱ्हेनें मुसलमान भांडतात तसेच ते आपसांत देखील झगडतात. हिंदूंची देखील आपसांत भांडणाबद्दल ख्याति आहेच. धारवाडी काठ्यावर दोघांचेंहि भीषण क्रौर्य तोलून पहाण्यांत अर्थ नाहीं.

हिंदुत्व हें दुबळेपणाचें प्रतीक ठरलें आणि इस्लाम हें शारीरिक दांडगेपणाचें. अहिंसेवर विश्वासून राहण्याची सतत शिकवण हिंदूंना मिळाली असून देखील, हिंदूंनीं सामुदायिक रित्या कधींहि अहिंसेचें सामर्थ्य प्रगट केलेलें नाहीं, शारिरिक बळाच्या प्रतिकारांत अहिंसा अधिक श्रेष्ठ असते हें कधींहि दाखवून दिलेलें नाहीं. उलट मी सांगत आलों कीं अहिंसा ही शारीरिक बळापेक्षां अधिक प्रभावी ठरते; आणि एक व्यक्ति, कांहीं व्यक्तींचा समूह आणि विशाल व्यक्तिसमुदाय या साऱ्यांनाच तिचें आचरण करतां येणें शक्य आहे. अजून त्या आचरणाची प्रयोगावस्था संपलेली नाहीं. गेल्या वीस वर्षांतील अनुभवावरून मात्र असें म्हणायला पुरेशीं कारणें आहेत कीं प्रयोग करून पहायला कांहींच हरकत नसावी अहिंसा योग्य तऱ्हेनें पाळलीं तर प्रयोग केल्यानें कोणतेहि नुकसान व्हावयाचें नाहीं हें खासच.

सक्कर आणि शिकारपूर येथें एकतरी व्यक्ति बलवानांच्या अहिंसेवर विश्वास ठेवणारी होती व तिनें अहिंसेच्या मर्यादा पाळल्या असें आढळून आलें कां? असें मला कोणीहि सांगितलेलें नाहीं. कोणी असताच तर त्याची माहिती झालीच असती आपल्याला—गणेश शंकर विद्यार्थी नाहीं कां आपल्याला ठाऊक? नखशिखांत शस्त्रांनीं सुसज्ज असलेल्या व्यक्तीपेक्षां असलीच व्यक्ति आपलें जीवन अधिक उज्ज्वल करूं शकते.

सक्कर आणि शिकारपूर येथें बरेचसे कॉंग्रेसजन रहात आहेत पण त्यांचें अहिंसात्मक संघटन झालेलें नाहीं. हा कांहीं त्यांचा अपराध नव्हे, त्यांना यापेक्षां चांगला मार्गच माहित नाहीं. आमची ही अहिंसा कांहीं बलवानांची नव्हे असें मी सतत सांगत आहेंच. एकाएकीं कांहीं दुबळ्यांची प्रगति होऊं शकत नाहीं. पण माझ्या हृदयांत या रोगावर दुसरीं औषधेंच नाहींत.

कधींहि दगा न देणारें असें जें औषध तेंच मी योजणार, यासाठींच मी येवढें सांगेन कीं, " फिरून यत्न करून पहा, यश हें येणारच. जे खरे शूर आहेत त्यांच्या आंगीं द्वेष, त्वेष, अविश्वास आणि शरीराला इजा होण्याचें किंवा मरणाचें भय नसावें, ज्यांच्या आंगी हे गुण नसतील त्यांना अहिंसा परवडणार नाहीं. हे असे शूर लोक दुबळ्यांना पाठीशी घालूं शकतील, मात्र त्या दुबळ्यांनीं आपल्या सहाय्यकर्त्यांचें ऐकावयाला हवें.

दुबळ्यांनीं कधींहि हत्यारबंद्यांच्या मदतीवर विश्वास ठेऊं नये. अशा मदतीमुळें ते दिवसेंदिवस अधिकाधिक दुबळे होत जातील. त्यांना जर अहिंसात्मक मार्गानें स्वतःचें संरक्षण करण्याची धमक नसेल तर त्यांनीं खुशाल आत्मसंरक्षणाची शस्त्रकला शिकावी. यासाठीं धिप्पाड शरीर नको असतें, कणखर हृदय लागतें. पंचवीस वर्षांपूर्वी आफ्रिकेंतले निग्रो इतके भित्रे होते कीं त्यांच्या धिप्पाड देहाच्या मानानें अगदीं चिटुकला ठरणार गोराछोकरा पाहिला तरी ते घाबरून जात. गोऱ्या बाळांना निग्रोंना न भिण्याचें शिक्षण बालपणापासून देण्यांत येई. म्हणूनच आत्मसंरक्षण करणाऱ्यांना असा पहिला धडा द्यावा लागेल कीं जखमी होण्याची किंवा ठार मरण्याची भीति टाकून द्या. मी त्यांना खेळांतले नियम पाळण्याबद्दल उपदेश करीन. चोराचोरांत देखील जसे प्रतिष्ठेचे नियम आहेत तसेच तंटेखोरांत देखील खात्रीनें असलेच पाहिजेत. बालकांची आणि वृद्धांची कत्तल उडवणें व स्त्रियांची अब्रू घेणें यांच्या बातम्या कानीं येत असतात. माणसानें पशुवृत्ति धारण केली तरी तिला कांहीं मर्यादा आहेतच. धर्मांच्या नांवावर असले अत्याचार करणें म्हणजे स्वतः त्या धर्मालाच काळोखी फासणें होय. या दुर्दैवी देशांत होणारे सारेच दंगे धर्मांच्या नांवावर होत असतात, मात्र त्यांच्या मागें राजकीय हेतू दडलेले असतात. आज सांगायचें तें असें कीं चालू परिस्थिति असह्य आहे. राष्ट्राच्या शब्द कोशांत पळपुटेपणाला स्थान नसावें.

मी हिजरत करण्याबद्दल सूचना केलेली आहे. तिचीच आतां पुनरुक्ति करतों. ती अव्यवहार्य मुळींच नाहीं. लोकांना तिचें महत्व कळत नाहीं पण यापूर्वी थोरांनीं आणि बलिष्ठांनीं तिचा अवलंब केलेला आहे. आपणहून

सिंध मधला आजचा प्रश्न हा हिंदू मुसलमानां मधला नाहीं. प्रश्न आहे दुबळे आणि बलवान् यांच्या मधला. हिंदूबरोबर जशा वाईट तऱ्हेनें मुसलमान भांडतात तसेंच ते आपसांत देखील झगडतात. हिंदूंची देखील आपसांत भांडणाबद्दल ख्याति आहेच. धारवाडी कांट्यावर दोघांचेंहि भीषण क्रौर्य तोलून पहाण्यांत अर्थ नाहीं.

हिंदूत्व हें दुबळेपणाचें प्रतीक ठरलें आणि इस्लाम हें शारीरिक दांडगेपणाचें. अहिंसेवर विश्वासून राहण्याची सतत शिकवण हिंदूंना मिळाली असून देखील, हिंदूंनीं सामुदायिक रित्या कधींहि अहिंसेचें सामर्थ्य प्रगट केलेलें नाहीं, शारिरिक बळाच्या प्रतिकारांत अहिंसा अधिक श्रेष्ठ असते हें कधींहि दाखवून दिलेलें नाहीं. उलट मी सांगत आलों कीं अहिंसा ही शारीरिक बळापेक्षां अधिक प्रभावी ठरते; आणि एक व्यक्ति, कांहीं व्यक्तींचा समूह आणि विशाल व्यक्तिसमुदाय या साऱ्यांनाच तिचें आचरण करतां येणें शक्य आहे. अजून त्या आचरणाची प्रयोगावस्था संपलेली नाहीं. गेल्या वीस वर्षांतील अनुभवावरून मात्र असें म्हणायला पुरेशीं कारणें आहेत कीं प्रयोग करून पहायला कांहींच हरकत नसावी अहिंसा योग्य तऱ्हेनें पाळलीं तर प्रयोग केल्यानें कोणतेहि नुकसान व्हावयाचें नाहीं हें खासच.

सक्कर आणि शिकारपूर येथें एकतरी व्यक्ति बलवानांच्या अहिंसेवर विश्वास ठेवणारी होती व तिनें अहिंसेच्या मर्यादा पाळल्या असें आढळून आलें कां ? असें मला कोणीहि सांगितलेलें नाहीं. कोणी असताच तर त्याची माहिती झालीच असती आपल्याला–गणेश शंकर विद्यार्थी नाहीं कां आपल्याला ठाऊक ? नखशिखांत शस्त्रांनीं सुसज्ज असलेल्या व्यक्तीपेक्षां असलीच व्यक्ति आपलें जीवन अधिक उज्ज्वल करूं शकते.

सक्कर आणि शिकारपूर येथें बरेचसे कॉंग्रेसजन रहात आहेत पण त्यांचें अहिंसात्मक संघटन झालेलें नाहीं. हा कांहीं त्यांचा अपराध नव्हे, त्यांना यापेक्षां चांगला मार्गच माहित नाहीं. आमची ही अहिंसा कांहीं बलवानांची नव्हे असें मी सतत सांगत आहेंच. एकाएकीं कांहीं दुबळ्यांची प्रगति होऊं शकत नाहीं. पण माझ्या हृदयांत या रोगावर दुसरीं औषधेंच नाहींत.

कधींहि दगा न देणारें असें जें औषध तेंच मी योजणार, यासाठींच मी येवढें सांगेन कीं, " फिरून यत्न करून पहा, यश हें येणारच. जे खरे शूर आहेत त्यांच्या आंगीं द्वेष, त्वेष, अविश्वास आणि शरीराला इजा होण्याचें किंवा मरणाचें भय नसावें, ज्यांच्या आंगी हे गुण नसतील त्यांना अहिंसा परवडणार नाहीं. हे असे शूर लोक दुबळ्यांना पाठीशी घालूं शकतील, मात्र त्या दुबळ्यांनीं आपल्या सहाय्यकर्त्यांचें ऐकावयाला हवें.

दुबळ्यांनीं कधींहि हत्यारबंद्यांच्या मदतीवर विश्वास ठेऊं नये. अशा मदतीमुळें ते दिवसेंदिवस अधिकाधिक दुबळे होत जातील. त्यांना जर अहिंसात्मक मार्गानें स्वतःचें संरक्षण करण्याची धमक नसेल तर त्यांनीं खुशाल आत्मसंरक्षणाची शस्त्रकला शिकावी. यासाठीं धिप्पाड शरीर नको असतें, कणखर हृदय लागतें. पंचवीस वर्षांपूर्वी आफ्रिकेंतले निग्रो इतके भित्रे होते कीं त्यांच्या धिप्पाड देहाच्या मानानें अगदीं चिटुकला ठरणार गोराछोकरा पाहिला तरी ते घाबरून जात. गोऱ्या बाळांना निग्रोंना न भिण्याचें शिक्षण बालपणापासून देण्यांत येई. म्हणूनच आत्मसंरक्षण करणाऱ्यांना असा पहिला धडा द्यावा लागेल कीं जखमी होण्याची किंवा ठार मरण्याची भीति टाकून द्या. मी त्यांना खेळांतले नियम पाळण्याबद्दल उपदेश करीन. चोराचोरांत देखील जसे प्रतिष्ठेचे नियम आहेत तसेच तंटेखोरांत देखील खात्रीनें असलेच पाहिजेत. बालकांची आणि वृद्धांची कत्तल उडवणें व स्त्रियांची अब्रू घेणें यांच्या बातम्या कानीं येत असतात. माणसानें पशुवृत्ति धारण केली तरी तिला कांहीं मर्यादा आहेतच. धर्माच्या नांवावर असले अत्याचार करणें म्हणजे स्वतः त्या धर्मालाच काळोखी फासणें होय. या दुर्दैवी देशांत होणारे सारेच दंगे धर्माच्या नांवावर होत असतात, मात्र त्यांच्या मागें राजकीय हेतू दडलेले असतात. आज सांगायचें तें असें कीं चालू परिस्थिति असह्य आहे. राष्ट्राच्या शब्द कोशांत पळपुटेपणाला स्थान नसावें.

मी हिजरत करण्याबद्दल सूचना केलेली आहे. तिचीच आतां पुनरुक्ति करतों. ती अव्यवहार्य मुळींच नाहीं. लोकांना तिचें महत्व कळत नाहीं पण यापूर्वी थोरांनीं आणि बलिष्ठांनीं तिचा अवलंब केलेला आहे. आपणहून

भूमित्याग करण्यांत कोणताहि भेंकडपणा किंवा कसलाहि अपमान नाहीं. हिंदुस्थानचा विस्तार अफाट आहे. आंतरप्रांतीय स्थानांतर करतांना लायक, प्रामाणिक आणि कष्टाळू लोकांना कोठेंहि आश्रय मिळूं शकेल. शिकारपूर आणि सक्करचे लोक तसे आहेत याबद्दल शंकाच नको. आधींच अस्तित्वांत असलेल्या वैरभावांत तेल ओतण्यानें कोणत्याच पक्षाला किंवा व्यक्तीला फायदा होण्यासारखा नाहीं. आपसांत जर तडजोड होत नसेल आणि रहिवाशांना जर आपल्या मुलांचे संरक्षण अहिंसात्मक मार्गानें करतां येत नसेल तर त्यांनीं तेथें आपल्या डोक्यावर कायमची भीतीची तरवार लोंबत ठेवून राहणें इष्ट होणार नाहीं असें मला निःसंशय वाटतें.

सेवाग्राम—१-१-४०

: २१ :

# एका शंकेचें उत्तर

"तुम्हीं सिंधमधल्या गांजलेल्या हिंदूंना हिजरत करायला सांगता, हिजरतीचा हा मार्ग फक्त हिंदूनांच कां सांगता ? कॉंग्रेस प्रांतातले मुसलमान जेव्हां गांजणूकीचा गाजावाजा करतात, तेव्हां त्यांना कां सांगत नाहीं."

—( एक शंका )

माझा उपदेश सर्वांनांच आहे. जे गांजलेले असतील आणि आत्मप्रतिष्ठेला मुकण्याची ज्यांना भीति वाटत असेल त्या सर्वांना हा माझा उपदेश आहे. मुसलमानांची जर खरोखरच गांजणूक झाली असती व त्यांनी मला सल्ला विचारला असता तर मी त्यांनांहि हेंच सांगितलें असतें. पण सामान्यतः असें म्हणावयास हरकत नाहीं कीं मुसलमान अल्प संख्य असले तरी आपले हक्क सोडायला तयार होत नाहींत. सिंधी हिंदूंना मी तेंच

सांगितलें. मूठभर असून देखील जर ते आपल्या इभ्रतीचें शौर्यानें संरक्षण करूं शकत असतील तर त्यांनीं प्रांतत्याग करण्याचें कांहींहि कारण नाहीं. ज्यांना आपल्या इभ्रतीची जाणीव असून देखील, ज्यांच्या आंगीं अहिंसेपासून प्राप्त होऊं शकणारी शक्ति किंवा ठोशासठोसा लगावण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यांना फक्त मी हा उपदेश केला आहे.

सेवाग्राम—२९-१-४०

## : २२ :

# संरक्षणाची बाब

स्वतंत्र हिंदुस्थानाचें आद्य कर्तव्य स्वतःच्या संरक्षणाची काळजी घेणें हें राहील. कदाचित तसें करतांना हिंदुस्थानाला खूपच तयारी करावी लागेल आणि ब्रिटननें मदत देऊं केल्यास तीहि त्याला घ्यावी लागेल. ब्रिटिशांचीं बागनेटें आणि त्यांनींच उभारलेलें हिंदी सैन्य वगळलें तर निःशस्त्र हिंदुस्थान संरक्षणहीन स्थितींत ठेवण्यांत आलेला आहे, याबद्दल साम्राज्यवादी धोरणाचे आभारच मानले पाहिजेत. हिंदुस्थान आणि ब्रिटन या दोहोंनाहि ही परिस्थिति लाजिरवाणी आहे. पण मला त्याचें कांहींहि वाटत नाहीं. कारण जर मी हिंदुस्थानाला माझ्या बाजूला वळवूं शकलों तर दरोडेखोरांपासून लोकांचें संरक्षण करायला लागणाऱ्या पोलिसांशिवाय मला इतर कशाचीहि गरज भासणार नाहीं. हिंदुस्थानाच्या संरक्षणाची बाब म्हणाल तर निःशस्त्र शांततावादी असा हा देश सबंध जगाच्या सदिच्छेवर विसंबून आहे. पण आजच्या घटकेला तें केवळ स्वप्नमय ठरेल हेंहि मला कळूं शकतें.

—हरिजन—१०-२-४०

: २३ :

# एकच मार्ग

माझ्या मलिकंदाच्या मुक्कामांत नौखालीचे मनोरंजन बाबू आणि इतर स्नेही मला भेटायला आले होते. भेटीचा विषय त्यांच्या पंचक्रोशींतील हिंदूंच्या अडचणी हा होता. मनोरंजन बाबूंचा यासंबंधीं माझ्याशीं पत्र व्यवहार चाललेला होताच. मी त्यांच्या अडचणींबद्दल चौकशी केली नव्हती आणि तसें करावयाला मला वेळहि नव्हता व इच्छा देखील नव्हतीच. या सर्व बाबी प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या कक्षेंत येतात आणि मग मध्यवर्ती कॉंग्रेसच्या. पण सर्व साधारण विचाराची दिशा मी दाखवून द्यायला कांहींच हरकत नव्हती. सक्करच्या प्रमाणेंच त्यांचीहि अवस्था आहे. फक्त कमी अधिक प्रमाण काय असेल तें खरें. नौखालीमध्यें जी गुंडागिरी आहे म्हणतात तशा सर्वत्र पसरलेल्या गुंडगिरीला आळा घालणें कोणत्याहि लोकनियुक्त सरकारला शक्य होणार नाहीं. या ठिकाणीं मूलतः आत्मसंरक्षणाचाच प्रश्न उद्भवेल. आपल्या इभ्रतीचें आणि अब्रूचें संरक्षण दुसरे करूं शकणार नाहींत. त्या त्या स्त्री पुरुषानें आपापली काळजी घेतली पाहिजे. सरकार फक्त गुन्हे झाल्यावर त्या गुन्हेगारांना शासन करूं शकेल. पण ते गुन्हे थांबवणें त्याच्या हातीं नाहीं. आत्मसंरक्षणाचें स्वरूप हिंसात्मक किंवा अहिंसात्मक असूं शकतें. मी मात्र नेहमींच अहिंसेवर भर देत आलों. पण अहिंसात्मक प्रतिकाराचें देखील हिंसात्मक प्रतिकाराप्रमाणें शिक्षण घेतलें पाहिजे याची पूर्ण जाणीव मला आहे. त्याचें शिक्षण सर्वस्वी वेगळेंच असतें. त्यामुळें जर अहिंसात्मक प्रतिकाराची योग्यता आलेली नाहीं असें वाटलें तर खुशाल हिंसात्मक प्रतिकार करावा. पण मनोरंजन बाबू जुने कॉंग्रेसवादी आहेत, ते म्हणाले, "तुम्हीं असें म्हणता ना कीं मी आत्म-

संरक्षणासाठीं देखील हात उगारतां कामा नये?" मी उत्तर दिलें, "तो तर माझा आग्रहच आहे. पण गया काँग्रेसमध्यें मंजूर झालेल्या एका ठरावानें काँग्रेस जनांना आत्मसंरक्षणाची परवानगी मिळालेली आहे. मला तो ठराव कधींच पटला नाहीं. आत्मसंरक्षणासाठीं हिंसेचा आश्रय घेतला कीं मग अहिंसेला कांहीं अर्थच उरत नाहीं. म्हणूनच जर तुम्हांला शरीरसामर्थ्याचा उपयोग करायचा असेल तर तुम्ही काँग्रेस सोडून जाणेंच योग्य होईल.

"पण मी जर गया काँग्रेसच्या ठरावाचा आधार घेऊन गांजलेल्या हिंदूंचें संरक्षण केलें तर माझ्यावर जातीयत्वाचा आरोप येऊं शकेल?" मनोरंजन बाबूंनीं विचारलें.

"मुळींच नाहीं." मी उत्तर दिलें, कारण एक तर तुम्हीं काँग्रेसवादी असलां तरी त्यामुळें तुमचें हिंदूपण कांहीं नष्ट होत नाहीं. पण ते हिंदू चूक असोत वा बरोबर याचा विचार न करतां केवळ ते हिंदू आहेत म्हणून जर त्यांना मदत करायला जाल तर मात्र तुम्हीं जातीय ठराल. याच्या उलट ते गांजलेले लोक आहेत म्हणूनच तुम्हीं त्यांच्या संरक्षणाला धांवून गेलांत तर मात्र तुमचें वर्तन योग्य ठरेल. हिंदू प्रमाणें मुसलमानांच्या देखील मदतीला तुम्हीं तशाच परिस्थितींत जाल अशी मात्र अपेक्षा मी तुमच्य जवळून करीन. काँग्रेस-जनानें कोणताहि जातीय भेदभाव बाळगत कामा नये."

बरेचसे काँग्रेसवाले हिंदुमहासभेचे सभासद झाले त्याबद्दल त्यांनीं चर्चा केली, एकानें विचारलें, "हें असें करणें योग्य का?" तात्त्विक दृष्ट्या असें करायला कांहींच हरकत नाहीं असें मी सांगितलें. स्थानिक परिस्थितीच्या दृष्टीनें तें योग्य झालें कीं नाहीं हें मला सांगतां यायचें नाहीं. पण समजा मी काँग्रेसवादी असतो आणि मला अशा प्रसंगी परिणामकारक उपाय योजना करतां येणें अशक्य झालें असतें तर मी ज्या संस्थेकडून परिणाम-कारक सहाय्य मिळूं शकेल अशा संस्थेचा सभासद होण्यास बिचकलों नसतों. मी हें मात्र सांगून टाकलें कीं कोणीहि जबाबदार काँग्रेसवाला हिंदु महासभेसारख्या जातीय संस्थेचा सभासद झाल्यास आपल्या काँग्रेस-मधल्या अधिकाऱ्याच्या जागेस चिकटून राहूं शकत नाहीं. सगळाच

प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचा आहे. या प्रसंगी शांति, सत्य आणि धैर्य यांच्यावरच विसंबून राहिलें पाहिजे. काँग्रेसनें जर परिणामक अहिंसेचा स्वीकार केला नाहीं तर जातीयतेचा विजय झाल्याशिवाय रहायचा नाहीं. अहिंसेचा खेळखंडोबा केल्यास काँग्रेस स्वतःच कृतींत जातीय बनेल. कारण बहुसंख्य काँग्रेस जन हिंदू असल्यामुळें त्यांना जर अहिंसेचा परिणामकारक उपयोग माहित झाला नाहीं, तर ते हिंसेबरोबर वहावत जातील. सर्वच बाबतींत काँग्रेस खऱ्या अहिंसेला चिकटून राहिली तर ती जातीयतेपासून अलिप्त राहूं शकेल असें मला स्पष्ट दिसून येतें. राज्यकर्त्यांशीं अहिंसक आणि इतरांशीं हिंसक अशा दुहेरी वृत्तीनें काँग्रेस राहूंच शकत नाहीं. तो मार्ग अप्रतिष्ठेचा आणि धोक्याचा आहे.

—कलकत्ता २६–२–४०

## : २४ :

# झिडकारलेली मदत

एका हिंदी स्नेह्यानें पुढील पत्र पाठवलें—

> कालच रायटरनें करुणाजनक शब्दांत नार्वेची सगळी जनता मशीनगनच्या गोळ्या व बाँब यांच्या वर्षावानें घाबरून कशी सैरावैरा पळत सुटली याचें वर्णन केलेलें आहे. हें सारें एकाएकीं घडून त्यांची हिंमत खचली याचें कारण विनाशाच्या तंत्राचा विकास कलात्मकतेनें करण्याची त्यांची इच्छा नव्हती आणि त्यांच्याजवळ यासाठीं लागणारी साधनसामुग्री पण नव्हती. माझ्या मतें यामुळें हिंसेचा निष्फळपणा सिद्ध होतो. नार्वे जवळ हिंसात्मक प्रतिकाराचीं साधनें असून देखील त्यांचा कोणता उपयोग झाला ? तरी पण त्यामुळें जर्मनीच्या मोठ्या प्रमाणावरच्या हिंसेचा मात्र तात्पुरता विजय झालेला दिसतो. तरी पण सरते शेवटीं हिंसेचें वैयर्थ्य सिद्ध होऊन

लवकरच शांततेचें नवेंयुग जगांत उदय पावेल अशी आपण सारे आशा करूं या. पण आपण खरोखरच जागतिक प्रश्नाची निरगांठ उकलण्यासाठीं अहिंसेच्या मार्गानें कांहीं प्रगति केलेली आहे कां? आमची अहिंसा नार्वे, स्वीडन व डेनमार्क यांच्या कितीशी उपयोगी पडली? वस्तुतः आपण जर्मनीच्या हातीं हें कोलितच देत नाहीं का? ग्रेट ब्रिटनला सतावण्यापलीकडे, मग तें सतावणें खरोखर कितीहि अपरिहार्य असो, आपल्या अहिंसेनें कांहींच केलेलें नाहीं, हेंहि खरें. पण येवढें मात्र खरें कीं इंग्लंड अडचणींत आलेलें आहे. नुसतें इंग्लंडच नव्हे तर इतर भलीं परंतु परचक्राला बळी पडलेलीं राष्ट्रें देखील आपल्या या कृतीमुळें अडचणींत आलेलीं आहेत. इंग्लंडचा हृदयपालट करण्यांत आपल्याला यश येईलसें दिसत नाहीं. आणि नार्वेसारखे बलिदान झालेल्या राष्ट्रांना देखील आपलें धोरण केव्हांहि आवडायचें नाहीं. कालपर्यंन्त आम्हीं आक्रमणाचे बळी झालेले चीन, स्पेनसारखे देश यांना जी मदत केली. त्याबद्दल आतां आजच्या आंतर्राष्ट्रीय जगांत सकारण गैरसमज माजेल. आज ज्यांचे बलि जात आहेत त्या राष्ट्रांपेक्षां त्यांची लायकी अधिक होती कां? तसें नसेल तर मग हा भेदाभेद कां? केवळ स्वार्थ–बुद्धीनें कां होईना पण एक साम्राज्यवादी सत्ता कांहीं उदात्त आणि नैतिक कृती करते म्हणून कां? गेल्या युद्धांत तुम्हीं हिरीरीनें लष्कर भरती केली असून देखील त्याबद्दल तुम्हीं केव्हांहि खेद प्रगट केला नाहीं. यावेळीं तुमचें धोरण अगदीं तेव्हांच्या पेक्षां तीव्रतेनें विरोधी भासत असून देखील तुम्हीं आपल्या दोन्हीं धोरणाचा बिनचुक-पणाचें समर्थन करीत आहांत."

नार्वेजियन आणि डेन यांच्यासारख्या निरपराध आणि सुसंस्कृत लोकांच्या दुर्दैवाबद्दल अश्रूमोचन करणारे अनेक आहेत, एकटा हा माझा स्नेहीच नाहीं. हें युद्ध हिंसेचा विफलपणा सिद्ध करीत आहे. समजा हिटलरला जय मिळाला तरी इंग्लंड आणि फ्रान्स कांहीं त्याला ताब्यांत घेतां येणार नाहीं. उलट दुसरें युद्ध निर्माण होईल. समजा दोस्त राष्ट्रें

विजयी झालीं तर त्यामुळें जगाची कांहीं प्रगति होणार नाहीं. तीं अगदीं सभ्य बनलीं तरी त्यांचा निष्ठूरपणा कांहीं कमी व्हायचा नाहीं. तो व्हायला त्यांना युद्धांतकाळीं अहिंसेचें महत्त्व पटलें पाहिजे व त्यांनीं हिंसेच्या जोरावर कमावलेले लाभ सोडून दिले पाहिजेत. जीवनांतल्या प्रत्येक कप्प्यांत न्याय मिळूनच अहिंसेची पहिली अट पूर्ण होऊं शकते. कदाचित् मानवी स्वभावापासून इतकी अपेक्षा करणें शक्य नसेल. पण मला मात्र तसें वाटत नाहीं. मानवी स्वभावाच्या पतनाबद्दल किंवा उत्थानाबद्दल इतकी कांटेकोर नियमबद्धता असल्याची ग्वाही कोणीही देऊं नये.

हिंदी अहिंसेनें सुसंस्कृत पाश्चिमात्य सत्तांना अजून कांहींहि धिंवस दिलेला नाहीं, याचें कारण ती अजून अपरिणतावस्थेंत आहे. तिची प्रभावहीनता बघायला दूर जायला नको. कॉंग्रेसचें धोरण अहिंसेचें असून देखील आमचें आपसामधलें दुरावलेलें अंतर कायमच आहे. कॉंग्रेसवर अजूनही अविश्वास आहे. कॉंग्रेस किंवा तसलाच लोकप्रतिनिधींचा गट बलवानांची अहिंसा आचरणांत आणूं शकेल तरच जगाला तिची चटक लागूं शकेल.

स्पेन व चीन यांना हिंदुस्थानची केवळ नैतिक मदत मिळाली. प्रत्यक्ष मिळालेली अल्प स्वल्प मदत तिची एक खूण होती. एका रात्रींतून आपलें स्वातंत्र्य गमावणाऱ्या नार्वे आणि डेनमार्क बद्दल त्याच प्रकारची सहानुभूति न वाटणारा क्वचितच एखादा हिंदी इसम असेल. मात्र स्पेन व चीन पेक्षां त्यांची अवस्था वेगळी आहे, त्यांचा विनाश स्पेन व चीन पेक्षां अधिकहि असेल. तसें म्हटलें तर स्पेन व चीनमध्यें देखील बराचसा फरक आहे. पण सहानुभूतीमध्यें मात्र कसलाहि फरक नाहीं नादार हिंदुस्थाना जवळ अहिंसेपेक्षां दुसरी कसलीहि मदत नाहीं. पण ती मदत देखील आज पाठविण्याच्या लायकीची झालेली नाहीं, हें मी सांगितलेंच. जेव्हां हिंदुस्थान अहिंसेच्या जोरावर स्वातंत्र्य मिळवूं शकेल तेव्हां मात्र त्याला तसें करतां येईल.

आतां ब्रिटनचा प्रश्न उरतो. कॉंग्रेसनें कोणतीहि सतावणी केलेली नाहीं. ग्रेट ब्रिटनला सतावण्यासाठीं मी कांहींहि करणार नाहीं असें आधींच मी जाहीर केलेलें आहे. हिंदुस्थानांत अराजक माजलें तर त्यामुळें ब्रिटन

सतावला जाईल. जोपर्यंत काँग्रेस माझ्या शिस्तीखालीं आहे तोपर्यंत तिचा या सतावण्याला पाठिंबा रहाणार नाहीं.

ब्रिटनला आपला नैतिक पाठिंबा द्यायला मात्र काँग्रेस तयार नाहीं. नैतिक पाठिंबा देणें कांहीं यांत्रिक पद्धतीसारखें नसतें. ब्रिटनला तो मिळवावा लागेल. काँग्रेस जवळ मिळविण्यासारखें असें कांहींच नाहीं असेंहि ब्रिटिश मुत्सद्यांनां वाटत असावें. या युद्धाच्या प्रसंगीं फक्त युद्ध साहित्याची गरज असते असें त्यांना वाटत असावें. तसें समजणें फारसें चुकीचें नाहीं. युद्धांत नैतिक नाणें खोटें ठरतें. माझ्या स्नेह्यानें एका वाक्यानेंच इंग्लंडची बाजू सपशेल गमावली. तो म्हणतो, " इंग्लंडचा हृदयपालट करण्यांत आपल्याला यश येईलसें दिसत नाहीं. " मला ब्रिटनचें उणें चिंतायचें नाहीं. त्याच्या पराभवामुळें मला दुःख होईल, पण हिंदुस्थानात आपलें मुख उजळ केल्याशिवाय ब्रिटनला काँग्रेसचा नैतिक पाठिंबा मात्र मिळूं शकत नाहीं. तो केवळ कधींहि न बदलूं शकणाऱ्या अशा एका अवस्थेंतच प्राप्त होऊं शकेल.

माझी खेडा जिल्ह्यांतली मागल्या युद्धांतली लष्कर भरती व आजची माझी कृति या मधला फरक माझ्या स्नेह्याला सारखाच वाटतो. मागच्या युद्धांत नैतिक पाठिंब्याचा प्रश्नच उपस्थित झालेला नव्हता काँग्रेसनें देखील अहिंसेची प्रतिज्ञा केलेली नव्हती. आज जनतेवर असलेला प्रभाव त्यावेळीं काँग्रेसनें मिळवलेला नव्हता. मी माझ्या स्वतःपुरतेंच तेव्हां कायतें करीत होतो. मी तेव्हां युद्ध परिषदांना देखील हजर राहिलो होतों. माझी प्रकृति चांगली नसतांना देखील बोललेलें खरें करून दाखविण्यासाठीं मी रिक्रूट भरतीचें काम केलें. मी लोकांना सांगत असे कीं तुम्हांला शस्त्रें हवीं असतील तर लष्करी नोकरी करून ती अवश्य मिळवतां येतील. पण जे माझ्यासारखे अहिंसावादी होते त्यांना मात्र मी असें सांगितलें नाहीं. माझ्या श्रोत्यांत अहिंसावादी लोक असत नव्हते हें माहित आहे; त्यांची नाखूषी ब्रिटनबद्दल दुर्भावना असल्यामुळें निर्माण झालेली होती. परकीय सत्तेचें जोखड फेंकून देण्याचा निर्धार हळूं हळूं येऊन त्यानें ही दुर्भावना घालवली.

आतां परिस्थिति पालटली. ब्रिटनला गेल्या युद्धांत अविच्छिन्न पाठिंबा मिळाला तरी त्याच्या बदल्यांत ब्रिटननें रौलट कायद्यासारख्या देणग्या दिल्या. ब्रिटिशांच्या या सतावणुकीला तोंड देण्यासाठीं कॉंग्रेसनें अहिंसात्मक असहकारितेचा स्वीकार केला. जालियनवालाबाग, सायमन कमिशन वर्तुळ परिषद, मूठभर लोकांच्या दुष्कृत्यासाठीं बंगालचें केलेलें खच्चीकरण यांच्या आठवणी न बुजणाऱ्या आहेत. कॉंग्रेसनें अहिंसेचा स्वीकार केल्यामुळें मला लोकांमध्यें लष्करभरती करायला जाण्याचें कारणच नाहीं. या थोड्याशा रिक्रूटांपेक्षां कॉंग्रेसजवळून कांहीं तरी उच्च असें देऊं शकतों. पण त्याची इंग्लंडला गरज नाहीं, हें दिसतेंच. माझी इच्छा असूनदेखील मी असहाय्य झालों.

सेवाग्राम—३०-४-४०

: २५ :

# भीतीचें वातावरण

आजकाल वर्तमानपत्रांतून भीतिग्रस्तपणाबद्दल पुष्कळ वाचायला मिळतें आणि ऐकायला येतें त्याहूनहि अधिक. एकानें तर असें लिहिलें—"तुम्ही ओसाड सेवाग्रामाला बसल्यामुळें कांहीं कल्पना नाहीं तुम्हांला पण येथें गजबजलेल्या शहरांत अफवा पसरत आहेत. सर्वत्र भीतीचे वातावरण पसरूं पहात आहे."

सर्वांत अत्यंत नामुष्कीची परिस्थिति कोणती असेल तर ती हातपाय गाळून बसण्याची. भीतिग्रस्ततेचें मुळीं देखील कारण असूं शकत नाहीं. कांहींहि होवो माणसानें आपलें धैर्य खचूं देतां कामा नये. युद्ध हें अनिवार्य दुष्टकृत्य असलें तरी त्यामुळें एक तरी चांगली गोष्ट घडते. त्याच्यामुळें

शौर्य जागृत होतें आणि भय दूर पळतें. दोस्त आणि जर्मनी यांच्या रामरगाड्याच्या युद्धांत आतांपर्यंत लक्षावधि प्राणांचे बळी गेलेले असतील. पाण्याप्रमाणें रक्ताची सांडणूक चाललेली आहे. म्हातारे पुरुष, तरुण आणि म्हाताऱ्या स्त्रिया व लहान बालकें हीं इंग्लंड आणि फ्रान्समध्यें अगदीं मरणाच्या जबड्यांत पडलेलीं असूनदेखील त्यांची हिंमत खचलेली नाहीं. ते जर भीतीनें गांगरलेले असते तर जर्मनीच्या विषारी धुर, बॉम्बगोळे, व गोळ्या यांच्यापेक्षां देखील त्या भितीग्रस्त वातावरणानें इंग्लंडचें भयंकर वैर आरंभलें असतें. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या या विलक्षण सोशिकपणापासून आपण धडा घेऊं आणि भयवर्जन करूं. हिंदुस्थानांत तसें म्हटलें तर भीतीला स्थानच कां असावें? ब्रिटन अखेरपर्यंत शौर्यानें लढेल आणि तसें करतांना मरेल देखील. आपण माघारीच्या बातम्या ऐकूं पण नैतिक बळ खचल्याच्या बातम्या मात्र आपल्याला कधींहि ऐकायला मिळणार नाहींत.

अशा प्रसंगीं गुंडगिरीची भीति मात्र असते यांत शंका नाहीं. याला तोंड देण्यासाठीं मात्र तुम्हीं स्वतःच सिद्ध असलें पाहिजे. भेंकड लोकांतच गुंडांचें फावतें. स्वतःचें संरक्षण अहिंसेच्या किंवा हिंसेच्या बळावर करणाऱ्यांच्या जवळ त्यांना थारा मिळूं शकणार नाहीं. अहिंसक प्रतिकारकाला स्वतःच्या प्राणाची किंवा संपत्तीची पर्वा वाटतां कामा नये. अशा रीतीनें जर अहिंसा आचरणांत आणण्याची चिकाटी धरली तर गुंडगिरीचें मूळच नष्ट होईल. आजपासून अहिंसेचें शिक्षण घ्यायला प्रारंभ करा. तुम्हीं आपलें वित्त किंवा प्राण अगर दोन्हीही गमावयाला सिद्ध असलें पाहिजे. पण अहिंसेच्या कलेंत त्याचा समावेश होतच असतो. तुम्हाला या दोहोंपैकीं एकाहि मार्गानें आपलें संरक्षण करतां येणें शक्य झालें नाहीं तर मग सरकारला देखील सगळे प्रयत्न करून तुमचें संरक्षण करणें शक्य होणार नाहीं. लोकांच्या सक्रीय सहकार्यावांचून कोणत्याही सरकारला तें शक्य होणार नाहीं.

सेवाग्राम—४-६-४०

: २६ :

# एक जिव्हाळ्याचा प्रश्न

अंतर्गत बंडाळी आणि परचक्र यांचें निवारण कसें करतां येईल? हा एक विचार करण्याजोगा मुद्दा आहे. खासगी लष्कर उभारणें हें नुसतें निरुपयोगीच ठरणार नाहीं, तर घातुकहि ठरेल. कोणतीहि सत्ता मग ती परकी असो कीं स्वदेशी असो, खासगी लष्कर उभारूं देणार नाहीं. हिंदुस्थानला सशस्त्र लष्कराची आवश्यकता आहे असें ज्यांना वाटतें ते आज ना उद्यां ब्रिटिशांच्या निशाणाखालीं गोळा होतीलच. हीच तर्कसंगत परिणति त्या विचारांतून निघूं शकेल. वर्किंग कमिटीनें या मुद्यावर निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयानें चालायचें म्हटलें तर कॉंग्रेसजनांना सध्याच्या रूढ मार्गानेंच लष्करांत जाण्याविषयीं तिला सांगणें भाग पडेल याबद्दल मला तिळमात्र देखील शंका वाटत नाहीं. याचा अर्थ असा कीं तावडतोब स्वातंत्र्याची मागणी करणारी घोषणा कमिटीला मागें घ्यावी लागेल आणि खऱ्या अहिंसेवर देखील तिलांजलि सोडावी लागेल. मला अखेरपर्यंत आशा वाटते कीं कॉंग्रेसवाले स्वतःच्या, हिंदुस्थानच्या, ब्रिटनच्या आणि मानवतेच्या संरक्षणासाठीं म्हणूनच शस्त्रग्रहण करण्याचें निर्धारपूर्वक नाकारतील. कॉंग्रेसच्याच हातीं मानवतेचें भवितव्य आहे असा मला दृढ विश्वास वाटतो. योग्य मार्ग स्विकारण्याचें धैर्य व शहाणपणा देवानें कॉंग्रेसवाल्यांना द्यावा.

नवी दिल्ली,–१–७–४०

: २७ :

# प्रत्येक ब्रिटनला उद्देशून–

दक्षिण आफ्रिकेंतल्या प्रत्येक ब्रिटनला उद्देशून मी एक जाहीर विनंति १८९६ मध्यें प्रसिद्ध केलेली होती. दक्षिण आफ्रिकेंत मजूर, व्यापारी किंवा त्यांचे दुय्यम म्हणून गेलेल्या माझ्या देशबांधवांच्या वतीनें तेव्हां मी तें निवेदन केलेलें होतें. त्याचा योग्य तो परिणाम झालाच. त्यावेळचें कारण माझ्या दृष्टीनें कितीहि महत्त्वाचें असलें तरी आजच्या कारणाच्या मानानें तें अगदींच क्षुल्लक होतें. इतर बाबींत आणि राष्ट्राराष्ट्रांतले संबंध प्रस्थापित करण्यासाठीं युद्धाऐवजीं अहिंसेचा मार्ग त्यांनीं स्विकारावा असें मी कोठेंहि राहत असणाऱ्या प्रत्येक ब्रिटनला उद्देशून विनवितों. हें युद्ध लोकसत्तांच्या संरक्षणासाठीं आहे. अशी घोषणा तुमच्या मुत्सद्यांनीं केलेली आहे. या शिवाय इतरहीं बरींचशीं कारणें युद्धाच्या समर्थनासाठीं दिलेलीं आहे. अगदीं तोंडपाठ आहेत तुम्हांला तीं सारीं. पण मला असें सुचवायचें आहे कीं या युद्धाच्या शेवटीं, मग तो कसाहि होवो, लोकसत्तांचे प्रतिनिधित्व करायला मुळीं एकहि लोकसत्ता उरणार नाहीं. मानवतेवर कोसळलेला एक अभिशाप आणि धोक्याची सूचना म्हणजेच हें युद्ध होय. अभिशाप अशासाठीं कीं आजवर माहित देखील नसलेल्या प्रमाणांत तें माणसाचा पशु बनवीत आहे. लढाऊ आणि बिनलढाऊ माणसें यांच्यातले सारेच भेद नष्ट करून टाकण्यांत आले. कांहींहि कोणाची गय करीत नाहीं. असत्याला आतां कलेचें स्वरूप आलें. ब्रिटन लहान लहान राष्ट्रांचें संरक्षण करणार होतें. तात्पुरत्या काळासाठीं कां होईना पण तीं एकामागून एक विनाश पावत आहेत. युद्ध धोक्याची सूचना आहे अशासाठीं कीं ढोबळपणानें दिसत असलेल्या गोष्टी जर माणूस मनावर घेणार नाहीं तर तो आपल्या वृत्तीनें आजच ज्याला लाजवीत आहे त्या पशूच्या बरोबरीला

जाऊन बसेल. जेव्हां शस्त्रांवर शस्त्रें आदळलीं तेव्हांच मी त्या ढोबळ गोष्टी पाहून घेतल्या, पण मला बोलावयाचा धीर झाला नव्हता. पण अजून वेळ गेली नसून देवानें मला बोलावयाची हिंमत पण आतां दिलेली आहे.

तुम्हांला थकवा आला म्हणून नव्हे, तर मूळांतच वाईट असल्यामुळें हें युद्ध थांबवावें अशी मी तुम्हांला विनवणी करतों. तुम्हांला नाझी वादाचा नाश करायचा आहे, पण वेगळ्याच स्वरूपांत त्याचा स्वीकार करून तुम्हीं त्याचा नाश करूं शकणार नाहीं. जर्मन सैनिकांप्रमाणेंच तुमचेहि सैनिक विध्वंसाचीं कृत्यें करतात. मात्र फरक इतकाच कीं तुमचे सैनिक जर्मना- इतके पक्के बनलेले नाहींत. इतकेंच असेल तर तुमचे सैनिक त्यांच्यापेक्षां अधिक नाहीं तरी पण त्यांच्या इतके तरी निपुण लवकरच होऊं शकतील. या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि परिस्थितींत तुम्ही जिंकूं शकणार नाहीं. दुसऱ्याच शब्दांत सांगायचें झालें तर तुम्हांला नाझींच्या पेक्षां अधिक निर्दय बनावें लागेल. प्रत्येक मिनिटाला होत असणाऱ्या या बेछुट कत्तलीचें समर्थन कोणत्याहि न्याय्य कारणानें देखील होऊं शकत नाहीं. ज्या कारणा- मुळें आजच्या अमानवी गोष्टी घडत आहेत तें मुळीं न्याय्य असण्याचा संभवच नाहीं.

मला ब्रिटनचा पराभव झालेला खपणार नाहीं. परंतु या पाशवी शक्तीच्या बळावर त्यानें विजयी व्हावें असेंहि मला वाटत नाहीं, मग तें बळ मनगटां- तून येवो किंवा मेंदूतून ! तुमचें मनगटाचें बळ आतां सिद्ध झालेलेंच आहे. तुमच्या मनगटाप्रमाणेंच तुमचा मेंदू देखील विध्वंसाची शक्ति निर्माण करण्यांत कोणाला हार जाणार नाहीं हेंहि तुम्हांला सिद्ध केलेंच पाहिजे ? नाझीं बरोबर अशी न शोभणारी चढाओढ तुम्हीं करणार नाहीं अशी मला आशा वाटते. शूराला शोभणारा एक उदात्त शौर्याचा मार्ग मला तुम्हांला दाखवून द्यावयाचा आहे. तुम्हीं निःशस्त्र युद्ध करून नाझीवादाला तोंड द्यावें असें मला वाटतें. लष्करी शब्दच वापरायचा म्हटला तर तुम्हीं अहिंसेच्या शस्त्रानें नाझींशीं सामना करावा. तुम्हीं स्वतःच्या किंवा मानव- तेच्या संरक्षणासाठीं असमर्थ ठरलेलीं शस्त्रें खालीं ठेवून हिटलर मुसलोनीला तुमच्या सुंदर देशांतल्या तुमच्या मालकीच्या वस्तु घेऊं द्याव्यात. सुंदर

इमारती असलेल्या तुमच्या बेटांचा ताबा खुशाल त्यांना घेऊं द्या. तुम्हीं त्यांना हें सगळें दिलें तरी तुमचा आत्मा किंवा मन यांच्यावर मात्र त्यांना ताबा बसवितां येणार नाहीं. तीं भलीं माणसें तुमच्या घरांचा ताबा घेऊं लागतील तर तीं त्यांना मोकळीं करून द्या. तुम्हीं सगळींजण स्त्री, पुरुष बालकें स्वतःची कत्तल होऊं द्या पण त्यांना सहकार्य देऊं नका.

हा अहिंसात्मक असहकारितेचा मार्ग हिंदुस्थानांत बराचसा यशस्वी झाला. तुमचे हिंदुस्थानांतले प्रतिनिधी असें झाल्याचें कबूल करणार नाहींत. तसें त्यांनीं केलें तर मला त्यांची कींव येईल. आमची असहकारिता सर्वस्वी नव्हती, तिचा पाया तुमच्या तिरस्कारावर उभारलेला होता असेंहि ते सांगतील. त्यांनीं सांगितलेलें मी एकदम मान्य करीन. कारण आमची असहकारिता संपूर्णपणें अहिंसेला धरून असती तर तुम्हीं आमचे राज्यकर्ते राहिले नसतां, आमचे शिष्य बनलां असतां आणि आमच्यापेक्षां देखील अधिक चतुराईनें या अजोड शस्त्राचा उपयोग जर्मन इटालियन मित्रांच्या उपद्रवाला तोंड देतांना केला असता. त्यामुळें गेल्या कांहीं महिन्यांचा युरोपचा इतिहास निराळ्याच शब्दांत लिहिला गेला असता. युरोपांत निरपराध लोकांच्या रक्ताचे लोट वहावले नसते, लहान लहान राष्ट्रांवरचे बलात्कार थांबले असते व द्वेषाच्या ज्वाला भडकल्या नसत्या.

ज्याला कांहींहि समजत उमजत नाहीं अशानें कांहीं शहाणपणाचा आव आणलेला नव्हे. गेलीं पन्नास वर्षें मी सतत याचे प्रयोग करीत आलों. जीवनांतल्या प्रत्येक छटेंत, गृहजीवनांत, समाजजीवनांत व राजकीय जीवनांत मी अहिंसेचा उपयोग करून पाहिला. कोणत्याही रीतिनें मला दगा दिलेला नाहीं. कांहीं ठिकाणीं सकृतदर्शनीं तिचा प्रयोग फसला असें दिसलें याचें कारण माझें अपूर्णत्व होतें. मी स्वतःला पूर्ण समजत नाहीं. पण सत्याच्या शोधाची तळमळ असणारा मी एक श्रद्धाळू जीव आहें याची मी खात्री देतों. सत्याचेंच दुसरें नांव ईश्वर असें आहे ! शोधाच्या प्रयत्नांत असतांनाच मला अहिंसेचा साक्षात्कार झाला. तिचा प्रसार करणें हें माझें जीवित ध्येय होय. या ध्येयासाठीं कार्य करीत असणें हाच माझ्या जगण्याचा हेतु होय.

मी ब्रिटिश जनतेचा संपूर्णतया निरपेक्ष असा जन्मापासूनचा मित्र आहें. एके काळीं मी तुमच्या साम्राज्याचा देखील मित्र होतों. हिंदुस्थानचें कल्याण साम्राज्यामुळें होईल असें मला वाटत होतें. जेव्हां माझे डोळे उघडले तेव्हांपासून मी साम्राज्यशाहीबरोबर लढा देण्यासाठीं अहिंसेचा उपयोग करूं लागलों. आजहि त्याचाच अवलंब मी करीत आहें माझ्या देशाचें भवितव्य कांहींहि होवो; तुमच्या बद्दलच्या माझ्या प्रेमांत तें उभें राहणार नाहीं. माझ्या अहिंसेचें उद्दिष्ट विश्वाठायीं प्रेम असें आहे. तुम्हीं त्या विश्वाचे लहानसहान घटक नाहीं. तुमच्यावरील प्रेमामुळेंच मीं ही विनवणी करायला उद्युक्त झालों.

देवानें माझ्या प्रत्येक शब्दांत सामर्थ्य ओतावें त्याच्या नावानेंच मी हें लिहावयाला बसलों व त्याचें नांव घेऊनच मीं लेखणी खालीं ठेवीत आहें. माझ्या विनवणीप्रमाणें वागण्याचें धैर्य व शहाणपणा तुमच्या मुत्सद्यांच्या अंगीं येवो. माझ्या विनवणींतला हेतु मान्य असल्यास त्याला व्यवहाराचें स्वरूप देण्यासाठीं मी माझी सेवा बादशहाच्या लष्कराला रुजू करायला तयार असल्याचें मी व्हाइसरॉयला कळवून ठेवलेलें आहेच.

नवी दिल्ली—२-७-४०

: २८ :

# अरण्यरुदन

**ऊर्ध्वे बाहुर्विरौम्येप नच कश्चिच्छृणोति मे ।**
**धर्मादर्थश्च कामश्च सधर्मः किं नसेव्यते ॥**

बापूजी अणे यांनीं सिमल्यावरून परत येतांना शनिवारीं दिल्लीला माझ्याकडे पायधूळ झाडली. आम्हीं बरोबरीनें कार्य करीत असूं कीं एक-

मेकांच्या विरोधांत असूं, त्यांचा माझ्यावरील लोभ तसाच कायम आहे. व त्यामुळें संधि सांपडली कीं ते मला येऊन भेटतात. ते माझ्याशीं मन-मोकळेपणानें बोलतात व आपल्या अखंड संग्रहांतले एक दोन श्लोक मला ऐकवतात. कॉंग्रेसबरोबरचें माझें नातें तुटलें याबद्दल त्यांनीं सहानुभूति दाखवली म्हणण्यापेक्षां माझें अभिनंदनच केलें. ते म्हणाले, "मला वाटतें त्यांनीं तुम्हांला आतां आपला मार्ग चोखाळण्यासाठीं सवड द्यावी. तुम्हीं प्रत्येक ब्रिटनला उद्देशून केलेलें निवेदन मी वाचलें. पण त्याचा कांहींहि परिणाम व्हायचा नाहीं. न होईना कां, तुमच्या दृष्टीनें तुम्हांला त्यांचें कर्तव्य ( धर्म ) कोणतें हें सांगितल्याशिवाय रहावत नव्हतें. ते तुमच्या शब्दाची कांहींच किंमत करणार नाहींत हें मात्र तितकेंच खरें. पण जेथें कॉंग्रेसलाच तुमचें म्हणणें अशा आणीबाणीच्या प्रसंगीं पटत नाहीं तेथें त्यांना न पटल्यास नवल नाहीं. खुद्द व्यासच सांगून सांगून थकले तरी त्यांचें कुणीहि मनावर घेतलें नाहीं, तेथें इतरांची काय कथा ? त्याला आपल्या महाभारतासारख्या ग्रंथाच्या शेवटीं आपल्या आत्म्याची ही व्यथा श्लोकरूपानें लिहूनच तें महाकाव्य संपवावें लागलें." लेखाच्या प्रारंभीं त्यांनीं म्हणून दाखवलेला श्लोक मी दिलेलाच आहे. अशा रीतीनें त्यांनीं माझ्या श्रद्धेला बळकटी आणली. माझा मार्ग कीति बिकट आहे याचीहि जाणीव करून दिली पण अजूनदेखील माझा मार्ग जेवढा बिकट भासतो तेवढा तो मलाच केव्हांहि वाटला नाहीं. आज जरी सरदार आणि मी या दोघांचे मार्ग भिन्न झाल्यासारखे वाटत असलें तरी आमचीं अंतःकरणें मात्र अभिन्न अशींच आहेत. सरदारांना माझ्या जवळून दूर हटण्यापासून परावृत्त करणें माझ्या आंवाक्यांतलें होतें पण तसें करणें मला योग्य होणार नाहीं. राजाजींना जें आपलें कर्तव्य आहे असें दृढपणानें वाटलें त्याच्यापासून त्यांना आंवरून धरणें हें देखील चुकीचें ठरलें असतें. म्हणूनच मी राजा-जींना त्यांच्या मार्गानें जाण्याचा धिंवसा दिला. तसें करणेंच माझें कर्तव्य होतें. जर माझ्या विश्वासाप्रमाणें मला माझे अहिंसेचे प्रयोग यशस्वी करतां आले आणि जनता खरोखरीच अहिंसेला चिकटून बसलेली असेल तर सरदार आणि राजाजी यांना माझ्याकडे परत यावेंच लागेल.

अहिंसेचा प्रयोग सनदशीर सत्तेविरुद्ध करण्यांत आपल्याला बरेंचसें यश प्राप्त झालें. या अहिंसेचें वर्णन नेहमीं मी दुबळ्यांची आहिंसा असें करीत आलों आहे. ही अहिंसा आतां कॉंग्रेसवादी लोकांनीं अंगिकारली असें म्हणायला हरकत नाहीं.

पण अंतर्गत बंडाळी, हिंदु मुसलमानाचे दंगे या बाबतींत मात्र आपल्याला दृश्य स्वरूपांत यश मिळालेलें नाहीं. जेव्हां अंतर्गत बेबंदशाही होण्याचीं चिन्हें दिसतील तेव्हां कॉंग्रेसवाल्यांनीं काय करावें? त्यानीं ठोशाला ठोसे द्यावेत कीं ठोसे देणारांपुढें आपलें डोकें लववून ठेवावें? या प्रश्नाचें उत्तर देणें वाटतें तितकें सोपें नाहीं. फारशा विस्तारांत न शिरतां मी एवढेंच सांगतो कीं अशावेळीं कॉंग्रेसवाल्यांनीं इतरांचे प्राण न घेतां स्वतःचेच प्राण धोक्यांत घालून परिस्थिति काबूंत आणावी. प्रत्याघात न करतां जो आघात झेलून घेतो त्यानें आपलें शंभर टक्के कर्तव्य बजावलें असें म्हटलें पाहिजे. याचा परिणाम होणें आपण देवावर सोंपवूं या.

पण येवढें मात्र स्पष्ट आहे कीं या प्रकारची अहिंसा ही काहीं दुबळ्याची अहिंसा नव्हे. हिच्यामुळें तुरुंगांत जाण्याचा आनंद मिळत नाहीं. कारागृहवासाच्या आनंदाबरोबरच सरकारविरुद्ध द्वेषबुद्धि देखील अंतःकरणांत बाळगतां येते. एकट्यालाच सरकारबरोबर असहकारिता देखील करतां येते. पण ज्यावेळीं केवळ तरवारी, लाठ्या आणि सुरे यांचाच स्वैर उपयोग करण्यांत येतो त्याप्रसंगीं एकटा काय करूं शकणार? आपल्या अंतःकरणांत द्वेषबुद्धि बाळगून असले प्राणघातक आघात सहन करणें शक्य असेल का कोणाला? ज्यांचें अंतःकरण केवळ कर्तव्यानें ओथंबून गेलेलें आहे त्यालाच हें शक्य आहे. अशालाच फक्त हे घाव झेलणें पुष्पवृष्टी सारखें वाटेल. अशी एकटी व्यक्तीदेखील देवाच्या कृपेनें हजारों व्यक्तींनीं करावयाचें कार्य करूं शकेल. यासाठीं आत्मबळ हवें, नैतिक बळ हवें, आणि तें देखील उच्चप्रतीचें.

अशा तऱ्हेच्या शूरांच्या अहिंसेचा अंगिकार करणारा पुरुष किंवा स्त्री परचक्राला देखील सहज तोंड देऊं शकेल. अहिंसेचें हें एक तिसरें कार्यक्षेत्र

होय. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या मतें अहिंसा अंतर्गत बंडाळीला आळा घालूं शकेल परंतु परचक्राला तोंड देण्याच्या बाबतींत मात्र हिंदुस्थान असमर्थ ठरेल. हा त्यांचा श्रद्धेचा अभाव माझ्या अंतःकरणाला बोंचत आहे. लक्षावधि शस्त्रहीन जनता अहिंसेचा प्रयोग यशस्वी रीतीनें करूं शकत नाहीं याच्यावर माझा विश्वासच जडत नाहीं. बलवानांच्या अहिंसेचें शस्त्र वर निर्देशिलेल्या साऱ्याच कार्यक्षेत्रांत प्रभावी ठरूं शकतें असें कॉंग्रेसजनांनीं सरदारांना बजावून सांगितलें पाहिजे. सरदारांचा बलवानाच्या अहिंसेवरील विश्वास आतां ढळलेला आहे. पण हिंदुस्थानातल्या लढाऊ जमातींचें काय करायचें" असें कोणीहि विचारतां कामा नये. त्यामुळेंच मला आणखी वाटूं लागतें कीं कॉंग्रेसजनांनीं अहिंसात्मक लष्कराच्या बळावर हिंदुस्थानचें संरक्षण केलें पाहिजे. हा अगदीं नवा प्रयोग होणार आहे. पण कॉंग्रेसजनांशिवाय याचा अवलंब कोण करणार ? जर आपल्या जवळ पुरेसे अहिंसावादी सैनिक असले तर आपण या नव्या कार्यक्षेत्रामध्यें देखील विजयी होऊं. यामुळें कोट्यावधि रुपयांचा चुराडा व्हायचा थांबेल तो निराळाच.

माझी म्हणूनच साऱ्या गुजराथी कॉंग्रेसवाल्या स्त्रीपुरुषांना अशी विनंति आहे कीं त्यांनीं आपली अहिंसेवरची श्रद्धा कायम असल्याची घोषणा करावी व सरदारांना सांगून टाकावें कीं ते कधींहि हिंसेचा आश्रय घेणार नाहींत. हिंसेच्या प्रयोगांत यशाची आशा असली तरी देखील ते अहिंसेलाच चिकटून असतील. आपल्या दोषामुळेंच आपण नवें ज्ञान प्राप्त करून घेऊं, पतनावाचून उत्थापन नाहीं, झोंपेवांचून जागृति नाहीं.

वर्ध्याच्या वाटेवर, ७–७–४०

: २९ :

# माझें नेतृत्व

( गांधीसेवासंघ व चरखासंघ यांच्या संयुक्त सभेपुढें केलेलें भाषण )

वर्किंग कमिटीची कसोटी पाहण्यांत आली तेव्हां तिच्यांत अजून खोट आहे, असें आढळून आलें. आतां तुमच्या अग्निपरीक्षेची वेळ आहे. गांधीसेवासंघ वर्किंग कमिटीचें अपयश भरून काढणार नाहीं कां? लोकांना आपला अहिंसेवरचा विश्वास जाहीर करायला तुम्हीं सांगूं शकतां. कमिटीनें तसें न करण्याबद्दल कांहीं आपल्या ठरावांत सांगितलेलें नाहीं. " तुम्हीं आमच्या श्रद्धेची किंमत कमी लेखली पण आम्हीं आमचें ब्रीद सोडणार नाहीं, " असें तुम्हीं कमिटीला बजावून सांगावयाला हवें. गांधीसेवासंघाच्या सभासदांचें आणि अहिंसेवर श्रद्धा ठेवणारांचे हें कर्तव्य आहे. वेळच पडली तर खुल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत त्यांनीं तसें सांगितलें पाहिजे. तुमची अहिंसावृत्ति खरी असेल तर ती तुमच्या नित्याच्या जीवनांत देखील आढळून येईल. तुमच्या आचारांत, विचारांत उच्चारांत ती ओतप्रोत असलीच पाहिजे; तरच वर्किंग कमिटीला तसें तुम्हीं बजावूं शकाल.

मला जरा याचें स्पष्टीकरण केलें पाहिजे. तुम्हीं आपल्या प्रत्येक कृतीची चांचणी आपल्या ब्रीदाच्या दृष्टिकोनांतून करा. तुमची कृति रडवी होतां कामा नये, तींत स्वाभाविकपणा असलाच पाहिजे. जेव्हां मी मौनाला प्रारंभ केला तेव्हां तें सांभाळण्यासाठीं मला खूप प्रयत्न करावे लागले. आतां मी मौन सोडीन म्हटलें तर मला खूप यत्न करावे लागतील. इतका स्वाभाविकपणा माझ्या मौनांत आतां आलेला आहे. अशाच प्रकारें तुमच्या अहिंसात्मक आचारामध्यें स्वाभाविकपणा आला पाहिजे.

तुमचें प्रत्येकाचा अहिंसेशीं संबंध जोडण्याचें कृत्य तर्कदृष्ट्या चुकीचें देखील असेल पण मला मात्र त्यांत कांहींहि चूक वाटत नाहीं. मीं काढतों त्या सुताच्या प्रत्येक धाग्यानें स्वराज्य जवळ येतें हा माझा विश्वासइतरांच्या दृष्टीनें चुकीचा असेल, पण माझी ही श्रद्धा माझ्या अस्तित्वा इतकीच खरी आहे. त्यामुळें मीं गोंधळून जात नाहीं. चरखा हें माझ्या दृष्टीनें अहिंसेचें प्रतीक आहे. चरखा निर्जीव असला तरी मीं त्यांत प्रतीकाचा शोध लावतां क्षणींच त्यांत, माझ्या लेखीं, सजीव पण आलें. त्याचें संगीत अहिंसेच्या स्वरांशीं जुळणारें आहे. त्याच्या फेऱ्यांत जर संगीत नसेल तर अहिंसेचा त्याचा स्वर मिळूं शकणार नाहीं, मी निष्काळजीपणानें चरखा चालवीत होतों हें दिसून आलें. पोलादी चातीचा प्राणघातक शस्त्र म्हणून उपयोग होऊं शकेल पण आपण तिचा शक्य तेवढा उत्कृष्ट उपयोग करून घेतला. यासाठींच आपण चरख्याच्या प्रत्येक भागाविषयीं योग्य दक्षता बाळगली पाहिजे म्हणजे मगच आपल्याला त्यांतून मधुर संगीत निर्माण करतां येईल व कांतणें हें खरोखरीच त्यागाचें थोर कृत्य ठरेल.

पण अशा प्रकारची साधना प्राप्त व्हायला हजारों वर्षें लागतील असें तुम्हीं म्हणाल. कांहींना लागतीलही हजारों वर्षें, पण कित्येकांना ती एखाद्या वर्षांत देखील अवगत होईल. मी स्वतः देखील पुष्कळ वर्षें प्रयोग करून शेवटीं पूर्णपणें पारंगत होऊं शकलों नाहीं, म्हणून तुम्हालाही जास्ती वर्षें लागतील असें मात्र समजूं नका. त्रैराशिकाचा नियम या बाबतींत लागू पडणार नाहीं. माझ्यापेक्षां तुम्हीं लवकर देखील प्रवीण होऊं शकाल. मी पृथ्वीसिंगांना म्हटलें होतें, "तुमच्याजवळ निदान शूराची हिंसा तरी होती, माझ्याजवळ कांहींहि नव्हतें. पण आतां तुम्हीं शूराची अहिंसा आंगीं रुजवण्यावर श्रद्धा ठेवूं लागलांत. तुम्हीं माझ्यापेक्षां लवकर आपला हेतू फलद्रूप करून घ्याल आणि मला मागें टाकाल." हेंच म्हणणें इतरांना देखील लागू पडतें. दक्षिण आफ्रिकेंत जोडे शिवण्याचें काम मी आधीं शिकलों, व मग ती कला मी इतरांना शिकवली. पण माझ्याजवळून शिकणारांनींच मला लवकरच मागें टाकलें. हें होऊं शकलें याचें कारण

मी खरा शिक्षक होतों. मी जर आतां अहिंसेचा खरा शिक्षक असेन, तर माझी खात्री आहे कीं तुम्हीं लवकरच मला मागें टाकाल. जर तसें घडलें नाहीं तर त्याचा अर्थ मी नालायक शिक्षक आहें असा होईल. पण जर माझें शिक्षण फलद्रूप झालें तर घरोघरीं अहिंसेचे शिक्षक निर्माण होतील.

तुमच्या पैकीं कितीजण माझ्या मागें येणार आहांत, हें मला समजून घ्यावयाचें आहे. माझ्या मागें कुणींच येणार नसेल तर मला एकट्यालाच माझा मार्ग चोखाळावा लागेल. माझ्या पाठीशीं परमेश्वर रहाणार असल्यामुळें मी केव्हांहि एकटा असणार नाहीं याची मला खात्री आहे. तुम्हीं माझे सहकारी साधक आहांत. मी आतां म्हातारा झालों पण तुम्हांला अजून किती तरी वर्षें घालवावयाचीं आहेत. मला अजूनहि माझ्या वयाचा भार वाटत नाहीं. माझें प्रगमनशील सामर्थ्य किंवा शोध-बुद्धि अजून संपुष्टांत आलेली नाहीं, असें मला वाटतें......माझ्या दोषांची जाणीव माझ्यापेक्षां इतरांना अधिक असेल असेंहि मला वाटत नाहीं, पण जें कांहीं सामर्थ्य माझ्या आंगी आलेलें आहे तें माझ्या अहिंसेमुळेंच. हजारों स्त्रिया निर्भयपणानें मला विश्वासांत घेतात त्याचें कारण अहिंसेशिवाय दुसरें कोणतें असूं शकतें ? पण त्या बाबतींत आपण आपल्या या भांडवलावर नुसतें विसंबून चालणार नाहीं. अहोरात्र आपल्याला आपल्या साधनेंत प्रगति करावयाला हवी. जसा हिटर हिंसेंत एकजीव झालेला आहे तसें आपण अहिंसेंत आपलें जीवनसर्वस्व मिसळून टाकलें पाहिजे......अहिंसेंत किंवा चरख्यांत नुसता विश्वास असून भागावयाचें नाहीं. तो विश्वास बुद्धिगर्भित आणि सृजनशील असला पाहिजे. जर हिंसेच्या कार्यक्षेत्रांत बुद्धीला वाव मिळतो तर तो त्याहीपेक्षां अधिक प्रमाणानें अहिंसेच्या कार्यक्षेत्रांत मिळाला पाहिजे......विधायक कार्यक्रमाच्या आधीं सविनय कायदेभंगाचा कार्यक्रम अंमलांत आणण्यांत माझें चुकलें. आणि मी केलेल्या त्या हिमालया-एवढ्या चुकीनें माझा कांहींहि लाभ झालेला नाहीं. माझी बुद्धि आणि यश हीं जशीं दैवी देणगी होय, तशीच माझी अपूर्णता आणि अपयश हें देखील दैवी वरदानच होय. हीं दोन्हींही परमेश्वर चरणींच मी अर्पण करीत आहें. येवढ्या प्रचंड प्रयोगासाठीं देवानें माझ्या

सारख्या अपूर्ण व्यक्तीची निवड कां केली बरें ? मुद्दामच त्यानें तसें केलें असावें असें मला वाटतें. लक्षावधि मुक्या बहिऱ्या दरिद्री जनतेची त्याला सेवा करावयाची होती. पूर्ण पुरुषामुळें कदाचित त्यांची निराशा झाली असती. त्यांच्याच योग्यतेची एक व्यक्ति अहिंसेच्या मार्गावर जातांना जेव्हां त्यांना दिसली, तेव्हां त्यांना देखील स्वतःच्या योग्यतेबद्दल विश्वास वाटूं लागला. एखादा पूर्ण पुरुष जर आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठीं आला असता तर आपल्याला त्याची ओळखच पटली नसती व त्याला आपण एखाद्या गुहेंत पिटाळलें असतें. माझें अनुयायीत्व पत्करणाराच एखादा पूर्णत्वाच्या पदवीला जाऊन पोंहचेल आणि तुम्हांला त्याचा संदेश ऐकायला मिळूं शकेल. तुमच्यापैकींच कोणी तरी तो भावी शिक्षक असूं शकेल.

...जोपर्यंत आपण सशरीर अस्तित्वांत आहोंत तोपर्यंत पूर्ण अहिंसा पाळणें अशक्य होईल. कारण आपल्याला उभें रहायला तरी जागा लागणारच.

—सेवाग्राम १५–७–४०

: ३० :

# खानसाहेबांची अहिंसा

वर्किंग कमिटीच्या बऱ्याचशा सभासदांना दोलाचल करणारें वादळ खानसाहेबांवर परिणाम करूं शकलें नाहीं. ते एखाद्या खडकाप्रमाणें अढळ राहिले. त्यांना स्वतःच्या भूमिकेबद्दल मुळीं देखील शंका वाटत नाहीं. त्यांनीं काढलेलें पत्रक आपल्या सर्वांनाच प्रकाश दर्शन करूं शकेल—

> कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या आतां नुकत्याच मान्य झालेल्या ठरावावरून असें दिसतें कीं हिंदुस्थनांत असलेल्या सनदशीर सत्तेशीं आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढतानांच फक्त अहिंसेचा उपयोग कर-

ण्याची मर्यादा घालण्यांत आलेली आहे. भविष्यकाळीं याचा कितपत व कसा उपयोग होऊं शकेल हें मला सांगतां येत नाहीं. निकटतम भविष्यकाळ याच्यावर लवकरच प्रकाश पाडूं शकेल कदाचित. पण आतां मला कॉंग्रेस वर्किंग कमिटीमध्यें राहणें कठीण वाटतें व म्हणूनच मी राजीनामा देऊन बाहेर पडत आहें. माझी श्रद्धाविषय झालेली व मी माझ्या खुदाई खिदमतगार बांधवांना शिकवलेली अहिंसा अधिकच व्यापक स्वरूपाची आहे हें मला येथें स्पष्ट सांगून टाकलें पाहिजे. तिचा आमच्या जीवनांवर प्रभाव पडतो व तिचेंच फक्त चिरंतन मोल ठरूं शकतें. या अहिंसेचें पूर्ण ज्ञान प्राप्त झालें नाहीं तर सरहद्द प्रांतात रहाणाऱ्या लोकांना भोवणारा भयंकर यादवीच्या मरणप्राय शापापासून आमची मुक्तता होणार नाहीं. आम्हीं अहिंसेची प्रतिज्ञा घेतल्यापासून आणि खुदाई खिदमतगारांनीं तिचें व्रत घेतल्यापासून आम्हीं आमच्या यादवीला आळा घालण्यांत बऱ्याच अंशी यशस्वी झालों. पठाणांच्या हिंमतीत अहिंसेमुळें खूपच भर पडली. इतरांच्या पेक्षां ते खूपच प्रमाणांत हिंसेनें धुंद झालेले होते, त्यामुळें अहिंसेनें त्यांचा खूपच फायदा झाला. अहिंसेशिवाय आम्हीं स्वतःचे खरें परिणामकारक संरक्षण करूं शकणार नाहीं. आम्हीं खुदाई खिदमतगारांनीं आपल्या नांवासारखी कृति केली पाहिजे. देवाचे आणि मानवतेचें सेवक असलेले खुदाई खिदमतगार दुसऱ्यांचे प्राण घेणार नाहींत, स्वतःचे प्राण मात्र देतील."

गेलीं वीस वर्षें खानसाहेबांनीं जें आचरण केलें त्यालाच आजहि चिकटून राहणें हें त्यांना खात्रीनें भूषणावह आहे. ते जन्मानें पठाण आहेत आणि पठाण हा खांद्यावर बंदूक टाकून किंवा कमरेला तरवार बांधूनच जन्माला येत असतो. परंतु रौलट कायद्याविरुद्ध सत्याग्रह करायला निघालेल्या पठाणांना स्वेच्छेनें आपलीं हत्यारें खालीं ठेवायला खानसाहेबांनीं सांगितलें. स्वेच्छेनें हिंसेचीं हीं शस्त्रें खाली ठेवण्यामुळें यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें चमत्कार झाला. पठाणाच्या दैनंदिन जीवनाचाच एक भाग झालेलें आणि वारसा हक्कानें बापापासून मुलाला मिळालेलें वैर आणि रक्तस्नान थांबवण्या-

साठीं फक्त हाच एक तोडगा होता. त्यामुळें बऱ्याचशा कुटूंबांना शांतता लाभली आणि खानसाहेबानां जणु चिरवांछित मोक्षाचा मार्ग सांपडला. रक्तलांछित भांडणाचा शेवट केवळ पठाणांच्या सर्वनाशामध्येंच झाला असता. बदला घेण्याची आत्मघातकी प्रवृत्ति सोडून देण्याविषयीं आपण सांगितलें तर पठाणाचें शौर्य यापेक्षां अधिक सत्कारणीं लागूं शकेल असें त्यांना स्पष्ट दिसून आलें. पठाणानीं खानसाहेबांचा संदेश ऐकला आणि शूरांची अहिंसा आचरणांत आणून दाखविली.

अशा रीतीनें स्वतःच्या आणि खुदाई खिदमतगारांच्या श्रद्धेबद्दल पूर्ण जाणीव बाळगून रहाणाऱ्या खानसाहेबांना कॉंग्रेस वर्किंगकमिटीच्या सभासदत्वाचा राजीनामा दिल्यावांचून गत्यंतरच नव्हतें. कमिटींत रहाण्याचें त्यांनीं ठरवणें हें विसंगत झालें असतें व त्यामुळें त्यांच्या जीवनसाधनेचा अंत देखील झाला असता. आपल्या लोकांना लष्करांत भरती होण्याचा उपदेश करून तिकडे कुटुंबीय भांडणांत मात्र अहिंसा पाळण्याबद्दल सागणें त्यांना शक्य नव्हतें. साध्याभोळ्या पठाणांनीं त्यांच्याबरोबर वादाविवाद केला असता आणि त्याचें उत्तर देणें जड गेलें असतें. आमचें युद्ध देखील सूड आणि त्याची परतफेड करण्याच्या बुद्धींतूनच निर्माण झालेलें आहे; पठाणांच्या घरगुती रक्तलांच्छित वैराचें मूळ देखील अशाच बुद्धींत असतें.

आपला संदेश जनतेमध्यें खानसाहेब कितपत फैलावूं शकले याची मला माहिती नाहीं. येवढें मात्र मी सांगू शकतो कीं त्यांची अहिंसा म्हणजे बुद्धीला पटणारा विचार नसून अंतःकरणाला भिडणारी श्रद्धा आहे. त्यामुळें कशानें देखील तिचा पाया डळमळणार नाहीं. आपले अनुयायी अहिंसेला कुठवर चिकटून राहूं शकतील हें त्यांना सांगता येत नाहीं, पण त्याची त्यांना फिकीरहि वाटत नाहीं त्यांच्या संबंधीचें आपलें कर्तव्य पार पाडणें येवढेंच कायतें खानसाहेबाचें ध्येय; त्याची फलद्रूपता देवाहातीं आहे. आपली अहिंसा त्यांनीं कुराणेशरीफ मधून शोधून काढली. ते सच्चे मुसलमान आहेत. माझ्या एक वर्षाच्या सहवातांत मी त्यांना कधींहि आपला नमाज किंवा रमझानचा रोजा चुकवतांना पाहिलेलें नाहीं, त्यांची इस्लाम-

वरची श्रद्धा म्हणजे इतर धर्मांबद्दलची हेटाळणी नव्हे. त्यांनीं गीता वाचली. ते वाचतात थोडें पण अगदीं वेंचक, आणि स्वतःला पटणारे विचार ते तात्काळ आत्मसात करून घेतात. लांबलांब युक्तिवाद त्यांना आवडत नाहींत व आपला निर्णय घेतांना ते मुळींच विलंब करीत नाहींत. ते आपल्या ध्येयांत यशस्वी झाले तर बरेचसे प्रश्न सुटण्याजोगे आहेत. पण परिणामाबद्दल कोण सांगू शकणार ? करणें धरणें सर्व कांहीं देवाच्या हातीं असतें.

—सेवाग्राम—१६–७–४०

: ३१ :

# नैतिक पाठिंबा

एका स्नेह्यानें खालीं दिलेलें पत्र लिहिलें--

" युद्ध सुरू होतांच तुम्हीं ब्रिटनला नैतिक पाठिंबा देण्याचा उपदेश केला. बऱ्याच जणांना अशा पाठिंब्याचा भावार्थ समजला नाहीं. माझ्या माहिती प्रमाणें अजून तरी तुम्हीं त्याचें स्पष्टीकरण केलेलें नाहीं. मी नियमीतपणें हरिजन बंधू वाचत असतो पण मला देखील तुमचें स्पष्टीकरण केव्हांहि वाचायला मिळालें नाहीं. त्या शब्दावर प्रत्येकजण आपलीच मल्लीनाथी करीत सुटतो. गुजरात प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या गेल्या बैठकींत पुढाऱ्यांनीं असे उद्गार काढले कीं, "बापू ब्रिटनला नैतिक पाठिंबा द्यायला तयार होते. आपल्या नुकत्याच केलेल्या ठरावान्वयें कॉंग्रेसनें देखील तेंच केलें नाहीं कां ? उलट कॉंग्रेस याच्या मोबदल्यांत कांहीं मागते देखील. बापूनीं तर कांहीं न मागता तो तसाच देऊं केला होता." जर युद्ध हें स्वतःच दुष्कृत्य असेल तर त्याला नैतिक पाठिंबा देणें योग्य आहे काय ?

महाभारतांत भगवान कृष्णानें अर्जुनाला दिलेली मदत नैतिक होती कीं युद्धांतल्या विनाशक शस्त्रास्त्रांपेक्षां अधिक विध्वंसक होती ?"

नैतिक पाठिंब्याचा अर्थ मी हरिजन्मधून स्पष्ट केलेला होता. हरिजन बंधूंत तें स्पष्टीकरण प्रसिद्ध न होण्याची शक्यता आहे. स्थूल मानानें बोलायचें झालें तर, ब्रिटनची हिंदुस्थानबरोबरची वागणूक जर न्यायाची असती, तर कॉंग्रेसनें ब्रिटनला आपला नैतिक पाठिंबा दिला असता. माझ्या सूचनेत सौदेबाजीचा अंतर्भाव नव्हता कारण माझी मदत निरपेक्ष होती.

समजा माझ्या मित्रानें तपस्येच्या बळावर नैतिक सामर्थ्य संपादन केलें आणि समजा मला त्याची गरज आहे, तर ती मला त्याच्या जवळून केवळ मागितल्यानें मिळावयाची नाहीं. तो द्यावयाला तयारहि होईल, पण माझ्या आंगी ती मदत त्याच्या जवळून घेण्याची योग्यता आली पाहिजे. ती मीं कशी मिळवणार ? नैतिक पाठिंबा केवळ देतों म्हटल्यानें देतां येत नाहीं. ज्याची तो मिळविण्याची पात्रता असेल त्याच्याकडे तो चालतच जातो. अशांना तो विपुल मिळूं शकतो. कॉंग्रेसजवळ हा नैतिक सांठा आहे. सत्य आणि अहिंसा याचा स्वीकार हीच तिची तपस्या होय. आपल्या ध्येयासाठीं सत्य व अहिंसा याचा अंगिकार करून तिनें जगांत प्रतिष्ठेचें स्थान मिळवलें. कॉंग्रेसनें ब्रिटनला आपला पाठिंबा दिला असता तर जगाला ब्रिटनचें कृत्य न्याय्य वाटलें असतें. कॉंग्रेसचें वर्चस्व मान्य करणाऱ्या बहुजन समाजाला देखील ब्रिटनची बाजू न्यायाची आहे असें वाटलें असतें. पण हें सगळें करतांना कॉंग्रेसला प्रत्यक्ष असें कोणतेंही साहित्य देतां आलें नसतें. ब्रिटिश सरकारला मात्र आपल्याच कृतीनें नैतिक प्रतिष्ठा लाभली असती. कॉंग्रेसनें एकही दमडी किंवा शिपाई दिला नसता तरी देखील तिच्या नैतिक पाठिंब्याच्या पासंगानें युद्धाचें पारडें ब्रिटनच्या बाजूला झुकलें असतें, असा माझा दृढ विश्वास आहे.

पण आतां नैतिक पाठिंबा मिळविण्याची संधि निघून गेली. कॉंग्रेस माझा मार्ग स्विकारावयाला असमर्थ ठरली. कॉंग्रेसनें आपल्यांत नसलेल्या

गुणांचे कधींहि स्तोम माजवलेलें नाहीं, यांतच तिचा थोरपणा आहे. म्हणूनच तिचे ठराव स्वाभिमानाचे असतात व त्यांचा प्रभावहि पडतो.

काँग्रेसनें नुकताच एक ठराव केला त्या ठरावान्वयें साधन सामुग्री देण्याची मदत तिनें देऊं केली, पण ज्यासाठीं ती मदत द्यायची तें कितीहि न्याय्य असलें तरी मदत मात्र बिनशर्त राहूं शकत नाहीं. ही भूमिका नैतिक दृष्ट्या चुकीची आहे असें मी म्हणणार नाहीं. बहुमतानें तो ठराव मंजूर झाल्यामुळें तो अयोग्य आहे, असें मी म्हणणार नाहीं. पण माझ्या मतें तो मंजूर करून तिनें आपली असलेली प्रतिष्ठा मात्र गमावली असें मला वाटतें. काँग्रेस युद्धाचें मूळ नष्ट करण्यासाठीं अमोल मार्ग शोधून काढण्याचा प्रयोग करीत आहे असा सगळ्या जगाचा समज होता. ब्रिटनसारख्या बलवान सत्तेजवळून केवळ शुद्ध अहिंसेच्या जोरावर स्वातंत्र्य मिळवूं पाहणारी काँग्रेस त्याच स्वातंत्र्याचें रक्षण त्याच मार्गानें करूं शकणार नाहीं, असें हिंदुस्थानाबाहेर कोणाला स्वप्नांत देखील खरें वाटलें नसतें.

माझ्या मतें भगवान कृष्णाची अर्जुनाला झालेली मदत नैतिक स्वरुपाची नव्हती. याचें कारण असें कीं त्याच्याजवळ स्वतःचें सैन्य होतें व तो स्वतः देखील युद्ध कलेंत निपुण होता. दुर्योधनानें त्याचें सैन्य मागण्याचा मूर्खपणा केला आणि अर्जुनाला कृष्णासारखा युद्धकलानिपुण सहाय्यक मिळूं शकला त्यामुळेंच महाभारत नीट समजून वाचलें तर असें कळून येईल कीं कृष्णाचें सामर्थ्य त्याच्या सैन्यापेक्षां अधिक विध्वंसक होतें. कृष्णाच्या शास्त्रीय ज्ञानामुळेंच सात अक्षौहिणी सैन्यानें दुर्योधनाच्या अकरा अक्षौहिणीचा धुव्वा उडवला. महाभारताकडे मी फक्त एक पार्थिव युद्धाची बखर या नात्यानें बघत नाहीं हें साऱ्यांनाच माहित आहे. महाकाव्याच्या आवरणाखालीं कवीनें असत्य आणि हिंसा आणि अहिंसा, सुष्ट आणि दुष्ट यांच्या मधील सनातन संग्रामाचें व्यक्ति आणि समाजांत चाललेलें तांडव दाखविलेलें आहे. व्यासश्रेष्ठानें आपल्या काव्यांत विजयी पक्षाला देखील नष्ट पावलेल्या पक्षांपेक्षां कांहींहि अधिक मिळूं शकत नाहीं असें दाखवून दिल्याचें, वरवर तें काव्य चाळून पहाणाऱ्यांना देखील समजूं शकेल. केवळ सातच योद्धे त्या संहारामधून वाचूं शकले. त्या सात जणांच्या वेदना व्याकुल मनाचें

चित्रण व्यासानें केलेलें आहे. शस्त्रास्त्रांच्या युद्धांत युद्ध्यमान पक्ष फसवाफसवी आणि नीचपणा करण्याइतके अधःपतित होऊं शकतात हेंहि कवीनें दाखवून दिलेलें आहे. महात्मा युधिष्ठिराला देखील युद्धाच्या वेळीं प्रसंग पडतांक्षणीं विजयासाठीं खोटें बोलणें भाग पडलें.

आणखीं एका प्रश्नाचें उत्तर आतां द्यायचें राहिलेलें आहे. युद्ध हेंच जर दुष्कृत्य असेल तर त्याला नैतिक पाठिंबा कसा देतां येईल ? मला स्वतःला युद्ध हें सर्वस्वी दुष्कृत्य वाटतें पण युद्ध्यमान पक्षाचीं उद्दिष्टें जर आपण तपासून पाहिलीं तर त्यापैकीं एकाचें चुकीचें असेल व दुसऱ्याचें बरोबर असेल. समजा **अ** ची इच्छा **ब** चा देश हिरावून घ्यायची आहे, तर मग **ब** वर हा निःसंशय अन्याय होतो. दोघेहि शस्त्रास्त्रांनीं युद्ध करतात. माझा हिंसाप्रधान युद्धावर विश्वास बसत नाहीं, परंतु त्याचवेळीं **ब** चें कृत्य न्यायाचें असल्यामुळें तो माझा नैतिक पाठिंबा मिळवायला लायक आहे.

सेवाग्राम, १२-८-४०

## : ३२ :

# अहिंसक पोलिस

## (एका लेखांतला उतारा)

अहिंसक राज्यसंस्थेला देखील पोलिसांची गरज आहेच. हें माझ्या अपूर्ण अहिंसेचें एक लक्षण आहें, असें मी मान्य करतों. सैन्याशिवाय आम्हीं कारभार चालवूं शकूं असें मी म्हणूं शकत असलों तरी तसेंच मला पोलिसांच्या बाबतींत म्हणण्याचें धैर्य होत नाहीं. पण जेथें पोलिस अजिबात असणार नाहींत अशा राज्यसंस्थेचें दृश्य माझ्या कल्पनाचक्षूंना दिसूं शकतें, पण तें प्रत्यक्ष सृष्टींत आणणें शक्य होईल कीं नाहीं हें फक्त भविष्यकाळच सांगूं शकेल.

माझ्या योजनेंतला पोलिस हा आजच्या पोलिसापेक्षां सर्वस्वी वेगळा आहे. त्यांचा अहिंसेवर विश्वास राहील. ते लोकांचे मालक असणार नाहींत, सेवक असतील. लोक आपणहूनच त्यांना लागेल ती मदत देतील. व त्यांच्या सहकार्यावर ते कमी कमी होत जाणाऱ्या आगळीकींचा बंदोबस्त करतील. पोलिसांजवळ एका तऱ्हेचीं आयुधें असतील पण तीं क्वचितच वापरण्यांत येतील. खरें पाहूं गेल्यास पोलिस शिपाई हे निव्वळ सुधारणा-वादी असतील. त्यांचे कार्य केवळ चोर दरोडेखोर यांच्या पुरतेंच मर्यादित राहील. मालक आणि मजूर यांचे झगडे क्वचितच होतील. संप तर होणारच नाहींत. याचें कारण असें कीं अहिंसाधारी बहुजन समाजाचें वर्चस्व येवढें मोठें राहील कीं समाजांतील प्रमुख घटकांवर त्यांचा दाब बसूं शकेल. जातीय दंग्यांना तर मुळींच जागा रहाणार नाहीं. अशा तऱ्हेचें कॉंग्रेस राज्य अस्तित्वांत आलें म्हणजे एकवीस वर्षें वयाच्या प्रत्येक स्त्री पुरुषाला मतदानाचा हक्क राहील.

सेवाग्राम १०–८–४०

## : ३३ :

# अहिंसेची व्याप्ति

### ( एका प्रश्नाचें उत्तर )

कॉंग्रेसची अहिंसा स्वाभाविकपणें राजकीय क्षेत्रापुरतीच मर्यादित आहे. आणि म्हणूनच तिच्यांत केवळ मानवी प्राण्यांचाच अंतर्भाव होतो. यामुळें संपूर्ण अहिंसा याचा अर्थ आपल्या पुरताच घ्यावयाचा झाला तर मी असें सांगेन कीं राजकीय कार्यक्षेत्रांत अहिंसेचें विविध दर्शन घडवणें हीच अहिंसा. कौटुंबिक संबंध, सत्ताधाऱ्याशीं येणारे संबंध, अंतर्गत बंडाळी आणि परचक्र या सर्वांशीं अहिंसेचा संबंध येतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें

म्हणजे सारे मानवी संबंध तिच्या व्याप्तींत येऊं शकतात. मांस खाणें आणि अंडीं खाणें देखील अहिंसेंत समाविष्ट होतें. तसें केलें नाहीं तर आपल्यांत मुसलमान व खिस्ती यांना सामील करून घेतां येणार नाहीं. बऱ्याचशा हिंदूंना देखील मग वगळावें लागेल. त्यांचें सहकार्य अहिंसेला मिळणार नाहीं. शाकाहारी लोकांपेक्षां माझ्या माहितींतले बरेचसे मांसाहारी अधिक अहिंसावृत्तीचे आहेत.

सेवाग्राम—२१-८-४०

: ३४ :

# कॉंग्रेसची अहिंसा

वर्ध्याला मला नुकतेच जे पुण्याचे कॉंग्रेसवादी भेटून गेले त्यांना मी सांगितलेल्या अहिंसेच्या व्याख्येंत अहिंसेची व्याप्ति खूपच कमी केली, अशी तक्रारवजा पत्रें माझ्याकडे आलेलीं आहेत. मी तेव्हां केवळ कॉंग्रेसच्या अहिंसेबद्दलच बोलत होतों, हें त्यांच्या लक्षांत आलें नसावें. माझ्या बद्दल बोलायचें झालें तर मी स्वतः कोणत्याहि जीवजंतूचा, विंचवासापाचा-देखील प्राण घेणार नाहीं. अशा तऱ्हेचें अहिंसेचें ब्रीद कॉंग्रेसवर लादणें चुकीचें होईल. कॉंग्रेस कांहीं धार्मिक संस्था नव्हे, तिचें स्वरूप राजकीय आहे. तिची अहिंसा फक्त मानवी जीवानांच लागू पडते. तिची व्याप्ति अधिक वाढवूं म्हटलें तर मग फक्त हिंदूच, आणि त्यांतले देखील केवळ जैन आणि वैष्णवच काय ते, कॉंग्रेसमध्यें भाग घेऊं शकतील. लक्षावधि मत्स्याहारी व मांसाहारी हिंदूंना कॉंग्रेसमध्यें येतां येणार नाहीं. माझी व्याख्या इतकी सरळ आणि सोपी होती कीं तिला कोणी हरकत घेऊं शकतील अशी कल्पना देखील मला शिवली नाहीं. माझ्या टीकाकारांनीं आणखीं हें ध्यानांत घ्यावें कीं, बऱ्याचशा

मुसलमानांनीं काँग्रेची ही मर्यादित अहिंसा देखील मान्य केलेली नाहीं. यावरून मानवापेक्षां खालचे जीव अहिंसेंत समाविष्ट करून तिची व्याप्ति वाढवण्याचा प्रयत्न फोल ठरेल हें दिसतेंच आहे. अमर्यादित अहिंसा विश्वव्यापि व्हायला कालावधि लागेल. समाजांत जर आपण सनदी कायद्याच्या ऐवजीं प्रेमाच्या कायद्याचा अंमल चालवूं शकलों आणि ज्यांना आपण आपले शत्रू मानून त्यांच्याविषयीं आपल्या अंतःकरणांत वैराग्नि धुमसत ठेवतों, त्यांच्यावर जर आपण आपल्या जिवलग मित्राप्रमाणें प्रेम करायला शिकलों, तर मग आपण आपले पुरेसें अभिनंदन करूं शकूं. केवळ जीवदयेनें आपण आपल्या षड्रिपूंवर विजय मिळवूं शकणार नाहीं. ज्यानें आपल्या मनावर ताबा बसवला, ज्याच्या मनांत सर्वांविषयीं सद्भावना व प्रेम आहे, ज्याचें प्रत्येक कृत्य प्रेमाच्या कायद्यावर आधारलेलें आहे, असा मनुष्य मला दाखवा. मग हरकत नाहीं तो मांसाहारी असला तरी. मी त्याच्या पायावर डोकें ठेवीन. याच्या उलट कामक्रोधाला बळी पडणाऱ्या परंतु किड्यामुंग्याना साखर खाऊं घालणाऱ्या व त्यांच्यावर पाय पडूं न देणाऱ्या व्यक्तीची जीवदया अगदींच कुचकामाची आहे. धर्माच्या नांवाखालीं चालणारे हे हीनमूल्य तात्रिक सोहळे होत. त्याच्याहि पलीकडे जाऊन मी असेंहि म्हणेन कीं अंतःकरणांतली भ्रष्टता लपविण्यासाठीं हा वरवरचा दंभाचा बुरखा होय.

सेवाग्राम—९-९-४०

: ३५ :

# बलात्काराच्या वेळीं ?

साऱ्या जगाच्या कसोटीची वेळ सध्याच्या प्रसंगीं आलेली आहे. या युद्धापासून कोणाचीहि सुटका होऊं शकत नाहीं. रामायण महाभारत हे

ग्रंथ कविकल्पित असले तरी त्या महाकाव्यांचे कर्ते नुसतेच कवी नव्हते, ते खरे ऋषि होते. ते नुसते शब्दशिल्पीच नव्हते, तर मनुष्य स्वभावाचे चित्रकार देखील होते. त्यामुळें त्यांनीं जें जें लिहिलें तें त्यावेळीं प्रत्यक्ष घडलें किंवा नाहीं याची शहानिशा करून घेण्याची आपणास गरजच पडत नाहीं. त्यांनीं वर्णन केलेले प्रकार आज प्रत्यक्ष घडत आहेत. आज रावणा रावणा-मध्यें युद्ध चाललेलें असून ते एकमेकांना आपलें अतुल बळ दाखवीत आहेत. आकाशांत उड्डाण करून ते आपलीं शस्त्रें एकमेकांवर टाकीत आहेत. आपलें व आपल्या मानीव शत्रूचें रक्त पाण्यासारखें वाहवीत आहेत. आपल्या आंवाक्याबाहेर असलेला कांहीं पराक्रम करायचा शिल्लक उरलेला आहे याची जाणीव देखील त्यांना शिवत नाहीं.

अशा प्रकारचें युद्ध मानव लढूंच शकत नाहींत, देवदेखील नाहींच. केवळ पशूंनांच हें शक्य आहे. त्यामुळेंच मनुष्य देहधारी पशूंनीं उघड उघड आज लाज सोडल्याचा देखावा आपल्याला दिसत आहे. धष्टपुष्ट देहाचे मदोन्मत्त सैनिक राजरोसपणें दुकानें लुटतात व स्त्रियांची अब्रू घेण्याचीहि त्यांना शरम वाटत नाहीं. सरकारनें उभारलेलें हें लष्कर आपल्या पाशवी गरजा भागवणारच व सरकारदेखील त्याच्याकडे दुर्लक्ष्य करणारच. जेथें सर्व राष्ट्रच्या राष्ट्र लष्करी बनलें, तेथें सैनिकांची ही संवय राष्ट्राची मामुली संवय मानण्यांत येते. तेथें सैनिकांच्या या कृत्यांत लज्जास्पद असें कांहींच मानीत नाहींत, उलट ती एकप्रकारची सभ्यताच मानली जाते.

पण हिंदुस्थानमध्यें अशा प्रकारचें आचरण सहन करण्याची वेळ यायला किंवा तो सभ्यतेचा प्रकार समजण्याची घटका यायला अजून युगें लोटावीं लागतील. एका भगिनीनें मला पुढील प्रश्न विचारले आहेत—

( १ ) रस्त्यावरून जाणाऱ्या एखाद्या भगिनीवर जर एखाद्या नरपशूनें बलात्कार केला तर त्यामुळें तिच्या सतीत्वाचा भंग झाला, असें समजण्यांत येईल काय ?

( २ ) अशा प्रकारची स्त्री तिरस्कृत समजली जाईल का ? तिला वाळींत टाकण्यांत येईल काय ?

( ३ ) असा प्रसंग ओढवलेल्या भगिनीनें काय करावें ? इतर लोकांनीं या प्रसंगीं काय केलें पाहिजे ?

एका दृष्टीनें पाहिलें तर तिच्या पातिव्रत्याचा भंग झाला असेंच म्हटलें पाहिजे. पण बलात्कार झालेली स्त्री मात्र तिरस्काराचा किंवा बहिष्काराचा विषय होऊं शकत नाहीं. तिची आपण दयाच केली पाहिजे. तिला जखमी स्त्री मानून तिची आपण सेवा केली पाहिजे. अशा कृत्याला जिची संमति असेल तिच्याच पातिव्रत्याचा भंग झाला, असें मानण्यांत येईल. परंतु प्रतिकार केल्यावरहि जिचें सतीत्व भंग करण्यांत येतें, तिच्यावर बलात्कार झाला असेंच म्हणणें योग्य होईल. पातिव्रत्याचा भंग या शब्दप्रयोगाचा पर्याय वाचक शब्द बलात्कार होऊं शकत नाहीं. ज्यावेळीं सतीत्वाचा भंग बलात्कारानें झाला असेल त्यावेळीं कोणतीहि नामोशी त्या स्त्रीकडून घडलेली नाहीं असें आपण मानलें पाहिजे. तरच अशा प्रकारचीं कृत्यें लपवून ठेवण्याचा जो रिवाज पडलेला आहे, तो दूर होऊं शकेल. आणि तो दूर झाला म्हणजे लोकांना उघडपणें अशा कृत्यांचा उहापोह करतां येईल. अशा कृत्यांची वर्तमानपत्रांमधून ओरड झाली तर बायकांना सोजिरांकडून होणारा त्रास बराच कमी होईल.

पण मुद्याची गोष्ट आहे ती ही कीं स्त्रियांनां निर्भय कसें होतां येईल. जी स्वतः निर्भय आहे व आपलें पावित्र्य हीच आपल्या पातिव्रत्याची ढाल आहे अशी जिची दृढ श्रद्धा आहे, तिचें पातिव्रत्य सुरक्षित राहूं शकतें, याची मला खात्री वाटते. अशा स्त्रीच्या तेजानेंच तो पशु दिपूनच जाऊं शकेल. ज्यांनीं अशा प्रकारें आपल्या पातिव्रत्याचें संरक्षण केलें अशा स्त्रियांचीं उदाहरणें आधुनिक काळांत देखील आढळून येतात. अशा दोन स्त्रिया तर माझ्या डोळ्यापुढें आहेत. अशा प्रकारची हिंमत हा लेख वाचणाऱ्या माझ्या भगिनींनीं जर आपल्या आंगीं आणली तर त्या कायमच्या भयमुक्त होतील, स्त्रीसुलभ भीति त्यांच्या अंतःकरणांतून निघून जाऊं शकेल. कसोटीला उतरण्यासाठीं त्यांना कटु अनुभव घेण्याची इच्छा करण्याची देखील गरज नाहीं. सारेच सोजिर इतके निर्लज्ज नसतात. भित्र्या स्त्रीला एखादाच प्रसंग पुरेसा होतो. सारेच साप कांहीं विषारी नसतात. विषारी सापांतून

देखील एखादाच चावतो. सापावर पाय पडल्याखेरीज तो चावत नाहीं. पण भित्रा माणूस साप पाहिला कीं चळचळा कांपूं लागतो. यासाठींच प्रत्येक स्त्रीनें निर्भय होण्याचें शिक्षण घ्यावें. तें शिक्षण तिला तिच्या आई-बापानें किंवा पतीनें दिलें पाहिजे. ईश्वराविषयीं तिच्या मनांत निष्ठा उत्पन्न केल्यानें देखील हें शिक्षण सहज मिळूं शकतें. ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन होत नसलें तरी तो सर्वांचें न चुकतां संरक्षण करतो ही भावना तिच्या मनांत बिंबली कीं मग ती निर्भय बनलीच. पण अशा प्रकारचें निर्भयतेचें शिक्षण एका दिवसांत मिळत नाहीं.

ज्या स्त्रीवर अशा प्रकारचें आक्रमण होईल, तिनें हिंसाहिंसेचा विचार करतां कामा नये. अशा वेळीं आत्मसंरक्षण हाच तिचा परमधर्म होय. तिनें प्रसंगीं सुचेल त्या साधनानें आपल्या देहाचें पावित्र्य रक्षण करावें. ईश्वरानें दिलेलीं नखें, दांत, शक्ति यांचा तिनें उपयोग करीत मरून जावें. मरणाचें भय सोडलेल्या प्रत्येक स्त्री–पुरुषानें स्वतः मरणाला कवटाळून आपलें व स्वकीयांचें संरक्षण करावें.

खरी गोष्ट अशी आहे कीं आपणच मरणें आवडत नसल्यामुळें शेवटीं वश होतों. कोणी मरणाच्या ऐवजीं रामराम करणें पत्करतो, कोणी पैसा देतो, कोणी पोटावर सरपटायला तयार होतो. त्याचप्रमाणें स्त्री देखील केवळ नाइलाजानें पशूला वश होते. जबरीच्या रामारामापासून पातिव्रत्य भंगापर्यंतचीं सारीं कृत्यें एकाच वस्तूचीं सूचक आहेत. जगण्याच्या मोहानें माणसाला हें सगळें करावें लागतें. म्हणूनच जगण्याचा मोह सोडून जो जगतो तोच खऱ्या अर्थानें जगतो.

हा झाला स्त्रीचा धर्म. पण तेथें हजर असणाऱ्या पुरुषांचा धर्म कोणता? त्याचें उत्तर तसें म्हटलें तर वर आलेलें आहेच. त्यानें पोलिसांना बोलावण्यांत किंवा धोक्याची सांखळी ओढण्यांतच कृतकृत्यता मानूं नये. त्यानें प्रेक्षकाऐवजीं रक्षकाची भूमिका घेतली पाहिजे. अहिंसा अवगत असेल तर त्यानें त्या स्त्रीला संकटमुक्त करण्यासाठीं मरून जावें. पण जर त्याला अहिंसा अवगत नसेल तर हिंसा करून देखील त्यानें तिचें रक्षण करावें. हिंसेंत व अहिंसेंत मुख्य मुद्याची गोष्ट मरणें हीच आहे. माझ्यासारखा

दंतहीन, दुबळा म्हातारा–"मी काय करूं शकणार, मला फक्त अहिंसा ठाऊक आहे" असें म्हणून पळवाट काढूं पाहील, पण त्याच क्षणीं त्याचें महात्मेपण पार नष्ट झालें म्हणून समजा. अशा प्रसंगीं तो जर मध्यें पडून प्राणास मुकला तर निदान त्या सतीच्या शीलभंगाचा तो साक्षीदार तरी होऊं शकणार नाहीं. असें झालें तर कोणताहि हिंदुस्थानमधला पुरुष कोणत्याहि स्त्रीच्या सतीत्वाचा भंग सहन करूं शकत नाहीं, अशी सर्वत्र समजूत पसरेल आणि मग पशुवृत्तीचे सैनिक देखील हिंदुस्थानांतील स्त्रीवर हात टाकायला धजावणार नाहींत.

आज आपल्याबद्दल अशी समजूत नाहीं, ही शरमेची गोष्ट होय. यासाठीं दुसऱ्यावर विश्वासून चालणार नाहीं. आत्मबळ व ईश्वरीबळ याच्याशिवाय आपल्याजवळ दुसरें कांहींहि नाहीं. जे आपलें बळ दुसऱ्यावर सत्ता गाजवण्यासाठीं उपयोगीं आणतात त्यांना ईश्वरीबळाचा पाठिंबा मिळत नाहीं. उलट त्यांच्या बळाचा मात्र क्षय होतो. पण आत्मबळाचें हवन ईश्वरीबळांत करणारे मात्र अजिंक्य ठरतात.

वर्ध्याच्या वाटेवर, १९–२–४२

: ३६ :

# शांततावादाची अग्निपरीक्षा

डॉ. मॉड रायडन या एक खिस्ती उपदेशिका असून त्या शांततावादी जनांतल्या प्रमुखांपैकीं एक आहेत. संत टेलिकस प्रमाणें दोन्हीं युद्धमान पक्षांच्या मध्यें पडून आपल्या प्राणाचें हवन करण्याची तयारी दाखविली कीं युद्धें बंद होऊं शकतात असा त्यांचा विश्वास होता. संत टेलिकस हा एक ख्रिस्ती साधु रोमन काळांत होऊन गेला. रोमन लोक पकडून आण-

लेल्या कैद्यांना तीक्ष्ण शस्त्रें देऊन त्यांना आपल्या रंगशाळेंत द्वंद्वयुद्ध करायला लावीत आणि आपली करमणूक करून घेत. एकदां रोमच्या रंग-शाळेंत अशा एका द्वंद्वयुद्धाची गंमत पाहाण्यासाठीं प्रेक्षकगण जमलेला होता. आतां युद्धाला सुरुवात होणार तोंच संत टेलिकस रंगशाळेच्या मध्य भागीं येऊन थडकला. आयत्या वेळीं हें आपल्या करमणुकींत विघ्न आलें म्हणून लोक मनस्वी संतापले. त्यांनीं संत टेलिकसला न जुमानतां द्वंद्वाला सुरुवात करण्याचा हुकूम दिला. संत टेलिकसच्या देहाचे तुकडे झाले पण परिणाम मात्र असा झाला कीं सरकारी हुकमानें हीं द्वंद्वयुद्धें कायमचीं बंद झालीं. १९३१ मध्यें जपाननें चीनच्या मँचुको प्रदेशावर स्वारी केली. डॉ. रायडन आणि त्यांच्या सहकाऱ्यांना त्यावेळीं अशी आशा वाटली कीं आपणहि अशीच प्राणाहुति द्यायला तयार झालों तर चीन जपानमधलेंच काय पण जगांतलीं सगळींच युद्धें बंद होऊं शकतील. परंतु त्यांच्या शांतिदलांत केवळ एक हजारच स्वयंसेवकांनीं जेमतेम नांवें दिलीं. त्यामुळें हिरमोड होऊन त्यांचा सत्याग्रहानें युद्ध बंद पडूं शकतें या सिद्धांतावरला विश्वास डळमळींत झाला आणि या युद्धाच्या प्रारंभीं तर त्यांनीं तो सोडूनहि दिला. या बाईनीं डिसेंबर महिन्याच्या "सर्व्हे ग्रफिक" या अमेरिकन मासिकांत एक अत्यंत हृदयस्पर्शी व करुणेनें ओथंबलेला लेख लिहिला. लेखाच्या अंतीं त्या लिहितात—

"मी अजून देखील एका अर्थानें शांततावादीच आहें. ख्रिस्ती लोकांना आध्यात्मिक बळावर भौतिक शक्तीशीं सामना करतां आला पाहिजे, अशी माझी श्रद्धा आहे. कांहीं व्यक्तिगत उदाहरणें सोडलीं तर या एकोणवीस शतकांच्या दीर्घ काळांत देखील हें तत्त्व आपल्याला सिद्ध करतां आलें नाहीं. पण आतां मला असें वाटतें कीं जें बळ आपल्या आंगीं नाहीं व जें मिळविण्यासाठीं करावी लागणारी संयमाची साधना आपण न करतांच तें आपल्या आंगी आहे असें मानून वागूं लागलों तर केवळ मनचे मांडे खाल्ल्याप्रमाणेंच होईल. आयत्या वेळीं साधना केल्याशिवाय हें बळ उत्पन्न होईल हेंहि अशक्य आहे. तें बळ प्राप्त झालें नाहीं म्हणून निष्क्रीयपणानें स्वस्थ बसण्यापेक्षां, मला योग्य वाटणाऱ्या मानव—जातीला भावी कल्याण-

कारक तत्त्वाचें संरक्षण करण्याला आपल्या मगदूराप्रमाणें प्रयत्न करणेंच मला योग्य वाटतें. जेव्हां माझे शांततावादी मित्र विचारतात कीं, "येशू ख्रिस्त बांब टाकीत आहे किंवा बंदुक चालवीत आहे अशी कल्पना तुम्हीं करूं शकतां का ?" तेव्हां मी त्यांना असें सांगू शकत्यें कीं, "तशी कल्पना मी करीत नसलें तरी, येशू ख्रिस्त केवळ एका बाजूला गंमत बघत उभा राहतो, अशीहि कल्पना मला करतां येत नाहीं."

माझ्या एका निकटवर्ती आप्ताचा जगांतल्या कोणत्याही शांततावाद्याला साजेसा युद्धाचा तिटकारा वाढत होता. गेल्या महायुद्धांत तो धारातीर्थी पडला. त्यानें त्या युद्धाच्या प्रारंभीं जे उद्गार काढले ते मला पुन्हां सांगितल्याशिवाय रहावत नाहीं.–आध्यात्मिक बळानें युद्धें थांबवितां आलीं तर तसें जरूर करा; पण तुमच्यानें तें होत नसेल तर मात्र मला शक्य असलेली गोष्ट मला करूं द्या. युद्धांत भाग घेणारा नरक पावतो हें तुमचें मत जर खरें असेल तर मी नरकदेखील पत्करीन. कारण हें युद्ध इतकें गर्हणीय आहे कीं त्याला आळा घालतांना माझे प्राण गमावले तरी चालतील. चाललेले प्रकार उघड्या डोळ्यांनीं बघवत नाहींत."

आपले प्राण गमावूं शकणाराच त्याचें खरें रक्षण करूं शकतो, या ख्रिस्त प्रभूच्या वचनांत आणि या माझ्या मित्राच्या म्हणण्यांत विलक्षण साम्य नाहीं काय ?"

इतर बऱ्याचशा लोकांप्रमाणें डॉ. मॉड रायडन यांना आपले सिद्धांत बदलावे लागले व नाइलाजानें कां होईना पण ब्रिटिश बेटांचें संरक्षण करणाऱ्यांच्या पक्षांत त्या पूर्णपणें सामील झाल्या. त्यांच्या या लेखाला सर्व बाजूंनीं विचार करून उत्तर देणें आवश्यक आहे. पाश्चात्य शांतता-वाद्यांशीं माझा नेहमींच संबंध येतो. या लेखांत लेखिकेनें जे विचार मांडले त्यावरून दिसून येतें कीं तिचा तोल गेलेला आहे. थोडीशींच माणसें अगदीं अल्प प्रमाणांत देखील ख्रिस्ताची शिकवण आपल्या जीवनांत पूर्णपणें अंमलांत आणूं शकलीं, तर अभ्यासानें अनेक माणसांना मोठ्या प्रमाणावरहि तें शक्य होऊं शकेल, असा निष्कर्ष सहजच निघतो. आपल्या आंगीं सामर्थ्य नसून देखील तें आहे अशी कल्पना करून वागणें

खरोखरच मूर्खपणाचें ठरेल. या विद्वान लेखिकेनें म्हटल्याप्रमाणें योग्य साधना आयत्या वेळीं आधीं प्रयत्न केल्याशिवाय उत्पन्न होऊं शकणार नाहींत, हेंहि तितकेंच खरें आहे. पण दोष लक्षांत आला कीं तो काढून टाकण्याचा प्रयत्न करणें म्हणजेच योग्य वेळीं योग्य गोष्ट करणें होय. पण तसें न करतां विरुद्धच आचरणानें आपल्याच तत्त्वाला हरताळ फांसणें ही अत्यंत वाईट गोष्ट होय.

दुसरें असें कीं निष्क्रीयतेचें धोरण नेहमींच टाकाऊ असतें, असें म्हणतां येणार नाहीं. उलट जखमांची चिकित्सा करतांना कधीं कधीं त्या जंतुहीन ठेवण्यासाठींच कोणतीहि औषधयोजना करण्याचें टाळून स्वस्थ बसावें लागतें. अशा स्थितीनें निराशा वाटण्याचें मुळीं देखील कारण नसतें. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं तर नाहींच नाहीं. ब्रिटिश शांतिवाद्यांनीं बाजूला हटून आपल्या जीवनांत बदल कां करूं नये? त्यांना शांततेची पूर्ण स्थापना करतां येणार नाहीं पण ते तिचा भरभक्कम पाया तरी घालूं शकतील. अशा रितीनें ते आपली श्रद्धा तावून सुलाखून काढूं शकतात. ज्यावेळीं आपल्या डोळ्यांपुढें भीषण प्रकार घडत असतात त्याचवेळीं आपली श्रद्धा तशीच अविचल ठेवणारे लोक विरळाच होत. परंतु, त्यांना जरी जगाच्या घटनाप्रवाहावर दृश्य परिणाम करतां येणें शक्य झालें नाहीं तरी पण जीवनावर आपल्या तत्त्वाची छाप बसवण्याचा प्रयत्न करीत राहणें हें त्यांचे कर्तव्य होय. आपल्या आचरणाचा जगावर दृश्य परिणाम झाल्या-वांचून रहायचा नाहीं अशी दृढ श्रद्धा त्यांच्या अंतःकरणांत असली कीं मग त्या अढळ श्रद्धेच्या चुंबकानें संशयात्मे देखील ओढले जातीलच जातील.

दुसरें असें कीं मॉड रायडन यांच्यासारख्या व्यक्ति म्हणजे कांहीं निव्वळ अनुयायी नव्हत, त्यांची गणना पुढाऱ्यांत होते. ख्रिस्तांनीं आपल्या टेकडी-वरील प्रवचनांत जी शिकवण दिली तिच्या बरहुकूम वागणें हें त्यांना आवश्यक आहे. त्या तशा वागूं लागल्या म्हणजे आपल्या जीवनांतील अनेक गोष्टी त्याज्य असून त्यांत मूलतः सुधारणा करायला वाव आहे, हें त्यांच्या लक्षांत येईल. साम्राज्यशाहीपासून मिळणारे फायदे नाकारणें, हा सर्वांत मोठा त्याग होय, तो त्यांनीं आधीं करावा. लंडनवासीयांची सध्याची

गुंतागुंतीची राहणी व ऐषआरामाचें जीवन आशिया, आफ्रिका व जगांतील इतर अंकित प्रदेशांतून आणलेल्या संपत्तीवर आधारलेलें आहे.

मी प्रत्येक ब्रिटनला उद्देशून लिहिलेल्या निवेदनावर बरीचशी कठोर टीका झाली असली तरी मीं आजहिं त्या निवेदनाला चिटकून आहें; आणि अत्यंत सुसंघटित व भयानक हिंसेचा प्रतिकार करतांना पुढील पिढ्या मी सुचवलेल्या मार्गांचाच अवलंब करतील अशी मला खात्री वाटते. आज दाराशीं शत्रू येऊन ठेपला असतांना देखील माझ्या देशबांधवांना मी त्याच मार्गानें जाण्याचा उपदेश करीत आहें. मग ते माझें ऐकोत वा न ऐकोत, त्याचें मला कांहींहि वाटायचें नाहीं. त्यांनीं अहिंसेचा मार्ग स्विकारला नाहीं म्हणून तो अयशस्वी आहे. असें मानण्याचें कारण नाहीं. मीं अपूर्ण आहें हा आरोप मी मान्य करितों.-हा आरोप मी मान्य करतों. माझ्या अपूर्णतेचें समर्थन करून देखील मला हें सांगायचें आहे कीं सत्याग्रही आपल्या पर्वतासारख्या अचल श्रद्धेला चिकटून असला, तर मग तो आपल्या प्रयोगांत भाग घ्यायला इतरांना पाचारण करतांना पूर्णत्वाची वाट बघत नाहीं.

डॉ. मॉड रायडन यांनीं आपल्या नातलगाच्या उद्गारांचा उल्लेख केला आहे खरा. पण त्या उद्गारांचें समर्थन मात्र चुकीचें आहे. युद्ध हें जर नरकाचें साधन असेल तर मग आत्मसंरक्षणासाठीं कां होईना पण युद्धांत भाग घेऊन व त्यासाठीं आपले प्राण खर्ची घालून युद्धाला आळा कसा घालतां येईल. कारण शत्रू ज्या गर्हणीय गोष्टी करतो, त्या बचाव करणारालाहि कराव्या लागणारच; किंहुबना त्या अधिक जोमानें कराव्या लागतील. अशा वेळीं जीव देणें सार्थकीं न लागतां उलट फुकट दवडणें होय.

मी डॉ. रायडन यांच्या स्वतःच्या चर्चमधल्या प्रवचनांना हजर रहालें आहें. त्या जागीं प्रार्थनेंतल्या सामर्थ्याविषयीं जिवंत श्रद्धा होती. आतां त्यांच्या अंतःकरणांत गडद अंधःकार पसरला असेल, तर त्यावेळीं अंतःकरणापासून केलेल्या प्रार्थनेमधून सामर्थ्य आणि सत्कार्याची प्रेरणा कां लाभूं नये ? संत पिटरप्रमाणें त्यांनी आपल्या क्षणिक श्रद्धाभंगाबद्दल पश्चात्ताप व्यक्त करावा व अहिंसेच्या मार्गावर नव्या जोमानें चालूं लागावें.

—सेवाग्राम—८-३-४२

: ३७ :

## आत्मसंरक्षणाचा हक्क

शांतिदलाच्या सभासदाचा त्यानें अहिंसेचें ब्रीद स्वीकारल्यामुळें आत्मसंरक्षणासाठीं हिंसा करण्याचा हक्क नाहींसा होतो काय? तसें त्याला करण्यास प्रत्यवाय आहे काय?

वैयक्तिक व सामुदायिक हिंसेमधील फरक लक्षांत आलेला नसल्यामुळें, आणि अहिंसक प्रतिकाराच्या तंत्राच्या प्रगतीच्या व विकासाच्या संबंधीं व्यक्ति या नात्यानें आपली भूमिका निश्चित कोणती याची कल्पना नसल्यामुळें आपणाला असा प्रश्न सुचणें साहजिक आहे.

आतां पहिला मुद्दा घेऊं. मानवी चारित्र्यांत अनेक उणीवा आहेत. जाणूनबुजून किंवा क्षणिक आवेशांत केलेल्या वैयक्तिक हिंसेचीं उदाहरणें नेहमींच घडूं शकतात. त्यामुळें अशा वेळीं आत्मसंरक्षणासाठीं निश्चित अशा अहिंसक मार्गाचा शोध लागला नाहीं तोपर्यंत तेजस्वी माणूस प्रतिकारासाठीं प्रतिहिंसेचा अंगीकार करीलच. संपूर्ण अहिंचें पालन करण्याची ज्यानीं प्रतिज्ञा केलेली आहे अशामध्यें देखील असे प्रकार घडण्याचा संभव आहे. आईबाप व मुलें, पतिपत्नी, आणि सख्खेभाऊ देखील एकमेकांना कधीं कधीं शिव्याशाप देतील, मारतील, कदाचित खूनापर्यंत देखील मजल जाईल.

जसे आज मोटारींचे अपघात घडतात, त्याचप्रकारें अहिंसाप्रधान समाजांत देखील शांतिपरायण नागरिकांकडून असें वर्तन होण्याचा कधीं कधीं संभव राहील. भांडणाचें कारण कनक, कांता किंवा सामान्य सुखसोयींच्या बाबतींतला आप्पलपोटेपणा यापैकींच एखादें राहणार. याप्रसंगीं केव्हां केव्हां पुष्कळ व्यक्ती पूर्व योजनेनें किंवा योगायोगानें एकत्र येऊन असे

प्रतिकार करतील. पूर्व योजनेप्रमाणें मुद्दाम घडवून जर तसें ते करतील तर मग ती संघटित हिंसा होय. मग तिचा आत्मसंरक्षणाच्या कायदेशीर हक्कांत समावेश होणार नाहीं. ज्या देशांत प्रत्येक इसमाला लष्करी शिक्षण देण्यांत येतें व हत्यारें देण्यांत येतात, तेथेंहि फक्त सरकारी नियंत्रणाखालींच. लोकांना संघटित होतां येतें. त्यांना स्वतंत्रपणें आपलें संघटन करतां येत नाहीं.

याप्रमाणें व्यक्तिगत हिंसा आकस्मिक आणि म्हणूनच असंघटित सामुदायिक हिंसा–जशी लोकांच्या एखाद्या जमावानें केलेली हिंसा, व सरावलेल्या गुंडांची, दरोडेखोरांची, स्वयंसेवकांची, पोलिसांची, लष्करी शिपायांची संघटित सामुदायिक हिंसा; दोन्ही हिंसांत हा असा फरक आहे.

मी सुचवलेल्या शांतिदलाच्या संघटनेंत व्यक्तीच्या आत्मसंरक्षणाच्या हक्काचा व हिंसेचा प्रश्नच उद्भवूं शकत नाहीं. समाजविरोधी व्यक्ति किंवा गट यांच्या हिंसेपासून नागरिकांचे सामुदायिक संघटित संरक्षण करण्या-साठीं काय करावें हा त्यांच्या पुढें प्रश्न असतो व त्यासंबंधी असा स्पष्ट दंडक आहे कीं हिंसेचा प्रतिकार शांतिदलानें संघटित प्रतिहिंसेनें करतां कामा नये.

येथें वैयक्तिक आत्मसंरक्षणाच्या हक्काला मुळींच बाध आणलेला नाहीं. पण याचा अर्थ व्यक्तीनें वाटल्यास आपल्या हक्काचा त्याग करूं नये असाहि होत नाहीं. शांतिदल ही एक नव्याच प्रकारची संस्था आहे. हिंसेच्या विरुद्ध मार्गाचें अवलंबन करून तिचा प्रतिकार करण्यासाठीं एका अभिनव पद्धतीचा विकास करणें, हा त्या संस्थेचा उद्देश आहे. दलाचे सभासद दोन प्रकारचे असतील. सामान्य अहिंसक नागरिक सेनेचे सभासद, आणि खास अहिंसक तुकडीचे सभासद. अहिंसक तुकडीचे सभासद आत्मसंरक्षणासाठीं प्रतिहिंसा करणार नाहींत. नाहीं तर या नवीन तंत्राच्या विकासाला व्यत्यय यायचा. एखादा इंजिनियर आपल्या कार-खान्यांत जर घर्षणाच्या प्रश्नाचा प्रयोग करीत असेल तर तो आपल्या खासगी प्रयोगशाळेंत देखील त्याच्याकडे दुर्लक्ष्य करूं शकणार नाहीं. शांतिदलाच्या प्रत्येक सभासदाला देखील तसेंच वागावें लागेल. हिंसेनें वरकरणी यश मिळवण्यापेक्षां तो अहिंसेच्या प्रयोगांत अपयशाची जोखीम

पत्करील. शांति संघटनेंत आपण कोणती भूमिका स्विकारावी हें ज्याचें त्यानेंच ठरविलें पाहिजे.

ज्या पथकानें अहिंसेची शपथ घेतलेली असेल, अशा पथकानें अहिंसा-निष्ठ व्यक्तीला मार्गदर्शन करण्यास सांगितलें तर त्या व्यक्तीनें तशा प्रकारच्या पथकाला मदत करावी किंवा करूं नये, या प्रश्नाचें उत्तर देखील वरील मुद्यांत येऊन गेलें आहे. अशा प्रकारची मदत करण्यांत आपला मूळ हेतूच स्वतःचा प्राण देण्याची जोखीम स्विकारण्याचा असतो, हें उघडच आहे.

सेवाग्राम, २२-३-४२

: ३८ :

# खरें असल्यास अमानुष

मारवाडी रिलीफ सोसायटीचे समाजसेवा खात्याचे माननीय चिटणीस असें लिहितात—

“ब्रम्हदेश व मलायांतून आलेल्या आश्रयार्थींची कलकत्त्याच्या मारवाडी रिलीफ सोसायटीनें जी जाति धर्म वर्ण निरपेक्ष सेवा केली तिची थोडीशी माहिती मला आपल्याला सांगायची आहे व एका अत्यंत गंभीर बाबतींत आपला अमूल्य सल्ला घ्यायचा आहे. कलकत्त्याला जे हजारों आश्रयार्थी रेल्वे, समुद्र किंवा सडकेच्या मार्गानें आले, त्यांच्या भोजनाची, औषध-पाण्याची व योग्य स्थानीं त्यांना पाठवून देण्याची सोय रिलीफ सोसायटीनें केली. पुष्कळशा बायकांच्या बाळंतपणाची तांतडीनें व्यवस्था करावी लागली. स्थानिक व्यापारी पेढ्यांच्या सहकार्यानें बेकार आश्रयार्थी व्यक्तींना कामें देखील पुरविण्याची व्यवस्था होत आहे.

मला या बाबतींत एक अत्यंत दुःखद अनुभव आला, तो मी आपणाला सादर करीत आहे. या परिस्थितींत माझें कर्तव्य कोणतें हें आपण कृपा करून सुचवाल तर आभारी होईन.

१४ मार्चच्या रात्रीची गोष्ट. चितगांव मेल नुकतीच आली होती. मी माझ्या स्वयंसेवकासह आलेल्या लोकांच्या गरजांची चौकशी करीत होतों. इतक्यांत एका ब्रिटिश टॉमीनें एका आश्रयार्थी गरीबाचें लहान मूल उचललें व गाडीखालीं फेकून दिलें. आपल्या थोर अहिंसेचा मी नम्र अनुयायी आहे. पण त्या टॉमीला असल्या पाशवी कृत्याबद्दल चांगला चोप देण्याचा मोह आंवरला व माझ्या स्वयंसेवकांना हिंसेपासून परावृत्त करणें मला मोठेंच जड गेलें. स्टेशनवरील लष्करी अधिकाऱ्यांच्या कानावर मी ही हकीगत घातली पण त्यांच्या वृत्तींत सहानुभूति नव्हती. त्यानंतर मी आय्. सी. एस्. श्री. के. सी. सेन यांना भेटलों व त्यांनीं या कृत्याची चौकशी करण्याचें अभिवचन दिलें. पण या कृत्याचें परिमार्जन करण्याचा कांहींहि प्रयत्न झालेला नाहीं. अजूनहि दररोज पुष्कळसे सोजिर स्टेशनच्या प्लॅटफार्मावर भटकत असतात, व त्यांच्यात आणि लोकांत बाचाबाची होण्याचा संभव असतो. या बाबतींत ताबडतोब कांहीं तरी व्यवस्था होणें आवश्यक आहे. बंगाल नागरिक संरक्षक समिती पुढें मी हा प्रश्न घसाला लावलेला आहे.

मला आपला सल्ला पुढील मुद्यावर मिळाल्यास मी फार आभारी होईन—

( १ ) या बाबतींत मी वर्तमानपत्रांतून चळवळ करावी काय ?

( २ ) एखाद्या निराश्रित स्त्रीचा विनयभंग सोजिरानें केल्यास तो आम्हीं स्वस्थपणें पहावा काय ? कीं ताबडतोब त्याचा समाचार घ्यावा ?

या बाबतींत आपण हरिजनमध्यें एखादें पत्रक काढल्यास ठीक होईल. वर लिहिलेल्या प्रकारांच्या खरेपणाची जबाबदारी मी माझ्या माथीं घ्यायला तयार आहें. ”

सोजिरांच्या गैरवर्तणुकीविषयीं अधिकृत खरी माहिती देणारीं पत्रें माझ्याकडे अनेक आलीं पण तीं मी छापलीं नाहींत. ज्यावेळीं अशीं पत्रें न छापणें भित्रेपणाचें ठरलें असतें त्याच वेळीं मी तीं छापलीं. माझ्या मतें वर दिलेल्या पत्राला खूप प्रसिद्धी दिली पाहिजे. केवळ लोकांच्या दृष्टीनेंच नव्हे, तर सरकार व सोजीर यांच्या दृष्टीनें देखील तसें करणें जरूर आहे. वर उल्लेखिलेला सोजिर पिसाळल्यासारखा वागला याचें कारण तो दारूच्या धुंदीत असावा. मला आशा आहे कीं मारवाडी सोसायटी या गोष्टीची अखेरपर्यंत छडा लावल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें अधिकारी वर्गदेखील ती दडपून टाकण्याचा प्रयत्न न करतां, लिहिलेली गोष्ट खरी ठरल्यास, तिचें निराकरण करून भरपूर नुकसान भरपाई करून देईल.

हें झालें पत्रांतल्या प्रकाराबद्दल, पण अशा प्रसंगीं पुढें कसें वागावें, याबद्दल पत्रलेखक माझा सल्ला मागतो. अशा प्रसंगीं हिंसावादी किंवा अहिंसावादी व्यक्तीचें वर्तन सारखेंच राहिलें असतें. स्वयंसेवकांनीं, जर त्यांना तें शक्य असतें तर, सोजिराला मुळीं मुलाला स्पर्शच करूं द्यायचा नव्हता, किंवा त्यानें मुलाला उचलल्यावर तें त्याच्यापासून हिरावून घ्यायला हवें होतें. त्याला वांचवतांना जर सोजिराला इजा झाली असती तर त्याची पर्वा करायला नको होती. मुलाला वांचविल्यानंतर किंवा वांचविण्याचा प्रयत्न विफल झाल्यानंतर होणारी वागणूक मात्र हिंसाप्रेरित आहे कीं अहिंसा प्रेरित आहे याचा फरक पहाण्यात येईल. अहिंसावादी अपराध्याशीं सौम्यपणानें व औदार्यानें वागेल. पण तें औदार्य व सौम्यपणा देखील विचारयुक्त व समंजस राहील. अशाप्रसंगीं वागण्याचे नियम आगाऊ घालून देणें कठीण जाईल. मी येवढें मात्र सांगू शकेन कीं अपराधी व्यक्तीच्या अंतःकरणाचा ठाव घेणारेंच औदार्य खरें औदार्य म्हणतां येईल. दक्षिण आफ्रिकेंत मी अशीं पुष्कळ उदाहरणें पाहिलीं आहेत. आफ्रिकन लोकांचा गोऱ्या लोकांनीं अपमान करावा आणि त्यांनीं गोऱ्यांना म्हणावें, "प्रिय बंधु, देव तुझ्या उद्धटपणाबद्दल क्षमा करो." असें झालें म्हणजे गोरे लोक उपहासानें हंसत व फिरून त्यांचा अपमान करीत.

अशा प्रकारचा अपमान मी देखील बराच वेळ सहन केला. आफ्रिकन लोकांचें तें वागणें औपचारिक होतें; त्यांत उदारपणा नव्हता म्हणूनच ते उपहासाला पात्र होत. माझें वागणें मित्रेपणाचें होतें, कारण मला दुसऱ्यांदा अपमान करून घेण्याची इच्छा नव्हती. मात्र माझ्या मनांत त्यांच्यावर खटला भरण्याचेंहि आलें नाहीं. मी त्यावेळीं आपलें अहिंसक चारित्र्य घडवीत होतों. त्यावेळीं खरेंखुरें धैर्य माझ्या अंगीं असतें तर मी त्या अपमान करणारांची चांगली कान उघाडणी केली असती व त्याचा बरा-वाईट परिणाम सहन केला असता.

अहिंसक मनुष्यानें व्यक्तिगत अपमानाच्या आणि इजेच्या वेळीं काय करावें हें मी सांगितलेंच पण ज्या मुलाला इजा झाली किंवा पत्रलेखकानें ज्या इजेबद्दल विचारलें त्याचें काय ? माझ्या मतें अहिंसक वर्तन हें नेहमींच सारखें राहील, निदान तें असावें. स्वतःला झालेली इजा व आपल्या संरक्षणाखालीं असलेल्यांना झालेली इजा यांत फरक करणें असमर्थनीय आहे, अयोग्य आहे. तो स्वतःसाठीं जें करूं शकेल त्यापेक्षां अधिक त्यानें आपल्या रक्षणार्थी लोकांसाठीं करावें अशी अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. आपल्या संरक्षणाखालीं असलेल्यासाठीं तो प्राणहि देईल हें मात्र खरें. पण त्याचप्रमाणें त्यानें स्वतःच्या अब्रूसाठीं देखील करावें अशी अपेक्षा राहील. जो आपली अब्रू सांभाळीत नाहीं तो आपल्या आश्रयास आलेल्यांची कशी सांभाळणार ? केवळ तर्काच्या जोरावर अहिंसक वर्तनाच्या मर्यादा ठरवतां येणार नाहींत, हें मला मान्य आहे, पण त्या ठरवतांना मात्र तर्क ही आधींची आवश्यक पायरी आहे. खरें अहिंसक वर्तन मात्र वारंवारच्या अभ्यासानें व वारंवारच्या अपयशानें साध्य होऊं शकेल. अहिंसक वर्तन कसें असावें हें तपासण्याची मुळीं गरजच नाहीं.

सेवाग्राम २२-३-४२

: ३९ :

## आत्महत्त्येविषयीं

**प्रश्न**—अमानुष छळ व हाल सहन करण्यापेक्षां ज्याला मरण बरें वाटतें त्याला मरणाचा मार्ग सांपडेल, या वचनाचें कृपया अधिक स्पष्टीकरण करावें. आपण आत्महत्त्येचें समर्थन करतां काय ?

**उत्तर**—अशा प्रसंगीं छळांतून सुटण्याचा एक उपाय म्हणून मी आत्महत्त्या निषिद्ध मानणार नाहीं. पण आत्महत्त्या हा मृत्यूचा प्रशस्त मार्ग होय असें मीं मानीत नाहीं. मृत्यूचा सर्वांत प्रशस्त मार्ग म्हणजे तीव्र इच्छामात्रें करून मरण येणें होय. पण असलें मरण अब्जावधि लोकांपैकीं एकाद्याच्याच नशिबीं असेल. समजा अ ला ब ने पोटावर सरपटायला लावण्याची बळजबरी केली, अशा वेळीं प्राणांतिक प्रतिकार करणें शक्य आहे अशा रीतीनें मरेपर्यंत केलेला कोणताहि प्रतिकार मी प्रशस्त मानतों. अशा प्रकारचा प्रतिकार सशक्ताप्रमाणेंच अशक्तांना देखील करतां येणें शक्य आहे, किंबहुना अशक्तालाच तो अधिक त्वरेनें करतां येईल. यासाठीं खंबीर हृदय व दृढ इच्छाबळ मात्र अपरिहार्य आहे. मी नुसतें कोरडें ब्रम्हज्ञान सांगत नाहीं. माझें हें मत माझा स्वतःचा व माझ्या देखरेखीखालीं राहिलेल्या इतर व्यक्तींच्या अनुभवांवर आधारलेलें आहे. एका अशक्त बाईला देखील तिच्या नवऱ्याची निष्ठूर इच्छाशक्ति वांकवूं शकली नाहीं. किरकोळ शरीरांच्या मुलांनीं कठोर शिक्षकांचे व पाषाण हृदयी आईबापांचे हुकूम धाब्यावर बसवलेले आहेत. मरण्याची तयारीच नव्हे तर इच्छा असावी लागते, तशी असल्यास तीच हमखास आपला मार्ग धुंडाळील.

—सेवाग्राम—१०-७-४२

अशा प्रकारचा अपमान मी देखील बराच वेळ सहन केला. आफ्रिकन लोकांचे तें वागणें औपचारिक होतें; त्यांत उदारपणा नव्हता म्हणूनच ते उपहासाला पात्र होत. माझें वागणें मित्रेपणाचें होतें, कारण मला दुसऱ्यांदा अपमान करून घेण्याची इच्छा नव्हती. मात्र माझ्या मनांत त्यांच्यावर खटला भरण्याचेंहि आलें नाहीं. मी त्यावेळीं आपलें अहिंसक चारित्र्य घडवीत होतों. त्यावेळीं खरेंखुरें धैर्य माझ्या आंगीं असतें तर मी त्या अपमान करणारांची चांगली कान उघाडणी केली असती व त्याचा बरा-वाईट परिणाम सहन केला असता.

अहिंसक मनुष्यानें व्यक्तिगत अपमानाच्या आणि इजेच्या वेळीं काय करावें हें मी सांगितलेंच पण ज्या मुलाला इजा झाली किंवा पत्रलेखकानें ज्या इजेबद्दल विचारलें त्याचें काय ? माझ्या मतें अहिंसक वर्तन हें नेहमींच सारखें राहील, निदान तें असावें. स्वतःला झालेली इजा व आपल्या संरक्षणाखालीं असलेल्यांना झालेली इजा यांत फरक करणें असमर्थ-नीय आहे, अयोग्य आहे. तो स्वतःसाठीं जें करूं शकेल त्यापेक्षां अधिक त्यानें आपल्या रक्षणार्थी लोकांसाठीं करावें अशी अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. आपल्या संरक्षणाखालीं असलेल्यासाठीं तो प्राणहि देईल हें मात्र खरें. पण त्याचप्रमाणें त्यानें स्वतःच्या अब्रूसाठीं देखील करावें अशी अपेक्षा राहील. जो आपली अब्रू सांभाळीत नाहीं तो आपल्या आश्रयास आले-ल्यांची कशी सांभाळणार ? केवळ तर्काच्या जोरावर अहिंसक वर्तनाच्या मर्यादा ठरवतां येणार नाहींत, हें मला मान्य आहे, पण त्या ठरवतांना मात्र तर्क ही आधींची आवश्यक पायरी आहे. खरें अहिंसक वर्तन मात्र वारंवारच्या अभ्यासानें व वारंवारच्या अपयशानें साध्य होऊं शकेल. अहिंसक वर्तन कसें असावें हें तपासण्याची मुळीं गरजच नाहीं.

सेवाग्राम २२–३–४२

: ३९ :

# आत्महत्त्येविषयीं

**प्रश्न**—अमानुष छळ व हाल सहन करण्यापेक्षां ज्याला मरण बरें वाटतें त्याला मरणाचा मार्ग सांपडेल, या वचनाचें कृपया अधिक स्पष्टीकरण करावें. आपण आत्महत्त्येचें समर्थन करतां काय ?

**उत्तर**—अशा प्रसंगीं छळांतून सुटण्याचा एक उपाय म्हणून मी आत्महत्त्या निषिद्ध मानणार नाहीं. पण आत्महत्त्या हा मृत्यूचा प्रशस्त मार्ग होय असें मीं मानीत नाहीं. मृत्यूचा सर्वांत प्रशस्त मार्ग म्हणजे तीव्र इच्छामात्रें करून मरण येणें होय. पण असलें मरण अब्जावधि लोकांपैकीं एकाद्याच्याच नशिबीं असेल. समजा अ ला ब ने पोटावर सरपटायला लावण्याची बळजबरी केली, अशा वेळीं प्राणांतिक प्रतिकार करणें शक्य आहे अशा रीतीनें मरेपर्यंत केलेला कोणताहि प्रतिकार मी प्रशस्त मानतों. अशा प्रकारचा प्रतिकार सशक्ताप्रमाणेंच अशक्तांना देखील करतां येणें शक्य आहे, किंबहुना अशक्तालाच तो अधिक त्वरेनें करतां येईल. यासाठीं खंबीर हृदय व दृढ इच्छाबळ मात्र अपरिहार्य आहे. मी नुसतें कोरडें ब्रम्हज्ञान सांगत नाहीं. माझें हें मत माझा स्वतःचा व माझ्या देखरेखीखालीं राहिलेल्या इतर व्यक्तींच्या अनुभवांवर आधारलेलें आहे. एका अशक्त बाईला देखील तिच्या नवऱ्याची निष्ठूर इच्छाशक्ति वांकवूं शकली नाहीं. किरकोळ शरीरांच्या मुलांनीं कठोर शिक्षकांचे व पाषाण हृदयी आईबापांचे हुकूम धाब्यावर बसवलेले आहेत. मरण्याची तयारीच नव्हे तर इच्छा असावी लागते, तशी असल्यास तीच हमखास आपला मार्ग धुंडाळील.

—सेवाग्राम—१०-७-४२

: ४० :

# अहिंसक प्रतिकार व उपवास

आपण जो लढा टाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहोंत, तो करण्याचा प्रसंग आलाच व तो अहिंसक राहिला, कारण त्याशिवाय यश मिळणें दुरापास्त होईल, तर त्यांत उपवासाला महत्वाचें स्थान प्राप्त होईल. उदाहरणार्थ, अधिकाऱ्यांनीं जर भरमसाट हिंसेचीं कृत्यें केलीं व लोकांनीं हटवादीपणानें दंगेधोपे केले तर सरकार व आपले लोक या दोहोंचाहि प्रतिकार करतांना उपवासाचा अवलंब करावा लागेल.

राजकीय लढ्याचें एक आंग म्हणून उपवासाविषयीं साहजिकच विपरीत ग्रह आहे. धार्मिक आचारांमध्यें मात्र त्याचें स्थान सर्वसंमत आहे. राजकीग कैद्यांनीं अव्यवस्थितपणें त्याचें अवलंबन करून कमी अधिक यश मिळवलें असलें तरी एकंदरींत राजकारणी माणसांना उपवास हा राजकारणांत उगीच आडमुठेपणानें घुसडून दिलेला रानटी प्रकार आहे असेंच वाटतें. तुरुंगांत मात्र उपवास करून कैकांनीं लोकांचें लक्ष्य वेधवून घेण्यांत व तुरुंगाधिकाऱ्यांना हैराण करण्यांत यश मिळवलेलें आहे.

माझे स्वतःचे उपवास मात्र नेहमीं सत्याग्रह धर्माला अनुसरून झालेले आहेत असें माझें मत आहे. दक्षिण आफ्रिकेंत माझ्या सत्याग्रही सोबत्यांनीं देखील अर्ध किंवा पूर्ण उपवास केले. माझ्या उपवासाचे प्रकार अनेक होते. १९२४,मीं मरहूम मौ. महंमदअल्ली यांच्या घरीं हिंदू मुस्लीम ऐक्यासाठीं २१ दिवसांचा उपवास केला. दुसरा उपवास मॅकडोनल्ड निर्णयाविरुद्ध १९३२ सालीं येरवड्याच्या तुरुंगांत केला तो मात्र अनिश्चित दिवसांसाठीं होता. त्यानंतरचा २१ दिवसांचा आत्मशुद्धीचा उपवास

मी येरवडा तुरुंगांतच सुरू केला व सरकार त्या स्थितींत मला तुरुंगांत ठेवायला तयार नसल्यामुळें, माझी सुटका झाली व उपवासाची समाप्ति श्रीमति ठाकरसी यांच्या घरीं झाली. त्यानंतर १९३९ मध्यें राजकोटचा दुर्दैवी उपवास झाला. त्या उपवासांत अविचारानें माझ्या हातून एक चूक घडली व उपवासाच्या खात्रीलायक उज्ज्वल परिणामास विघ्न आलें. इतके सगळे उपवास झाले असले तरी अजून सत्याग्रहाचें सर्वमान्य आंग म्हणून उपवासाचा स्वीकार करण्यांत आलेला नाहीं. राजकारणी लोकांनीं तो सहन करून घेतला येवढेंच. मी मात्र अशा निर्णयावर आलों कीं प्राणांतिक उपवास हें सत्याग्रहाचें आवश्यक आंग असून विशिष्ट परिस्थितींत तें सत्याग्रही शस्त्रागारांतील अत्यंत प्रभावी असें अमोघ शस्त्र ठरूं शकेल. पण योग्य अभ्यास केल्याखेरीज मात्र त्याचा उपयोग करण्याची पात्रता येत नसते.

उपवासाचा अवलंब कोणत्या परिस्थितींत करावा व त्याकरतां कोणत्या अभ्यासाची गरज आहे या गोष्टीचें विवेचन करून मी या लेखाला बोजड स्वरूप देत नाहीं. विधायक अहिंसा म्हणजे हितबुद्धि, प्रेम हा शब्द मी वापरीत नाहीं कारण त्याचा बराचसा बदलौकिक झालेला आहे. ही हितबुद्धि सर्वांत मोठी शक्ति असंते; कारण अपराधी माणसाला काडीइतकी देखील शारीरिक इजा न करतां, किंवा तसें करण्याचें मनांतहि न आणतां, आत्मक्लेशाला तींत अमर्याद वाव आहे. आपल्यांतील सत्प्रवृत्ति जागृत करणें हा त्यांतला हेतु असतो. आत्मक्लेश हे स्वतःच्या सत्प्रवृत्तीचें आवाहन आहे. म्हणूनच योग्य परिस्थितींत केलेला उपवास हें सत्प्रवृत्तीचें शंभर नंबरी आवाहन ठरतें. राजकारणी लोकांना राजकीय बाबतींत त्याचें महत्त्व पटत नाहीं याचें कारण या नाजुक तंत्राचा उपयोग आतां नव्यानेंच होत आहे.

लौकिक बाबतींत अहिंसेचा उपयोग करणें म्हणजेच तिचें खरें मोल पारखणें होय. केवळ अरण्यसेवी तपस्व्यानींच तिचा उपयोग करावा अशी

मर्यादा घालणें माझ्यामतें गैर आहे. सद्गुणाचा उपयोग जर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत होत नसेल, तर तो कुचकामाचा ठरतो. म्हणून शुद्ध राजकारणी लोकांना माझी विनंति आहे कीं त्यांनीं अहिंसेचा व तिचें आत्यंतिक स्वरुप व्यक्त करणाऱ्या उपवासाचा सहृदयपूर्ण सहानुभूतीनें अभ्यास करावा.

—सेवाग्राम २०–७–४२

REFBK-0006265